# माणूस

शनिवार । १७ जुलै १९७६ । साठ पैसे


## आभार

उमरखेडहून दिनकर गं. योगी
नगरहून एस्. एम्. भिंगारकर
संगमनेरहून ब. वि. कुलकर्णी
कारेगावहून एस्. जे. भुसारी
चिखलीहून बी. एन्. भराड
बार्शीहून जे. डी. घोडके
बेळगावहून ए. वाय्. धामणेकर

कोल्हापूर : आर्. आर्. नातू अँड सन्स
नासिक : पाठक ब्रदर्स
यवतमाळ : गीता बुक स्टॉल, एस्. टी. बुक स्टॉल
जालना : जालना न्यू. पे. ए., मनोहर न्यू. पे. ए.
नांदेड, नागपूर, गोवा, मुंबई
सर्व ठिकाणचे विक्रेते कळवतात . . . .
' माणूस अंकाची मागणी वाढत आहे . . . . '

आभारी आहोत . . . .

व्यवस्थापक
माणूस

# साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक सहावा

१७ जुलै १९७६

मूल्य : साठ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


महाराष्ट्रात गेल्या दुष्काळात फार मोठ्या संख्येत सामुदायिक विहिरी घेतल्या गेल्या. त्यांतील काही विहिरींना पाणी लागले, तर काहींचे खोदकाम अपुरे राहिले, तर काहींच्या बांधकामाचा प्रश्न शिल्लक राहिला. दुष्काळानंतर काही योजना जाहीर केल्या गेल्या. शेतकऱ्याने याबाबतीत राष्ट्रीयीकृत बँकांचे कर्ज घ्यावे. स्वखर्चाने विहिरी पूर्ण कराव्या; अशा स्वरूपाच्या या योजना होत्या. दुष्काळात या प्रश्नाची सर्व अंगे विचारात घेऊन योजना चालू केली होती, असा सरकारचाही दावा नाही. आधी उत्पादक काम देऊ, दुष्काळात माणसे जगवू व उर्वरित प्रश्न पुन्हा सोडवू अशी सरकारची भूमिका होती. तशी ती नसती, तर बरे झाले असते. थोडा अधिक विचार केला असता तर, त्यावेळी प्रश्न सोडविणे, आजच्यापेक्षा अधिक सुलभ झाले असते. आजही हा प्रश्न सोडविणे विशेष कठीण नाही हे खालील विवेचनावरून स्पष्ट होईल; राजकीय व शासकीय इच्छा मात्र हवी.

सर्वप्रथम पैशाचा विचार होणे जरूर आहे. पैसा तीन-चार मार्गांनी उपलब्ध होईल. रोजगारहमी फंड, राष्ट्रीयीकृत किंवा भूविकास बँकेचे कर्ज व वैयक्तिक खर्च करण्याची कुवत हे ते मार्ग. त्यांतील रोजगारहमीच्या पैशाच्या खर्चाला काही नियम व निकष आहेत. त्यांची माहिती सर्वांना असेल असे नाही. म्हणून तिचा उल्लेख करणे जरूर आहे. कसबी कामासाठी ४० टक्क्यांहून अधिक खर्च करू नये हा रोजगारहमीमधला महत्त्वाचा नियम आहे. हा नियम आधीच पुरेसा शिथिल असल्यामुळे तो अधिक शिथिल करू नये, अन्यथा श्रमिकाला काम देण्याच्या भूमिकेसच बाध येईल असे मला स्वतःलादेखील वाटते. म्हणून शक्यतो या नियमात बसवूनच विहिरी पूर्ण कराव्या असे माझे मत आहे. इतक्या उप्पर बिगर कसबी कामासाठी गरजेप्रमाणे ५० किंवा ६० टक्के रक्कम रोजगारहमी-खाली खर्च करण्याशिवाय गत्यंतर नाही असे शासनाचे मत बनले किंवा खास प्रकरणांमध्ये तशी मान्यता द्यावी असे शासनास वाटले, तर तसे करण्यासही हरकत नसावी. दोन्ही परिस्थितीत वेगवेगळ्या मार्गांनी विहिरींचे काम पूर्ण करता येईल.

राष्ट्रीयीकृत किंवा भू-विकास बँकेचे कर्ज मिळण्यासाठी शेतकरी थकबाकीदार नसला पाहिज. असे किंवा स्वतःची खर्च करण्याची कुवत असलेले शेतकरी संख्येने फार कमी आढळतील. तरीपण सारे काही फुकट करून देणे अनेक कारणास्तव योग्य नाही; म्हणून रोजगारहमी फंडाची रक्कम काही टक्के व बाकीची रक्कम शेतकऱ्याने स्वतःचे पदरून किंवा बँकेचे कर्जाने किंवा अखेरीस, रोजगार-हमी फंडातूनच शेतकऱ्यास, कर्जाऊ देऊन विहिरीचा एकूण खर्च भागवावा. काहींना हे प्रोसिजर गुंतागुंतीचे वाटेल, पण नुकताच पायलट गहू योजनेखाली या पद्धतीनेच पिकाचा खर्च केला गेला. ज्या शेतकऱ्यांना शक्य होते त्यांनी स्वखर्चाने बीं व खते घेतली. त्यांना अर्थातच व्याजाच्या भूर्दंडातून मुक्तता मिळाली. त्यानंतर जे सोसायटीचे थकबाकीदार नव्हते त्यांना सोसायट्यांकडे कर्जासाठी पाठवून शासनाने जि. म. स. बँकांचे कर्ज देवविले; जे थकबाकीदार होते त्यांना शासनाने स्वतःतर्फे कर्ज दिले. अशा प्रकारे भांडवल गुंतवणुकीचा बोजा भिन्न भिन्न संस्थांवर पडल्यामुळे पायलट योजना घेणे सोपे झाले. उत्पन्नाची शास्त्रोक्त खात्री ही एकमेव प्रेरणा या

# सामुदायिक विहिरी अशा पूर्ण करा

वा. आ. देशमुख, विधानसभा सदस्य

प्रयोगामागे होती. 'सारे फुकट' अशी व्यवस्था नव्हती. 'सारे फुकट' प्रकल्पामध्ये भ्रष्टाचारात होणारी गुंतवणूक अफाट असते. माजी मुख्यमंत्र्यांनी एकदा एका बैठकीत प्रांजळपणे हे कबूल केले की, सामुदायिक विहिरींच्या कामावर फार मोठा भ्रष्टाचार होऊ लागल्यामुळे त्या पुढे चालू ठेवणे इष्ट नाही. विहिरी चालू न करण्यास हे एक फसवे निमित्त पुढे केले असे मीदेखील म्हणू इच्छित नाही, कारण ती एक वास्तवता आहे. सुरुंगाच्या संख्येबद्दल काही पुरावा राहत नाही, म्हणून पाच सुरुंग उडवले तर, १०-२० सुरुंगांची (किंवा अधिकच) बिले उचलणे हा युगधर्मच होता. तसेच विहिरीच्या खोलीबद्दल चक्क खोटी मापे दाखवून कर्मचाऱ्यांनी पैसे खाल्ले. सामुदायिक विहिरी पुन्हा सुरू केल्या तर, ही 'तज्ज्ञ' मंडळी नव्या जोमाने पैसे मारणार व मामला 'फुकटचा' असल्यानंतर जमीन मालकासहित सारेजण त्यात हात धुवून घेण्यास कमी करणार नाहीत. यासाठी, तसेच काहींनाच सारे फुकट, ज्यांचे शेतात दुष्काळात विहीर धरली नाही असे छोटे शेतकरी व मजूर यांना काहीच नाही, म्हणजेच जनतेचा पैसा अपघाताने काही लोकांना फुकट देणे ही व्यवस्था मूलतःच सदोष, असा विचार करता सामुदायिक विहिरीवर पुढे होणारा बराचसा खर्च शेतकऱ्यांवर बसविणे आवश्यक आहे. मात्र शेतकऱ्यांनी मान्यता दिल्याशिवाय मस्टर पास होऊ नये किंवा सुरुंगाची बिलेही मंजूर होऊ नयेत. तसेच येथून पुढे होणारा काही खर्च शेतकऱ्यांवर बसवावा; दुष्काळातला खर्च बसवू नये.

सुरुवातीस भूजल सर्वेक्षण खात्याला विशिष्ट विभागांसाठी मुदत घालून देऊन अहवाल मागवावे. त्या अहवालांच्या आधारावर कोणकोणत्या विहिरी घ्यायच्या ते निश्चित करण्यास महिना-पंधरा दिवसांपेक्षा अधिक काळ लागणार नाही. बऱ्हंश ठिकाणांसाठी हे रिपोर्ट तयार आहेत. गटविकास अधिकाऱ्यांकडे भूजल सर्वेक्षण खात्याच्या याद्या येताच, त्यांनी संबंधित शेतकऱ्यांना नोटिसा देऊन त्यांच्या समक्ष विहिरीच्या परिस्थितीची पाहणी करावी व ओव्हरसिअर किंवा डे. इंजिनिअरच्या मदतीने शेतकरी व ग्रामपंचायतीच्या सरपंचाच्या समक्ष शेतकऱ्यांनाच उरलेल्या कामांचे बजेट-अंदाजपत्रक तयार करावयास लावावे. कुठल्याही परिस्थितीत शेतकऱ्यांचे मत अंतिम समजण्यात यावे.

अंदाजपत्रकाचे दोन भाग राहतील. पहिला भाग बांधकामाचा. त्याचे गणित सोपेच आहे. विहिरीची मजबूत खडकापासून वरच्या भागाची उंचीच बांधकामासाठी विचारात घेणे योग्य असते. या उंचीसाठी किती चिरे लागतील ते पाहून बांधकामाचा खर्च अंदाजता येईल. चिऱ्याचा दर व बांधकामाचा दर हे स्थानिक परिस्थितीप्रमाणे असतात, तसेच चुन्याचे असते. पक्का खडक लागलेला नसल्यास, अंदाजे किती खोलावर लागेल ते स्थानिक परिस्थितीवरून समजू शकते. या अंदाजात थोड्याबहुत चुका होण्याने काही खास बिघडणार नाही. खेड्यातील जमीनमालक, सरपंच हा हिशेब ओव्हरसिअरच्या मदतीने सहज करू शकतात. यात बी. डी. ओ. सारखा अधिकारी उपस्थित असल्यास सारा मामला सोपा होऊ शकतो. अंदाजपत्रकाचा दुसरा भाग खोदकामाचा. यात तर्काला बराच वाव आहे. तरीपण शेतकऱ्यांचे अनुभव येथेही मदतीला येतात व सुरुंगाचे दर, रोजगार हमीचे मजुरीचे दर इ. विचारात घेऊन ढोबळ अंदाज करता येतो. खर्चाचा अंदाज १५ हजार केला, तर प्रत्यक्ष १० हजारांत किंवा २० हजारांत काम होईल; पण ५० हजारांवर खर्च जाणार नाही, एवढा नक्की अंदाज येईल. हा फायदा या अंदाज करण्यामुळे होईल. अंदाजामुळे इतरही अनेक फायदे होतील. पहिला फायदा, होणाऱ्या खर्चास किमान नैतिक आधार मिळेल. दुसरा फायदा, होणाऱ्या खर्चाची योग्यायोग्यता नित्य पडताळीत राहता येईल. तिसरा फायदा म्हणजे रोजगारहमीच्या नियमात विहीर बसते की नाही, नसल्यास नियम विशिष्ट प्रकरणात किती शिथिल करावेत, त्याचा अंदाज येईल. चवथा फायदा, शेतकऱ्यांवर किती खर्च बसवावा, त्याचा निर्णय करणे त्यामुळे शक्य होईल. पाचवा फायदा, सचिवालय स्तरावर सर्व विहिरींसाठी लागणाऱ्या संभाव्य खर्चाची बेरीज करता येईल. त्यावरून सर्व विहिरी एकदम सुरू कराव्या की, हप्त्याहप्त्याने व कोणत्या भागात कोणत्या वर्षी याचा आराखडा ठरविता येईल. पैसा, स्टाफ, रोजगारहमी, कामांच्या गरजा या बाबींची संकलित माहिती सचिवालय स्तरावर उपलब्ध असल्यामुळे असा आराखडा तेथे त्वरेने करणे शक्य आहे. असा आराखडा जिल्हास्तरावर प्रसिद्ध करण्यात यावा व याबाबतीत शासकीय आदेश (G. R.) निघावा. अंदाज तयार करण्याच्या कार्यवाहीचे लेखी प्रोसिडिंग तयार करावे. त्यावर शेतकरी व पदाधिकारी, पंच इत्यादींच्या सह्या असाव्या.

विहिरींची अंदाजपत्रके अशा प्रकारे तयार ठेवल्यानंतर जमीन मालकाची मागणी किंवा रोजगाराची मजुरांतर्फे होणारी मागणी या निकषावर कलेक्टरने योग्य एजन्सीमार्फत काम घ्यावे. ते केव्हा घ्यावे ते कलेक्टरच्या मर्जीवर सोपवावे. रोजगार हमी कामाची निकड पाहून कलेक्टरने liberally कामे सुरू करावीत असे आदेश कलेक्टरांना देणे योग्य ठरावे. मागणी असल्यास काम सुरू न करण्याचे स्पष्टीकरण देण्याचे बंधन कलेक्टरवर असावे. या बाबतीतील सध्याची व्यवस्था अपूर्ण वाटते.

शासकीय आदेशातच तरतूद करून शेतकऱ्यांवर त्यांच्या जबाबदारीची बंधने टाकता येतील. उदा०: सुरुंग व कामाची मस्टर्स तपासून त्यांवर सह्या करणे, आपल्यावर पडणारी आर्थिक जबाबदारी पूर्ण करणे, बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ऑइल एंजिन, मोट किंवा इलेक्ट्रिक मोटार यांची तरतूद कोण कशा प्रकारे करील, तसेच प्रत्येक शेतकऱ्याचा पाणी घेण्याचा कार्यक्रम कसा राहील, आपसातील भांडणे कशी मिटविता येतील या सर्व बाबी कायदा, नियम, शासकीय आदेश या मार्गे पूर्ण करता येतील. त्यांचे तपशील थोडक्यात खाली देत आहे.

(१) पूर्ततेच्या खर्चाची विभागणी : एखाद्या विशिष्ट विहिरीसाठी होणाऱ्या एकूण खर्चापैकी शासनाने ७५ टक्के वाटा उचलावा व शेतकऱ्यांनी २५ टक्के. म्हणजे ७५ टक्के फुकट व २५ टक्के कर्जावू अशी व्यवस्था ठरवावी. ७५ टक्के खर्च रोजगार हमी फंडातून व्हावा. २५ टक्के रक्कम सर्व शेतकऱ्यांनी भरावी. या २५ टक्के रकमेची व्यवस्था आधीच केली जावी. म्हणजे ज्यांना स्वतःची रक्कम उभी करणे शक्य आहे त्यांनी ती पदरून शासनाकडे भरावी. ज्यांना कर्ज घेण्याची इच्छा व पात्रता आहे त्यांनी ती बँकांकडून उभी करून भरावी. ज्यांना हेही शक्य नाही, त्यांच्यासाठी होणारी संभाव्य रक्कम रोजगारहमी फंडातून त्यांच्या खात्यावर कर्जावू टाकावी व बंडींग कर्जे वसूल करतात तशी परतफेडीची करावी. उदा० : एका विहिरीसाठी उरलेली खोदाई दहा हजार व बांधकाम दहा हजार असा एकूण वीस हजार रुपये खर्चाचा अंदाज असेल तर, १५ हजार रुपये शासनाने खर्चावे. असे करण्याने कसबी कामावर ४० टक्के खर्चिण्याच्या नियमाचे उल्लंघनही होणार नाही. उरलेल्या पाच हजारांची व्यवस्था सर्व जमीनधारक मिळून करतील. समजा ४ जमीनधारक असून त्यातील 'अ' चे चार एकर, 'ब' चे तीन एकर, 'क' चे दोन एकर व 'ड' चे एक एकर क्षेत्र भिजणार आहे, तर रुपये पाचहजाराची व्यवस्था या चौघांनी अनुक्रमे ४ : ३ : २ : १ या प्रमाणात करावी लागेल. म्हणजेच 'अ' ने दोन हजार, 'ब' ने दीड हजार, 'क' ने एक हजार व 'ड' ने पाचशे रुपये उभे केले पाहिजेत. 'अ' ला स्वतःची एक हजार रक्कम भरणे शक्य आहे. ती त्याने खजिन्यात भरावी (ज्याप्रमाणे, पायलट गहू योजनेत काहींनी स्वतःच्या खर्चाने भाग घेतला; पदरची रक्कम भरून खते, बियाणी विकत घेतली) उरलेल्या एक हजारासाठी शासन (उदा०: बी. डी. ओ.) याने योग्य त्या बँकेचे कर्ज त्याला मिळणे शक्य असेल तेवढे मिळवून द्यावे. ज्यांना बँकेचे कर्ज मिळण्याची पात्रता नाही, त्यांच्यासाठी प्रत्यक्ष खर्च झाल्यानंतर त्यांच्यावर पडणारा proportionate बोजा, त्यांच्या नावावर कर्ज म्हणून टाकावा. उदा०: क ब ड यांना बँक कर्ज देत नसेल, तर त्यांच्यासाठी रोजगार हमीतून खर्च करावा. अंदाजाप्रमाणे त्यांच्यासाठी अनुक्रमे (१०००+५००)=एकूण १५०० खर्च होणार आहे. तो त्यांच्यावर बसेल व सध्या बंडिंगवर रोजगार हमीतून पैसा खर्च करतात व पुन्हा शेतकऱ्यांकडून वसूल करणार आहेत तशा पद्धतीने क व ड कडून हे रु. १५०० वसूलीयोग्य होतील, अंतिम हिशोबात रु. १५०० चे रु २००० होतील किंवा रु. १२०० होतील; तर तेवढेच वसूल व्हावे, १५०० होवू नयेत हे सांगण्याची आवश्यकता नाही.

| | |
|---|---|
| एकूण घेतलेल्या विहिरी | ५६६५६ |
| ज्यांना पाणी लागेल अशा विहिरींची संख्या | १९५०४ |
| भूजल खात्याने परीक्षा केलेल्या विहिरींची संख्या | १६३५४ |
| भूजल खात्याने योग्य ठरविलेल्या विहिरींची संख्या | १४१०२ |
| आजपर्यंत खोदकामावर झालेला अंदाजित खर्च | १९ कोटी रु. हून अधिक |
| रोजगारहमी फंडातून गतवर्षी बंडिंगसाठी दिलेले कर्ज अंदाजे | ७ कोटी रुपये |
| रोजगारहमी फंडाची खर्च न झालेली रक्कम अंदाजी | २० कोटी रुपये |
| सन १९७३ च्या सुरुवातीस खोदकामासाठी ३० फूट व्यास व ४० फूट खोलीसाठी अंदाजिलेली रक्कम. (लेखकाच्या मते ही रक्कम थोडी कमी धरली आहे.) | ७००० रुपये |
| त्याच वेळी बांधकाम व लिफ्ट यंत्रणेच्या खर्चासाठी अंदाजिलेली रक्कम. (लेखकाच्या मते ही रक्कम बरीच जास्त धरली गेली आहे.) | २८,००० रुपये |

(२) विहीर पूर्ण झाल्यानंतर तीमध्ये पाण्याचे हक्क क्षेत्रफळाच्या प्रमाणात राहतील. उदा०: 'अ' ला $\frac{4}{10}$, 'ब' ला $\frac{3}{10}$, 'क' ला $\frac{2}{10}$ व 'ड' ला $\frac{1}{10}$ पाणी घेण्याचा हक्क राहील. या हक्काप्रमाणे आठवड्यातील तास व दिवस तहशीलदार सर्वांशी चर्चा करून ठरवून देतील व तसे हक्कविलेख देतील. परिणामी निर्माण झालेले वाद दिवाणी किंवा मामलेदार कोर्टाच्या न्यायालयातून निर्धारित होवू शकतील. तास व दिवस ठरविताना उपसा करण्याची प्रत्येक शेतकऱ्याची साधने विचारात घेतली जावी. कारण मोट व मोटार यांच्या उपसाशक्तीत फार मोठे अंतर आहे. पण मोटारीने उपसूनही पाणी कमी होत नाही अशी बलवान झऱ्याची विहीर असेल तर किंवा फलश सीझनमध्ये क्षेत्रफळाच्या प्रमाणावर तास व दिवस ठरविण्यास हरकत नसावी.

(३) पाणी उपसण्याच्या साधनांमुळे बरेच वांधे निर्माण होतात. ही व्यवस्था समाईक राहणे जवळपास अशक्य आहे. म्हणून पाण्यात हक्क असणाऱ्या प्रत्येकास उपशाचे साधन निर्माण करून देण्यात शासनाने प्रयत्नशील राहावे. जेथे समाईक व्यवस्था करण्याची तयारी असेल, त्यांना उत्तेजन द्यावे, कर्जाची व्यवस्था करण्यात साहाय्य द्यावे व कर्ज भिजणाऱ्या जमिनीच्या प्रमाणात वसुलीयोग्य असेल असे ठरवावे. तसेच वीज बिल किंवा डिझेल बिलाचे असावे. मोडतोडीचा खर्च प्रमाणशीर असावा. वाद होतील ते निर्णित करण्याचे अधिकार तहशीलदारांना असावे. समाईक उपशाची व्यवस्था यशस्वी होणे फार अवघड आहे हे मात्र मला स्पष्ट करणे जरूर वाटते.

(४) पाट काढून देण्याची सत्ता सध्याच्या तहशीलदारांना आहे. ती तरतूद अपुरी वाटल्यास तहसिलदारांना अशी सत्ता प्रदान करून सर्व लाभधारकांना पाट काढून मिळतील असा नियम करावा.

(५) सामुदायिक विहिरी मुळातच अल्प भूधारकांच्या जमिनीत घेतलेल्या आहेत. सबब शेतकऱ्यावर बसणाऱ्या खर्चास सबसिडी (एस. एफ. डी. ए. योजनेखालील) मिळावयास काहीच हरकत नाही. त्या दृष्टीने प्रयत्न व्हावा.

आमदार नात्याने शासनातील धोरणविषयक निर्णय घेणारांशी चर्चा करण्याचे प्रसंग आले. सामुदायिक विहिरींचे घोडे कोठे पेंड खाते आहे त्याचा अंदाज येत गेला. माझ्या मते वरील विवेचनानंतर, सामुदायिक विहिरी घेण्याच्या बाबतीतील सर्व शंका व अडचणी दूर होवून ही उपयुक्त योजना पूर्ण केली जायला हरकत नाही. □

# सोलकढी

## ☐ चि. बाळू, बाळ, बाळाराव, बाळाभाऊ, बाळासाहेब कोल्हटकर

चि. बाळू कोल्हटकर हा मराठी रंगभूमीवरचा एक चमत्कार आहे. एकूण रंगभूमीवर चमत्कार फार : विष्णुदास भावे, चमत्कार; अण्णा आणि त्यांचे 'सौभद्र', चमत्कार; देवलमास्तर आणि त्यांची 'शारदा', 'संशयकल्लोळ', चमत्कार; भावड्या, चमत्कार; बालगंधर्व, चमत्कार; गडकरीमास्तर, चमत्कार; अत्रे, चमत्कार; एकपात्री पु. ल., चमत्कार; विजय तेंडुलकर, चमत्कार; दादा कोंडके, चमत्कार; विजया मेहता, चमत्कार; पद्मा चव्हाण, चमत्कार; साहित्य संघ, चमत्कार; नाट्यसंपदा–नाट्यमंदार–चंद्रलेखा–कलावैभव–अभिजात–पी. डी. ए.–थिएटर अॅकॅडमी, चमत्कार; राजाराम हुमणे, चमत्कार; माधव मनोहर, चमत्कार; वा. य. गाडगीळ, चमत्कार; विजय वेंद्रे, चमत्कार; नाट्यसंमेलने, चमत्कार; नाट्य-परिषद, चमत्कार; 'नाट्यदर्पण', चमत्कार; विद्याधर गोखले, चमत्कार–आता थांबतो. विद्याधर गोखल्यांची दखल घेतल्यावर बाकी राहिल्यारोहिल्यांची दखल घेतली नाही तरी, नटेश्वराला चालते, असे म्हणतात.

या प्रत्येक गोष्टीचा चमत्कारीपणा वेगवेगळा आहे, हे, वाचकहो, तुम्ही जाणताच. चि. बाळू कोल्हटकरांनी तर गेल्या काही वर्षांत चमत्कारांची जुडीच महाराष्ट्राच्या अनवाणी पायांवर वाहिली आहे. बाळ कोल्हटकर नाटककार आहेत; दिग्दर्शक आहेत; नटु आहेत; संस्थानिक आहेत. असा चतुरानन बाळ एकूण विरळाच. आता, खिशात स्वतःच्या मालकीचा हातरुमाल न बाळगणारे काही महाळुंगे नाट्यसमीक्षक कोल्हटकर बाळांना नाटककार मानायला तयार नाहीत, हे मला ठाऊक आहे. पण मी कोल्हटकर बाळांना (मोठा) नाटककार मानतो. (कारण मी खिशात स्वतःच्या मालकीचा मोठा हातरुमाल बाळगतो.) या नाटककार बाळाने महाराष्ट्राला रडायचे प्रशिक्षण दिले आहे, हे कसे विसरता येईल? बाळ कोल्हटकरांनी मुबलक नाटके लिहिली. त्यांच्यावर पस्तीस-चाळीस माणसांची संस्था रटमटत ठेवली. त्यांची सगळी नाटके स्वस्वतंत्र. प्रतिभा परधार्जिणी नव्हे. आजकाल स्वतंत्र नाटक लिहिणे ही गोष्ट मुंबईच्या रेल्वेत आपले खिसापाकीट सांभाळण्याइतकीच अवघड आहे. बाळ कोल्हटकर आधी मुंबईच्या रेल्वेत कर्मचारी असल्यामुळेच त्यांना आपले खिसापाकीट सांभाळणे आणि स्वस्वतंत्र नाटके लिहिणे शक्य झाले असावे, असा आमचा कयास आहे. त्यांची नाटके मुबलक; विषय निर्निराळे; पण संवादांची शैली एकच एक. हासुद्धा एक चिमुकला चमत्कारच. सत्यनारायणाला जसे केळीचे खुंट हवेत तसे नाटक म्हटले म्हणजे शैलीचे संवाद हवेत, असे महाराष्ट्राची रसिकता मानते. बाळारावांना ते नेमके ठाऊक आहे. त्यामुळे नाटककाराच्या भूमिकेत, ते, गेली कित्येक वर्षे, ते पांढरे कपडे, ते घारेघुरे डोळे, तो पानांचा डबा, आणि ती शैली जपत आले आहेत. स्वतःचे नाटक, स्वतःच दिग्दर्शक; त्यामुळे स्वतःच्या मापाची भूमिका प्रत्येक नाटकात त्यांनी घेतली, आणि नटु म्हणून महाराष्ट्रभर भिक्षावळ घेतली.

श्रीमंत बाळासाहेब कोल्हटकर यांची 'दुर्वांची जुडी' ही नाट्यसंस्था गेली बारा वर्षे दिमाखात चालू आहे. हल्ली नाट्यसंस्थेचे सूत्रधार असणे हे कोल्हापूरच्या अंबाबाईच्या देवळाचे पुजारी असण्याहून अधिक धोक्याचे–जोखमीचे झाले आहे. (येथे वाचकांना दोन बाळांचे जुळे स्मरण झाले, तर त्याला अनंतराव जबाबदार नाहीत, हे आधीच सांगून ठेवतो.) पण बाळासाहेबांच्या रक्तात साहस आहे. म्हणूनच आपली नाट्यसंस्था सुखात चालली आहे, असे साहसी उद्गार त्यांच्या बाळतोंडातून उमटू शकले. महाराष्ट्रातल्या बाकीच्या सर्वसगळ्या नाट्यसंस्था दुःखात चालल्या आहेत, हे येथे लक्षात घ्यावे. अशा काळे जाऊनदेखील नाट्यसंस्था सुखात राहावी अशी कोणती 'जुडी'बुटी या बाळाभाऊकडे असावी बरे? असो.

चि. बाळू, बाळ, बाळाराव, बाळाभाऊ, बाळासाहेब कोल्हटकरांचे भलेभले व्हावे : त्यांचे पांढरे कपडे पांढरेच राहावे; घाऱ्या डोळ्यांतला धारवा कायम राहावा, पानांचा डबा पानांनी भरला राहावा, शैली स्वधार्जिणी राहावी, आणि मुख्य म्हणजे 'दुर्वांच्या जुडी'त गवताच्या काड्या बांधायला लागू नयेत, अशी या अनंतरावांची, आपल्या कोटचवघी वाचकांसमवेत, श्रीगजाननाच्या चरणी दोन्ही कर आणि मुकुंद निमकर जोडोन प्रार्थना.

—अनंतराव



# कम्युनिस्ट चळवळ

## स्वायत्ततेचे तत्त्व मान्य

वा. दा. रानडे

युरोपमधील कम्युनिस्ट चळवळीच्या दृष्टीने इटली आणि पोर्तुगालमधील निवडणुका आणि युरोपिअन कम्युनिस्ट पक्षप्रमुखांची परिषद यांचा एकत्र विचार केला पाहिजे.

इटलीतील निवडणुकांत कम्युनिस्टांना निर्णायक बहुमत मिळाले नाही तरी, पहिल्या क्रमांकाचा पक्ष म्हणून तो निवडून येईल अशी कम्युनिस्ट नेत्यांची अपेक्षा होती. ती सफल झाली नसली तरी, त्यांनी ३४.४ टक्के म्हणजे १९७२ च्या निवडणुकांपेक्षा ७.३ टक्के मते अधिक मिळविली आहेत. पण १९७५ मधील स्थानिक निवडणुकांशी तुलना केली तर असे दिसते की, कम्युनिस्टांच्या मतांत एक वर्षात फक्त एक टक्का घट झाली आहे. उलट ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षाची मते १९७५ मध्ये तीन टक्क्यांनी घटली होती. ती घट त्यांनी भरून काढून १९७२ एवढीच म्हणजे ३८.७ टक्के मते त्यांनी यावेळी मिळविली. इटालियन कम्युनिस्टांनी गेल्यावर्षीच्या स्थानिक निवडणुकांपासूनच नवी भूमिका स्वीकारली होती. कामगारवर्गाची सर्वाधिकारशाही या कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीतील मुख्य तत्त्वाचा त्यांनी त्याग केला, एवढेच नव्हे तर, पाश्चात्त्य भांडवलदारी लोकशाहीतील बहुतेक मूल्ये मान्य केली. अनेक पक्षांचे अस्तित्व, सर्व पक्षांना प्रचारांची पूर्ण मोकळीक, पार्लमेंटात नेहमी एकाच पक्षाचे किंवा आघाडीचे बहुमत न राहता निरनिराळे पक्ष एकत्र येऊन लोकशाही पद्धतीने त्यात बदल होण्याची शक्यता, न्यायसंस्थेचे स्वातंत्र्य या गोष्टी त्यांनी मान्य केल्या आहेत. सरकारात सहभागी होऊन ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षाशी ऐतिहासिक तडजोड करण्याचीही तयारी पक्षनेते बर्लिंगर यांनी दर्शविली. पण कम्युनिस्टांची नवी भूमिका म्हणजे निवडणुकीसाठी घेतलेला पवित्रा आहे. सत्ता हाती आल्यावर ते हुकूमशाही प्रस्थापित करतील अशी शंका मतदारांना अजून वाटत असावी म्हणूनच मतदारांनी त्यांना निर्णायक बहुमताने निवडून दिले नाही असे दिसते.

मॉस्कोच्या कलाप्रमाणे न चालता स्वतंत्र भूमिका घेतल्याने इटालिअन कम्युनिस्टांना एवढे यश मिळाले. उलट अशी भूमिका न घेतल्याने पोर्तुगालच्या कम्युनिस्टांना दोन महिन्यापूर्वीच्या नॅशनल असेंब्लीच्या निवडणुकांत आणि नुकत्याच झालेल्या अध्यक्षीय निवडणुकांत पराभव पत्करावा लागला. नॅशनल असेंब्लीच्या निवडणुकांत त्यांचा पक्ष चौथ्या क्रमांकाने निवडून आला. त्यास १४.७२ टक्के मिळाली. अध्यक्षीय निवडणुकीत त्यांच्या उमेदवारास यापेक्षाही कमी म्हणजे ८ टक्के मते मिळाली. लष्करातील एका गटावर कम्युनिस्टांचा प्रभाव होता व त्यांच्या हाती देशाचा कारभार जाणार असे लष्करी क्रांतीच्या सुरुवातीच्या काळात वाटत होते पण एक वर्षापूर्वीच्या घटनासमितीच्या निवडणुका आणि यावर्षी झालेल्या नॅशनल असेंब्लीच्या आणि अध्यक्षपदाच्या निवडणुकावरून सर्वसामान्य जनतेचा पाठिंबा कम्युनिस्टांना नाही हे स्पष्ट झाले.

पोर्तुगालचे कम्युनिस्ट या निवडणुकांपासून काही शिकून आपल्या धोरणात योग्य बदल करणार की, पूर्वीचेच धोरण पुढे चालू ठेवणार हा प्रश्न आहे. इटली, फ्रान्स व स्पेनमधील कम्युनिस्टांनी मॉस्कोपासून स्वतंत्र आणि स्वतःच्या देशातील विशिष्ट परिस्थितीनुसार स्वतःच्या मार्गाने समाजवादाकडे जाण्याची भूमिका स्वीकारली आहे. पोर्तुगालच्या कम्युनिस्टांनीही अशीच भूमिका स्वीकारावी असा विचार पक्षकार्यकर्त्यांत बळावण्याचा संभव नाकारता येत नाही. त्यांच्या भूमिकेत असा बदल झाला तर, समाजवाद्यांचीही कम्युनिस्टांसंबंधी भूमिका बदलेल. इटली व फ्रान्समध्ये समाजवादी आणि कम्युनिस्ट यांच्यात सहकार्य वाढत आहे. पोर्तुगालमध्ये या दोन पक्षांत सहकार्य निर्माण झाले तर, डाव्यांची एकजूट आणि सामर्थ्य वाढण्यास ते पोषकच ठरेल पण त्यासाठी पोर्तुगीज कम्युनिस्टांनी आपल्या भूमिकेत बदल करण्याची आवश्यकता आहे. परिस्थितीची ही गरज असून इटली-फ्रान्स-सारखी भूमिका स्वीकारणे पोर्तुगीज कम्युनिस्टांना भाग पडेल.

इटली व पोर्तुगालमधील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आता बर्लिन येथे भरलेल्या युरोपिअन कम्युनिस्ट पक्षप्रमुखांच्या परिषदेचा विचार करावयाचा. अशी परिषद भरविण्याचे मास्कोचे प्रयत्न गेली दोन वर्षे चालू होते, पण परिषदेने संमत करावयाच्या निवेदनाच्या मसुद्यावर एकमत होत नव्हते. या पक्षांच्या चळवळीवर आपला प्रभाव कायम ठेवण्याचा रशियाचा प्रयत्न होता. रशियाच्या धोरणांना या पक्षांनी पाठिंबा द्यावा व संयुक्त कृतीची भूमिका घ्यावी असा ब्रेझनेव्ह यांचा आग्रह होता. उलट प्रत्येक कम्युनिस्ट पक्षाला स्वतःच्या मार्गाने, स्वतःच्या विशिष्ट परिस्थितीनुसार समाजवादाकडे जाण्याचे धोरण ठरविण्याची पूर्ण मोकळीक हवी. अशी मागणी युगोस्लाव्हिआचे नेते टिटो, रुमानियाचे नेते सिसेस्क्यू हे पूर्व युरोपातील नेते करीत होते. तसेच इटालीचे बर्लिंगर, फ्रान्सचे मार्काय हे पश्चिम युरोपातील कम्युनिस्ट पक्षांचे नेतेही ही मागणी करीत होते. अखेर या मागणीपुढे नमते घेणे रशियाचे नेते ब्रेझनेव्ह यांना भाग पडले. तेव्हा परिषद भरविण्यातील सर्व अडचणी दूर झाल्या. संयुक्त कृतीच्या कार्यक्रमाचा आग्रह रशियास सोडावा लागला. कम्युनिस्ट समाजपद्धती स्थापण्याचे उद्दिष्ट निरनिराळ्या मार्गांनी गाठता येईल हे या २९ पक्षांच्या परिषदेने संमत केलेल्या निवेदनात मान्य करण्यात आले. युरोपातील कम्युनिस्ट पक्षांचे संबंध समानता, प्रत्येक पक्षाला धोरण आखण्याचे पूर्ण स्वातंत्र्य, अंतर्गत हस्तक्षेप नाही. पुरोगामी समाज परिवर्तन आणि समाजवादासाठी कराव्या लागणाऱ्या लढ्यात निरनिराळ्या मार्गाची निवड करण्याबाबत प्रत्येक पक्षाला पूर्ण मोकळीक या तत्त्वांवर आधारलेले असतील हे या निवेदनात मान्य करण्यात आले.

वास्तविक ही भूमिका काही नवीन नाही. क्रुश्चेव्हच्या काळात रशिअन कम्युनिस्टपक्षाच्या विसाव्या काँग्रेसमध्ये ही भूमिका मान्य करण्यात आली होती पण प्रत्यक्षात आपल्या धोरणानुसारच सर्व कम्युनिस्ट पक्षांनी चालले पाहिजे असा रशिअन नेत्यांचा प्रयत्न होता. आपल्या धोरणानुसार चालणाऱ्या कम्युनिस्ट राजवटी प्रतिगामी ठरवून लष्करी हस्तक्षेपाने रशियाने त्या मोडून काढल्या. हंगेरी आणि चेकोस्लोव्हाकिआ ही त्याची प्रमुख उदाहरणे. दुसऱ्या कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणात हस्तक्षेप करावयाचा नाही हे तत्त्व ब्रेझनेव्ह यांनी मनापासून मान्य केले असेल तर, चेकोस्लोव्हाकिआत लष्करी हस्तक्षेप करून ड्युबकेकची राजवट उलथण्यात आपली चूक झाली हे त्यांनी मोकळेपणाने मान्य करायला हवे.

अंतर्गत प्रश्नात हस्तक्षेप करायचा नाही याचा अर्थ एकमेकांच्या धोरणावर टीका करावयाची नाही असे नव्हे. वैचारिक पातळीवर अशी टीका–प्रति–टीका चालू राहिलीच पाहिजे. त्यातूनच चुका सुधारल्या जातात. कम्युनिस्ट पक्षांना टीकेची ही मोकळीक आहे की नाही याची स्पष्ट कल्पना निवेदनाचा जो सारांश वृत्तपत्रात प्रसिद्ध झाला त्यावरून येत नाही, तसेच केवळ युरोपिअन कम्युनिस्ट पक्षांना नव्हे, तर जगातील सर्वच कम्युनिस्ट पक्षांना अशी स्वायत्तता मिळायला हवी. □

# बँकांचे राष्ट्रीयीकरण खरोखर यशस्वी झाले का ?

प्रा. राजगुरू द. आगरकर

१९ जुलै १९७६ रोजी आपल्या देशातील प्रमुख १४ व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाला ७ वर्षे पूर्ण होत आहेत. सात वर्षांचा काल हा सिंहावलोकनाच्या दृष्टीने पुरेसा आहे. या सात वर्षांच्या कालावधीत बँका आपली (राष्ट्रीयीकरणाची) उद्दिष्टे कितपत साध्य करू शकल्या आणि झालेले राष्ट्रीयीकरण अर्थव्यवस्थेस पोषक आहे का ? किंवा आपल्या बँकांच्या रचनेत आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. या प्रश्नाचा विचार आता करणे आवश्यक आहे.

**राष्ट्रीयीकरण झाले म्हणजे काय ? :** १९६९ साली बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले तेव्हा अनेक चांगले उद्देश डोळ्यासमोर ठेवले होते. कायदेशीरदृष्टया बँका राष्ट्राच्या मालकीच्या झाल्या. बँकांना नुकसानभरपाई मिळाली, पण भागधारकांत वाटली गेली नाही. नुकसानभरपाई मिळाली ती, बँकांच्या बाजारातील शेअर्सच्या किमतीपेक्षा जास्त मिळाली. ही नुकसानभरपाई वैयक्तिक न देता कंपन्यांना दिल्यामुळे कंपन्या अन्यत्र पैसा गुंतवू शकल्या. या बँकांचे नियंत्रण सरकारने नेमलेल्या संचालक मंडळाकडे गेले. सरकारने सर्व मालकी व नियंत्रण स्वतःकडे घेतले. स्टेट बँकेवर सरकारचे जेवढे नियंत्रण नाही त्यापेक्षा जास्त नियंत्रण या १४ बँकांवर आले. संसदेने केलेला कायदा आणि सरकारी नियंत्रण या पलिकडे बँकांच्या व्यवहारात विशेष फरक पडला नाही. राष्ट्रीयीकरणानंतर एकंदर बँकांच्या व्यवहारात उद्दिष्टात बदल होणे आवश्यक होते, पण तसे घडले नाही असे खेदाने म्हणावे लागते. या राष्ट्रीयीकरणामुळे बँकांना पूर्वीच्या व्यवहारासाठी सरकारी छत्र मिळाले.

**राष्ट्रीयीकृत बँका व खाजगी बँका :** राष्ट्रीयीकरण झालेल्या बँका व खाजगी बँका यांचा तुलनात्मक विचार केल्यास खाजगी बँका सरकारी पाठबळ नसताना अधिक यशस्वी झाल्या आहेत असेच दिसून येईल. १९६८–६९ साली राष्ट्रीयीकृत बँकांजवळ ३८९७ कोटी रु.च्या ठेवी होत्या. त्या जानेवारी १९७६ मध्ये ११,५०० कोटी रु. झाल्या. ही वाढ साधारणपणे २·५५ टक्के होती. १९६८–६९ सालात खाजगी पण राष्ट्रीयीकरण न झालेल्या बँकांच्या ठेवी ४४१ कोटी रु. होत्या. त्या जानेवारी ७६ पर्यंत १८६४ कोटी रु. झाल्या. ही वाढ ४·२३ टक्के होती. बँकांच्या शाखांच्या बाबतीत विचार केल्यास, खाजगी बँका राष्ट्रीयीकृत बँकांपेक्षा आघाडीवर आहेत. जून १९६९ मध्ये राष्ट्रीयीकृत बँकांच्या ६५९५ शाखा होत्या. जून १९७५ मध्ये या शाखांची संख्या १५०७७ इतकी झाली. ही झालेली वाढ साधारणपणे २·२१ पट आहे. यांपैकी स्टेट बँकेच्या शाखांची वाढ १·९५ पट झाली. राष्ट्रीयीकृत बँकांची २·३९ पट वाढ झाली. याच काळात परकीय बँका सोडून इतर खाजगी क्षेत्रातील बँकांच्या शाखा २·५६ पट वाढल्या. जून १९६९ मध्ये या बँकांच्या शाखा १३२ होत्या त्या जून १९७५ पर्यंत ३३८५ झाल्या. राष्ट्रीयीकृत बँका खाजगी बँकांपेक्षा मागे राहत असतील, तर असे का होते याचा शोध घेण्याची वेळ आली आहे. या राष्ट्रीयीकृत बँका कमी जाहिराती करतात असेही नाही.

**हानिकारक स्पर्धा :** राष्ट्रीयीकृत बँकांची परस्परांमधली स्पर्धा सुदृढ स्पर्धा नाही. बँकांना सरकारी संरक्षण मिळालेले असल्यामुळे वाईट तारणावर कर्जे, स्पर्धा यांनासुद्धा संरक्षण मिळालेले आहे. अशा प्रकारच्या स्पर्धा काही मुठभर लोकांना फायदेशीर असल्या तरी, समाजाला याची किंमत द्यावी लागते. ज्या घटकांचा फायदा व्हावा या उद्देशाने राष्ट्रीयीकरण करण्यात आले आहे त्या घटकांचा फायदा होत नाही. राष्ट्राच्या आर्थिक उद्दिष्टामध्येसुद्धा यामुळे अडथळे निर्माण होतात. काही बँका दीर्घकालीन ठेवींवर दरमहा व्याज देतात. राष्ट्राचा चलनवाढ रोखायचा प्रयत्न असेल तर अशा प्रकारचे धोरण (व्याज देणे) सरकारी प्रयत्नांना घातक ठरते. या काळात सरकार लोकांच्या हातातला पैसा काढून घ्यायचा प्रयत्न करत असते, पण बँकांनी ठेवीदार आकर्षण्यासाठी दरमहा व्याज द्यायला सुरुवात केली तर, लोकांच्या हातातला पैसा वाढतो. या पैशाचा पुनर्गुंतवणुकीसाठी उपयोग होत नाही. वास्तवत: या बँका एकाच प्रकारचे कार्य करीत आहेत. राष्ट्राच्या मालकीच्या आहेत, मग यांच्या जाहिराती वेगळ्या का दिल्या जातात व प्रचंड प्रमाणात राष्ट्राचा, समाजाचा पैसा खर्च का केला जातो. ठेवीदारांना आकर्षित करण्यासाठी अनेक अमिषे दाखवली जातात. उदा. दिर्घकालीन ठेवी देणाऱ्या ठेवीदारांना परदेशच्या प्रवासाचे तिकीट देणे, सुटकेस, टी. व्ही. यांसारख्या भेटी देणे. सुदैवाने या प्रकारच्या सवलतींवर रिझर्व्ह बँकेने नुकतीच बंदी घातली आहे, पण ठेवीदारांना फसवण्याचा मार्ग अद्याप खुला आहे. या बँका व्याजाचे दर सरळव्याजाने सांगून जणू काही आपली एकच बँक जास्त दराने व्याज देत आहे असे भासवतात. अशीच स्पर्धा बँकांच्या शाखा उघडताना पण दिसून येते. शहरातले प्रमुख रस्ते बँकांनी भरले आहेत, तर ग्रामीण भागात पुरेशा शाखा नाहीत. ज्या ठिकाणी फायदा आहे अशा भागात सर्वच बँका घुसायचा प्रयत्न करतात. या बाबतीतली स्पर्धा नष्ट होणे आवश्यक आहे. शाखा उघडण्याच्या बाबतीत काही बंधने घातली गेली पाहिजेत. आज सात वर्षानंतरसुद्धा भौगोलिक असमतोल नष्ट झालेला नाही.

**ग्रामीण भागातील विकास :** या बँकांचे राष्ट्रीयीकरण करताना देशातील ग्रामीण भागात बँकांच्या सेवा उपलब्ध नाहीत. खेड्यातील बचती एकत्रित केल्या जात नाहीत. ह्या त्रुटी भरून काढण्याचा उद्देश समोर ठेवण्यात आला होता. भारतासारख्या विकसनशील

देशात ह्या त्रुटी भरून निघणे आवश्यक होते व राष्ट्रीयीकृत बँका हे कार्य यशस्वीपणे दूर करू शकतील असे वाटत होते. या सात वर्षांच्या कालावधीत परिस्थितीत विशेष फरक पडलेला नाही. जून १९६९ मध्ये ग्रामीण भागातील बँकांच्या शाखांची संख्या १८३२ होती ती जून १९७५ मध्ये ५८०६ व सप्टेंबर ७५ पर्यंत ६०५८ इतकी झाली. म्हणजे सप्टेंबर ७५ पर्यंत ४२२६ शाखांची भर पडली. या काळात एकूण शाखांशी ग्रामीण भागातील शाखांचे प्रमाण २२·४% पासून ३६·४% पर्यंत वाढले.

वास्तवतः देशातील ग्रामीण भाग १९७१ च्या लोकसंख्येप्रमाणे ठरवले आहेत. १०,००० किंवा त्यापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या भागांचा समावेश ग्रामीण भागात केला जातो. आज या व्याख्येप्रमाणे ठरवले गेलेले ग्रामीण भाग ग्रामीण भाग राहिलेले नाहीत. या भागांचे रूपांतर लहान लहान शहरांतून (Semi Urban) झाले आहे. व्याख्या कायम ठेवून आज परत जर ग्रामीण भागाची मोजदाद आजच्या लोकसंख्येच्या आधारावर केली तर, ग्रामीण भागातील शाखांची संख्या कमीच भरेल व शहरी भागाशी ग्रामीण शाखांचे असलेले प्रमाण पण कमी होईल. बंगालमधील सहागनी, बेलूर, जलपैगुडी इ. ठिकाणे ग्रामीण म्हणून नोंदवली गेली असली तरी, आज ती औद्योगिक केंद्रे किंवा लहान शहरेच आहेत. ज्या शहरांत बँकांची जाळी पसरलेली आहेत अशा भागांत नवीन शाखा उघण्यापेक्षा ग्रामीण भागांत शाखा उघडणे अधिक फायदेशीर असते, कारण या शाखा अधिक ठेवी गोळा करू शकतात. सरकार ५० ग्रामीण बँका या वर्षाअखेरीपर्यंत उघडणार आहे. पण या बँका राष्ट्रातील सर्व खेड्यांची गरज भागवण्याच्या दृष्टीने नक्कीच पुरेशा नाहीत. २० कलमी कार्यक्रमाखाली सरकार दुर्बल घटकांना मदतीचा हात पुढे करत असतानाबँकांचे माध्यम नसेल तर, कार्यक्रमाच्या यशस्वीतेवर मर्यादा पडतील. सहकारी बँकांच्या जोडीला व्यापारी बँका आवश्यक आहेत. या बँकांच्या किती शाखांची देशात पुढील दोन–तीन वर्षांत आवश्यकता आहे याचा अंदाज घेऊन सरकारने आपल्या बँकांच्या शाखांसाठी परवाना पद्धतीत बदल करावेत. नवा कार्यक्रम राबवत असताना 'गाव तिथे बँक' ही नवी घोषणा स्वीकारणे आवश्यक आहे.

**ग्रामीण ठेवी व कर्जे :** या बँकांनी ग्रामीण भागांत गोळा केलेल्या ठेवींपैकी अवघ्या ७·८% ठेवी या ग्रामीण भागांतल्या होत्या. या देशात गरिबी आहे आणि विशेषतः खेड्यांतून मोठ्या प्रमाणात आहे. बँकांच्या राष्ट्रीयीकरणामागचा उद्देश खेड्यांत भांडवलाचा पुरवठा व्हावा, दुर्बल घटकांना मदत व्हावी हा होता. पण गोळा केलेल्या ठेवींपैकी सुमारे २/३ ठेवी कर्ज या स्वरूपात खेड्यांत दिल्या गेल्या. आसामसारख्या मागासलेल्या राज्यात ११·८४ कोटी रु. ठेवींच्या स्वरूपात गोळा झाल्या होत्या. यांपैकी फक्त २·०५ कोटी रु. कर्जाच्या रूपाने दिल्या गेल्या. तामिळनाडू, आंध्रप्रदेश या दोन प्रदेशांत ग्रामीण भागांतील ठेवींपेक्षा दिलेली कर्जे जास्त होती. अन्यत्र मात्र ठेवी जास्त व कर्जे कमी अशीच परिस्थिती होती. याचा अर्थ ग्रामीण भागांतील शाखा भांडवल गोळा करणारी केंद्रे बनल्या. या भागांतील बँकांना भरून द्यावी लागणारी कागदपत्रे, दूर अंतरावर असलेल्या मुख्य कार्यालयाकडून केले जाणारे नियंत्रण या कारणांमुळे खेड्यांतील लोक कर्जे घ्यायला सहजी जात नाहीत. या व यांसारख्या इतर अडचणी दूर करणे आवश्यक आहे.

**लीड बँकांचे यश :** लीड बँकेची योजना राष्ट्रीयीकरणानंतर पुढे आली. प्रत्येक बँकेला या योजनेनुसार प्रदेश वाटून दिले होते. बँकांनी या प्रदेशांची पाहणी करून विकासासाठी मदत करायची होती, नवीन व्यवसायांना संयोजकांना प्रोत्साहन द्यायचे होते. वास्तवतः ही एक सुंदर योजना होती. लीड बँकेने अन्य बँकांबरोबर शाखा उघडायच्या होत्या. विकसनशील क्षेत्रांचा शोध घ्यायचा होता. कर्जासाठी प्रोत्साहन द्यायचे होते. ग्रामीण भागातील लोकांना बँकेजवळ आणायचे होते. पण प्रत्यक्षात विशेष काहीच घडले नाही. बँकांना शाखा उघडण्यासाठी परवाने देताना एखाद्या भागातील आवश्यकतेपेक्षा बँकांची सोय पाहण्यात आली. सरकारी छत्राखाली असलेल्या बँकांनी ही योजना राबवतानापण स्पर्धेकडे अधिक लक्ष दिले. परिणामतः मुख्य कार्यालयाचे आदेश पोचण्यास अधिक वेळ लागू लागला. बँकांनी १००-१५० मैलांवर असलेल्या, प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या भागात शाखा उघडल्या. काही लीड बँकांच्या बाबतीत आज अशी स्थिती दिसून येते की, या बँकांच्या अवघ्या एक किंवा दोन शाखा त्यांना दिलेल्या प्रदेशात उघडल्या आहेत. नोव्हेंबर १९७५ पर्यंत या योजनेखाली सहकारी बँकांनी १०० कोटी रु., तर या बँकांनी अवघे २४ कोटी रु. कर्जाच्या स्वरूपात दिले. दिल्या गेलेल्या १०,००० कोटी रु. पैकी अवघे १२५ कोटी रु. गरिबांना दिले गेले. या बँकांतून आज ६ वर्षांनंतरसुद्धा योग्य असे कर्मचारी नाहीत आणि परिणामतः ग्रामीण भागात कार्य करणे अजूनही जड जाते असे सांगतात. वास्तवतः अशा प्रकारच्या अडचणी आता चालवून घेणे योग्य नाही.

या सगळ्याचा अर्थ राष्ट्रीयीकरणानंतर बँकांच्या कार्यपद्धतीत किंवा बँकांच्या वाटपात विशेष बदल झालेला नाही. कदाचित आपल्या देशातील बँकांची रचना चुकीची असावी की काय अशीही शंका येते. अन्यतः राष्ट्रीयीकरणानंतरच्या सहा वर्षांनंतर बदल होणे आवश्यक होते. भारतासारख्या खंडप्राय देशात अमेरिका, इंग्लंड किंवा अन्य एखाद्या प्रगत वा लहान राष्ट्रातील बँकांची पद्धती आणण्याचा विचार करणे अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण करणारे ठरेल.

**पर्यायी रचना :** देशात एकच मोठी सुमारे २० ते ३० हजार शाखा असलेली बँक ही कल्पनाच अशक्य आहे. मुख्य कार्यालय देशात कुठेही ठेवले तरी, व्यवस्थापन, दळणवळण यादृष्टीने या क्षेत्रातली आपली पातळी पाहता हे अवजडच ठरेल. विकासाच्या दृष्टिकोनातूनसुद्धा ही पद्धती उपयुक्त ठरणार नाही. शिवाय अशी एकच बँक देशात असल्यास ती रिझर्व्ह बँकेइतकीच बलवान असेल व अर्थविषयक मध्यवर्ती बँकेचे नियंत्रण कमी होईल. शिवाय स्टेट बँकेशी या मोठ्या बँकेची स्पर्धा सुरू होईल.

याला पर्याय म्हणून लहान बँकांचे जाळे पसरावे असेही सुचवले जाते. प्रत्येक जिल्हा पातळीवर एक बँक असावी. या बँकेच्या शाखा जिल्ह्यापुरत्या मर्यादित असाव्यात. अशा बँका आकारमानाने लहान असल्यामुळे आवश्यक त्या प्रमाणात मदत करू शकणार नाहीत. या

पृष्ठ २७ वर

# तिसऱ्या शतकात होऊन गेलेल्या एका जगन्मान्य भारतीय कामसूत्रकाराच्या जीवनावर आधारलेली एक ललितरम्य कादंबरी ( तीन )

# वा त्स्या य न

दि. बा. मोकाशी

## । कामसूत्रे लिही ।

क्षिप्रेपलीकडच्या गुरूच्या आश्रमाकडे नाव हेलकावे घेत चालली होती. त्या हेलकाव्यांतून वात्स्यायनाने महेश्वरदत्ताकडे पाहिले. अगदी गंभीर दृष्टीने तो नदीपलीकडे पाहत होता. वेशेतला त्याचा चेहरा आणि आंताचा यात विलक्षण फरक पडला होता. कसला विचार करीत आहे तो ? पूर्वायुष्याबद्दल की गुरूच्या भेटीबद्दल ?

गुरुजींच्या भेटीला घाबरण्याचे त्याला काही कारण नाही. गुरुजी नमस्कार करिताच आशीर्वाद देत विचारतील, ' क्षेम आहे ना ?' त्यांनी कधी कुणाला, तुझे अर्थार्जन किती, तू काय करतोस, असे विचारले नाही. जीवनाच्या तऱ्हा अनेक असतात. त्यांनी मान्य करून टाकले आहे.

क्षिप्रेचा किनारा जवळ येत होता. तिकडे पाहत असता वात्स्यायनाच्या मनात आले, हा प्रवाह आपण अनेकदा ओलांडला आहे. माताच आपणास आश्रमात पोहोचवी व घरी घेऊन येई. पित्याने पहिल्यांदा आणून सोडले तेवढेच. आणि घरात काही विपरित दिसणार नाही असा विश्वास असे तेव्हाच ती आपल्याला घरी आणी. पण काही वेळा तिचा होरा चुके. एकदा आपण घरी आलो असता कुणातरी पित्याने आपल्या चार कन्यका वेशेत घालायला आणल्या होत्या आणि त्या कुमारिका एकमेकींच्या गळचात गळे घालून सारख्या रडत होत्या. दुसऱ्या एका वेळेस एक गणिका आली होती. तिच्या सर्वांगावर माराच्या जखमा होत्या आणि ती सारखी विव्हळत होती. तिसऱ्या एका वेळी घरातल्या कधी उघडचा न दिसलेल्या खोलीत आपण शिरलो. पुढचा दरवाजा सोडला तर, घरात त्याच एका खोलीला दार होते आणि ते सतत बंद असल्याने आपले कुतहूलही वाढले होते. आपण त्या खोलीत शिरलो. खोलीच्या तक्तपोशीपासून अनेक वनस्पती टांगलेल्या होत्या आणि उग्रवासाने खोली भरलेली होती. दोन सेवक लाकडाचे ठोकळे पुढे घेऊन त्यावर काहीतरी तांब्याचे ठोकत आणि घाशीत बसले होते. त्यांच्या हाताशी तांब्याची वळी आणि टोपणे पडलेली होती. ती इतकी चकचकीत आणि गुळगुळीत होती !

त्या वेळी आपल्या बालमनाला त्या वस्तू पाहाव्याशा—हातात घ्याव्याशा वाटल्या आणि आईने मागून येऊन आपणाला ओढीत बाहेर का नेले आणि वेताने का झोडपले कळले नाही.

पुढे आपण बाभ्रव्यांतर्गत कुचुमाराचे औपनिषदिक अधिकरण वाचले तेव्हा आपल्याला त्या खोलीचे रहस्य कळले. त्या टांगलेल्या औषधी मंदकाम पुरुषांसाठी होत्या व तांब्याच्या तारेची साधने अतिकामी स्त्रियांसाठी होती. औषधी आणि साधने विकून आपला पिता पुष्कळ धन मिळवीत होता. आता मात्र आपण सांगू की, कामशास्त्रातील तंत्र आणि आवाप यांतील अधिकरणे वाचून उपाय झाला नाही, तरच औपनिषदिकातील औषधी व साधने वापरावीत. पण आपल्याला कुणी विचारणार नाही आणि त्या वेळच्या त्या आठवणीही नकोत. अवंती सोडून नगरला गेलो तेव्हा गुरू म्हणाले होते,

' मल्लनाग ! जीवनाच्या सगळ्या तऱ्हा मान्य कर. स्वतःचे सुख कशात आहे जाणून घे. पण ते सुख घेताना दुसऱ्याला दुःख होत नाही असे पाहा. अप्रिय गोष्टी विसर. प्रिय गोष्टी आठवीत जा. म्हणजे चित्तक्षोभ होत नाही. '

क्षिप्रेच्या पलीकडील तीरावरील माणसे आता स्पष्ट कळू लागली. महेश्वरदत्त मौन सोडून भावनाविवशतेने म्हणाला,

' मित्रा ! आपण जेव्हा गुरूच्या आश्रमात प्रथम गेलो तेव्हा आमच्या सजवलेल्या गाडीतून गेलो होतो. बरोबर दुसरी बैलगाडी होती आणि त्यात मेवामिठाई, फळे व धान्य होते. सगळी मुले माझ्या वैभवाला पाहत राहिली होती. आज मी निष्कांचन झालोय. '

एकदम हसून तो म्हणाला,

' नाही—निष्कांचन कसा ! हा हार आहे की. '

वात्स्यायन काही बोलला नाही. सगळे बोलण्यापलीकडील होते. उदार हृदयीही विट असतो. एवढंच ? महेश्वरदत्तावरून विट ठरवावयाचा तर, आणखी पुष्कळ सांगता येईल. वात्स्यायन, वस्त्रात गुरूसाठी आणलेली फळे सांभाळीत आश्रमाच्या पायऱ्या चढत असता आणि आपण पुढे व्हावे की, महेश्वरदत्ताला पुढे करावे या विचारात असता, महेश्वरदत्ताने पुढे होऊन गुरूच्या पावलांवर केव्हाच डोके टेकले होते. डोके वर केल्यावर महेश्वरदत्त काही म्हणत होता का ? ' हा हार आहे —हा हार आहे की ! ' की काहीच म्हणाला नव्हता? बघ बघ ! त्याने खरोखरीच गळचातला हार काढलाय—गुरुजींच्या पायावर ठेवताना किती प्रसन्न झालंय त्याचे तोंड !

हार गुरूपुढे ठेऊन महेश्वरदत्त म्हणाला,

' गुरूवर्य ! पूर्वीच्या एका श्रीमान श्रेष्ठीच्या पुत्राचे, आणि आज

विट झालेल्या या शिष्याचे वंदन स्वीकारावे.'

गुरू ओठात हसून म्हणाले,

'आयुष्मान् भव ! बसा ! मल्लनाग ! क्षेम आहे ना ?'

दोघे बसल्यावर महेश्वरदत्त म्हणाला,

'गुरूवर्य ! तुम्ही आम्हाला नेहमी म्हणत असा–आयुष्यात प्रत्येकाने एक ग्रंथ तरी लिहावा. तुम्ही सांगत असा, ग्रंथ कसाही होवो, ग्रंथ लिहिल्याने ग्रंथकाराचे कष्ट कळतात आणि ग्रंथाविषयी आस्था राहते. शिवाय ग्रंथ लिहिताना चारी बाजूंनी विचार करावा लागतो. ती सवय पुढे आयुष्यातही उपयोगी पडते. मी एक ग्रंथ लिहावयाचा म्हणतो.'

गुरू म्हणाले,

'त्वरित आरंभ कर.'

महेश्वरदत्त म्हणाला,

'करायलाच हवा. डोक्यात खूप आहे.'

वात्स्यायनाने हसत म्हटले,

'कामसूत्र लिहीणार आहेस का ?'

'नाही.' महेश्वरदत्त म्हणाला, 'दत्तकाचे एक वशिक अधिकरण आहे तेवढे पुरे आहे. वेश्या आणि गणिका यांच्यासाठी लिहिलेले हे अधिकरण त्या वाचतात. कामसूत्रातले तेवढेच आता उरले आहे. शिवाय शास्त्र वगैरे लिहीणं आपल्याला जमायचे नाही. मी लिहिला तर भाण लिहीन. गुरूदेव ! यालाच सांगा कामसूत्रे लिहायला. कामसूत्राचा ग्रंथ आता नाही तरी उरला नाहीच.'

वात्स्यायन म्हणाला,

'तुझे काम माझ्यावर लोटू नको.'

हसत महेश्वरदत्त म्हणाला,

'कामसूत्रे लिहिणे अवघड नाही. फक्त दोन अधिकरणे लिहिली की झाले. एक सांप्रायोगिक, दुसरे वैशिक. त्यातले मुख्य वैशिकच. कारण आज अवंतीत वेश्याच आहेत.

गुरुजी म्हणाले,

'महेश्वरदत्ता ! ही टीका अप्रस्तुत आहे. अवंतीतील सर्व स्त्रिया वेश्या आहेत हे म्हणणे अशास्त्रीय आहे. त्यासंबंधी एक कथा आहे.'

गुरुजींनी रसाळपणे कथा सुरू केली. ते म्हणाले,

'एकदा एक व्यापारी, एक सैनिक आणि एक विट अशा तिघांची प्रवासात गाठ पडली. तिघे बहुप्रवासी होते. वृक्षाखाली जेवण करून गोष्टी करीत असता देशोदेशींच्या स्त्रियांविषयी बोलणी निघाली. तिघांचेही एक मत झाले की, चहूकडे स्त्रिया स्वैरवर्तनी झाल्या आहेत. मग प्रत्येकजण आपला एकएक अनुभव सांगू लागला. प्रथम व्यापाऱ्याने सांगितले की, दक्षिणपथावरील दक्षिणापूर गावातून त्याचे लमाण जात असता, गावातील स्त्रिया आपापल्या घराबाहेर येऊन ते पाहत उभ्या होत्या. त्यांतील एका स्त्रीने त्याला गुप्तपणे खूण करून आपल्या घरी नेले. तिचा नवरा सैनिक असल्यामुळे परदेशी गेला होता. या व्यापाऱ्यास त्या स्त्रीने अत्यंत प्रेमाने तीन दिवस आणि तीन रात्र घरी ठेवून भोग देऊन त्याचा शीण घालवल्यावर मोठ्या कष्टी अंतःकरणाने त्याला निरोप दिला.

व्यापाऱ्याचे बोलणे ऐकताच सैनिक संतापून तलवार उपसून म्हणाला, 'अधमा ! दक्षिणापूर हे माझे गाव आहे आणि त्या गावात कुणीही स्वैरिणी नाही.'

संतापलेल्या सैनिकास विटाने कसेतरी आवरले आणि त्यालाच आपला अनुभव सांगायला विनविले. तेव्हा शांत होऊन सैनिक म्हणाला, 'एकदा युद्धात मिळवलेले धन घेऊन मी माझ्या गावाकडे येत होतो. मार्गात सतत चार दिवस अरण्यातून प्रवास झाल्याने मी थकलो होतो. त्यामुळे जेव्हा अरण्य संपून कुंडणगाव लागले तेव्हा मला फार बरे वाटले. कुंडण गावात मी एका घराच्या ओटीवर पथारी टेकली आणि सुकलेल्या भाकऱ्या काढून त्या कशातरी चघळीत क्षुधा भागवू लागलो. तेवढ्यात घरातून एका दासीने बाहेर येऊन मला हाताने धरून नम्रतेने आत नेले. मग स्नानादि संस्कार करून, उत्तम रेशमी वस्त्रे देऊन त्या दयाळू दासीने मला एका शृंगारलेल्या खोलीत आणून पाटावर बसवले. आता काय होणार हे न कळून मी अस्वस्थ असता दासी म्हणाली,

'हे भाग्यवान सैनिका ! थोड्याच अवधीत माझी धनीण स्वतः जेवणाचे सुग्रास ताट घेऊन येईल. अरे बाबा ! तू अशा गावात आला आहेस की, जिथे स्त्रियांना सैनिकाचा मोह आवरत नाही.'

दासी निघून गेली आणि खरोखरीच एक सुंदर स्त्री, लज्जेने मुख खाली ठेवून अन्नाचे ताट आणून माझ्यापुढे ठेवती झाली. पण तरीही मला ते गोड लागेना. माझ्या कशात असलेले धन मी वारंवार चाचपून पाहू लागलो कारण सैनिकाच्या धनावर अनेक स्त्रिया टपून असतात. माझे चाचपणे पाहून मला वारा घालीत ती सुंदर स्त्री म्हणाली, 'हे शूर पुरुषा ! निश्चितपणे भोजन कर. या कुंडणगावात तुझे धन जाणार नाही. तुझे मन गेले तर मात्र दोष देऊ नको.'

त्या स्त्रीचा पती विट होता आणि पाटलीपुत्रास गेला होता. आठ दिवस आठ रात्री तिने मला ठेवून घेतले आणि तिचा पती परत येण्याचा दिवस आल्याने अश्रूपूर्ण डोळ्यांनी तिने मला निरोप दिला.'

सैनिकाने कुंडण म्हणून गावाचे नाव घेताच विटाचे तोंड लाल होऊ लागले होते. सैनिकाचा अनुभव सांगून संपताच विट त्याच्या अंगावर धावून जात म्हणाला,– 'अरे निर्लज्जा ! कुंडण हे माझे गाव आहे. सैनिक येवो, कुणी येवो, पती बाहेरगावी गेला असता त्या व्रताने राहतात. तू असत्य बोलतो आहेस त्याचे प्रायश्चित्त घे.'

संतापाने उगारलेला विटाचा हात व्यापाऱ्याने धरून त्याला समजावले आणि त्याला अनुभव सांगण्यास विनंती केली, तेव्हा विटाने सांगितले की, तो कित्येक दिवसांत अवंतीतून बाहेर गेला नव्हता. काशी येथे भावाचा विवाह ठरल्याने तो एक लमाण गाठून त्यांजबरोबर तिकडे निघाला. दुसऱ्या एका लमाणाबरोबर प्रवास करणाऱ्या एका तरुण स्त्रीची मार्गातील एका धर्मशाळेत त्याची गाठ पडली. ती पाटलिपुत्रास जाऊन गणिका होणार होती. मग तिने आपली हकीगतही सांगितली. कांचनपूर गावातील एका धनिकाची ती पत्नी होती. पण गावातील स्त्रियांना पत्नी होण्यापेक्षा गणिका होणे जास्त प्रिय असल्याने आणि गावात राहून तसे केल्यास पती आपला वधही करील ही भीती असल्याने तिने पाटलीपुत्रास जाण्याचे ठरविले आणि पती व्यापारानिमित्त परगावी गेलेला पाहून, आपले अलंकार आणि काही धन घेऊन ती पाटलिपुत्रास निघालेल्या या लमाणास येऊन मिळाली.

विटाने त्या स्त्रीच्या गावाचे नाव सांगताच, यावेळी व्यापारी

संतापाने उठला. तो म्हणाला,– 'अरे नीचकर्म्या ! ते माझे गाव आहे. तेथील प्रत्येक स्त्री पतिधर्मात स्वतःला धन्य मानते. पती दूरदेशी गेला की, ती अलंकार घालीत नाही. केस बांधीत नाही आणि साधे वस्त्र नेसते. माझ्या गावातील स्त्रियांबद्दल आणखी एक शब्द बोललास तर, सेवकाकरवी मी तुला ठार करवीन.'

कथा संपवून गुरू म्हणाले,

'महेश्वरदत्त ! हे असे आहे. एका स्वैर स्त्रीमुळे सर्व गावाला दोष लावणे योग्य नाही.' म्हणून अवंतीत काही स्वैरस्त्रिया असल्या तरी, अवंतीतील सर्व स्त्रिया स्वैर म्हणणे शास्त्रशुद्ध नाही. मल्लनाग ! कामसूत्रे पुन्हा लिहिण्याची वेळ आली आहे. महेश्वरदत्त म्हणतो ते सत्य आहे. बाभ्रव्याचे जे काही उरलंय ते विकारवश तेवढे उरले आहे. तेव्हा तू कामसूत्रे पुन्हा लिहावयास घे.'

वात्स्यायन हळूच म्हणाला,

'कठीण कार्य आहे ते.'

पण न ऐकल्यासारखे करून गुरू म्हणाले,

'तू बाभ्रव्याची कामसूत्रे उतरून घेतलीस तो ग्रंथ इथेच आहे. तुझा तू, तो घेऊन जा. त्याचे पठण कर. मनन कर. पुष्कळच मनन करावे लागेल तुला. कारण माणसांच्या वृत्ती आणि रिती कालगतीने बदलल्या आहेत. त्याकरिता लोकरिती पहा. अनेकांचे अनुभव ऐक, घाई नाही. हे एका आयुष्याचे कार्य आहे. काही प्रश्न पडले तर माझ्याकडे ये.'

'जशी आज्ञा गुरुदेव !' वात्स्यायन म्हणाला.

पुन्हा नदीवर येऊन होडीत बसल्यावर महेश्वरदत्त म्हणाला,

'मल्लनाग ! माझ्या आधी तुझा ग्रंथ होणार,' वात्स्यायन म्हणाला.

'लिहीला तर.'

महेश्वरदत्त म्हणाला,

'एकदा तुझ्या मनाने घेतल्यावर तू पद्धतशीर ग्रंथाच्या मागे लागशील.'

वात्स्यायन हसत म्हणाला,

'मनाने घेतले तर.'

'मी सांगतो तू मनावर घेणार. मी मात्र लिहितो लिहितो म्हणत असता माझा देहत्याग होईल.'

'तूही मनावर घे.'

'बाबा ! ग्रंथ लिहायला भूमिका लागते. ती मला नाही. मी लिहीलेच तर, सगळे नागडेउघडे लिहीन. लोकायतिकांचे नाव आधीच वाईट झालाय ते आणखी वाईट होईल. माझे लोकयतिकांवर प्रेम आहे. त्यांचा ऱ्हास मला पाहवणार नाही.'

'तू ऱ्हास मानतोस तर !'

'त्यांच्यावरच्या प्रेमामुळे. जिथे प्रेम असते तिथे कुणाला परस्थ राहता येत नाही – चार्वाकालाही. माझे प्रेम वेशेवर आहे. तिथली एकही व्यक्ती मला वाईट दिसत नाही. मी मद्यपि पाहिले. शेवटचा कार्षापण संपेपर्यंत वेश्येकडे लोळणारे पाहिले. जुगारात अंगावरचे वस्त्र देणारे पाहिले. कुणी कधी वाईट म्हणून मनात आले नाही. त्यांना अधर्मी म्हणून सोडून देणे माझ्याच्याने होणार नाही. तू ग्रंथ लिहीलासच तर सर्वांविषयी साहानुभूतीने लिही. या जगात चांगले काय आणि वाईट काय हे कुणाला कळलेले नाही.'

वात्स्यायन हसून म्हणाला,

'तू फारच गंभीर झालाहेस आज. असो. ग्रंथ लिहिला तर तुझ्या सांगण्याचा विचार अवश्य करीन.'

क्षिप्रेचा समोरचा किनारा येईपर्यंत दोघेही नंतर गप्प राहिले. वात्स्यायनाच्या मनात आले, हा आपल्याला घरी लोकायतिक म्हणाला, पण आपण आज तेवढे लोकायतिक राहिलो नाही. वर्णाश्रमधर्म आपणास ठीक वाटू लागला आहे. आश्रमांची कल्पना चांगली आहेच. फक्त ज्याच्या त्याच्या स्वभावाप्रमाणे आश्रमाचे वय ठरवण्याची व एखादा आश्रम वगळण्याची सोय असावी. आणि वर्णाबद्दल – जो वर्ण स्वीकारला त्याप्रमाणे वागावे. त्यात सुख लागते. आपले सुख आपणावर असते तसे समाजावरही असते. आपला पिता विट झाला, महेश्वरदत्त विट झाला. व्रिटाचा वर्ण त्यांनी मानला. दोघे सुखी झाले. पण आपल्या मातेला विटवर्णाशी जुळवून घेता आले नाही. ती दुःखी झाली. हा एक मुद्दा. आणखी दुसरे काही समाजाशी जुळवून घेण्याचे मुद्दे आपण मानतो, ते सोडले तर लोकायतिकांशी आपले जुळेल. उदाहरणार्थ ग्रंथाचा आरंभ परमेश्वराला नमस्कार करून न करिता, त्यांच्याप्रमाणे फक्त शास्त्रांना नमस्कार करून आपण करू. चाणक्याच्या अर्थशास्त्रासारखा. चाणक्याचे व आपले पटते. त्यांच्याप्रमाणेच ग्रंथारंभी आपण धर्मार्थ कामेभ्यो नमः एवढेच लिहू. आणि 'शास्त्रे प्रकृतत्वात' – हेच विषय शास्त्रांत येतात म्हणून त्या विषयांना नमस्कार. नंतर पूर्वाचार्यांना नमस्कार. परमेश्वराचा इथे संबंध नाही. आणि गृह्यसूत्रांतलेही आपण हवे ते घेऊ. महेश्वरदत्ताला हे सांगितले तर तो हसेल. पण लोकायतिक घोंगडी पांघरण्याचा आग्रह धरतात हे त्यांचे गृह्यसूत्रच नव्हे काय ?

होडीला धक्का बसला. हेलकावे घेत ती थांबली. वात्स्यायनाच्या पाठीवर थाप मारून महेश्वरदत्त म्हणाला,

'बघ ! तू ग्रंथाच्या विचारांत होतास की नाही ? आता तुझ्या डोक्यांत 'इति मल्लनागः' सुरू झाले आहे. होय ना ?'

'मल्लनाग नाही– इति वात्स्यायन.' मी काही लिहिलेच तर गोत्र नावाने. पण लिहीन असे वाटत नाही.'

□

# माणसांतला ऋतुकाल

मल्लनाग वात्स्यायनाने महेश्वरदत्ताला अर्ध्या वाटेतच सोडले. नावेतून उतरताक्षणीच त्याचे मन अस्वस्थ झाले होते. आणि नगराहून निघताना वाटणारी तगमग पुन्हा सुरू झाली होती. मन आवरण्याचा त्याने अतिशय यत्न केला. शेवटी तो महेश्वरदत्ताला म्हणाला,

'मी तुझ्याबरोबर येत नाही. सासुरवाडीस जातो.'

महेश्वराने गालात हसत विचारले,

'बायको आली आहे वाटतं ?'

वात्स्यायनाने मान हलविली. त्याच्या मनात आले, महेश्वरदत्तही हसतो आहे. दिवसभर याच्याबरोबर राहायचे ठरवले होते. तसेच करायला हवे होते. इतरांनाही स्त्रिया आहेत. महेश्वरदत्ताची पत्नी तर एकटी घरात असते. त्याला कसली भयशंका वाटत नाही. आपल्याला का वाटावी ?

मोठ्याने हसत महेश्वरदत्त म्हणत होता,

'तू बायकोच्या मागे आला आहेस तर? मी सदा दूर म्हणून माझी पत्नी कष्टी, तू सदा मागे मागे म्हणून तुझी पत्नी कष्टी. अरे स्त्रीला एकच एक स्थिती कधी आवडत नाही. तिला आपला पती दूरही लागतो आणि जवळही लागतो. एका क्षणी तिला रडावसं वाटतं, दुसऱ्या क्षणी तिला हसावसं वाटतं. त्यामुळेच आपणा पुरुषांना स्त्रीचे मन चंचल वाटते. बाबा! स्त्रीचे मन इतके एका शब्दात ओळखण्याइतके सोपे नाही. कामसूत्रे लिहिताना तू हे पण ध्यानात ठेव.'

वात्स्यायन हसून म्हणाला,

'कशाला तुझे तत्त्वज्ञान वाया घालवितोस. हिला दिवस गेले आहेत.'

वात्स्यायनाचे ऐकून महेश्वरदत्ताला आणखीच हसू फुटले. तो म्हणाला,

'मग तर तुला बाहेर हिंडायला कारणच मिळालं. अरे! वेशमधे येणाऱ्या निम्म्या पुरुषांच्या स्त्रिया गर्भार तरी असतात किंवा बाळंत तरी असतात. आम्हाला मूलच झाले नाही म्हणून ते पुरुषी दुःख मला कळत नाही. बाबा! माणूस हा फार विचित्र प्राणी आहे. इतर प्राण्यांप्रमाणे फक्त ऋतुकाळीच स्त्री पुरुषांच्या–कामवासना बळावल्या असत्या तर माणूस फार सुखी असता. पळ तू आता. इतर दुसरा कुणी तुझ्या जागी असता तर, त्याला मी वेश्येकडे खेचलेच असते. पण तू माझा मित्र आहेस आणि ऋतुकाल तू मानशील असा भरवसा वाटतो. जा! पत्नीच्या दर्शनातच तुला तृप्ती लाभो.'

हसत वात्स्यायनाच्या पाठीवर थाप मारून महेश्वरदत्त चालूही लागला. ◻

## श्वशूरगृह

अवंतीत अजून सकाळ रेंगाळत होत होती. मार्ग वाहू लागले नव्हते. एखाद दुसरा नागरिक गच्चीत उभा राहून दंतधावन करीत होता.त्यांतले एखाद्याचे डोळे सुजलेले, केस पिंजारलेले, तोंड फुलल्यासारखे होते. काल रात्री मद्य जास्त झाले असेल, किंवा द्यूतात द्रव्य गमावले असेल, किंवा उपभोगाचा अतिरेक केला असेल. रात्रभर प्रवास करून शिणलेला एक लमाणांचा तांडा रेंगाळत समोरून गेला. कळशा डोक्यावर रचून, सहज तोल सांभाळीत नेणाऱ्या पाच-सहा ललना, एकमेकांशी हातवारे करीत गोष्टी करीत चालल्या होत्या. गाडीत भोपळे घालून एक शेतकरी बाजाराकडे निघाला होता. हातात पूजापात्र घेऊन मंदिराकडे निघालेला एखादा नागरिक मध्येच दिसत होता.

वात्स्यायन शहराच्या मध्यावर आल्यावर बरीच वर्दळ सुरू झाली. उजव्या हाताला वेश आहे. येथून डावीकडचा रस्ता सासुरवाडीचा. हळूहळू दुकाने तुरळक होऊन मोठे प्रासाद लागतील. सेनापती बाहुबलीचा प्रासाद दुरूनच दिसेल. समोरच आपली सासुरवाडी.

चालता चालता समोरून एकदम त्याच्या छातीवर हात पडला. दचकून तो थबकला. कपाळावर गंधाचे पट्टे ओढलेला, फेटा बांधलेला एक वृद्ध ज्योतिषी म्हणत होता,

'बेटा! ऐकशील! तू मोठा भाग्यवान आहेस. तुझ्या हातून पूर्वजन्मीच्या पुण्याईने एक थोर ग्रंथ लिहून होणार आहे. त्या ग्रंथामुळे तुझे नाव साऱ्या भरतखंडात होईल.'

छातीवरचा हात काढून ज्योतिषी पुढे गेला. चकित झालेला वात्स्यायन काही क्षण स्तब्ध राहिला. मग झटकन वळून ज्योतिषामागे गेला आणि कनवटीची एक मुद्रा त्याने त्याच्या हातावर टेकली.

पुन्हा वळून सासुरवाडीकडे पावले टाकताना त्याच्या मनात आले, आधी गुरू, मग महेश्वरदत्त आणि नंतर हा–आपल्याला ग्रंथकार करायला का निघाले आहेत सारे? की महेश्वरदत्ताने खोडसाळपणे याला मुद्दाम धाडले. तेवढा खोडसाळ तो आहे. आपणही झटकन एक नाणे देऊन टाकले. म्हणजे ग्रंथकार होऊन कीर्ती मिळवायला आपल्याला हवी आहे. अवंतीत फारच ज्योतिषी झाले आहेत! एखादा ज्योतिषी फटकन सांगून पुढे जातो. त्यातले किती खरे होते कुणास ठाऊक? पण सांगितलेले चांगले असले तर, आपल्याप्रमाणेच ते खरे व्हावेसे वाटते सगळ्यांना.

कुणाला हे भविष्य सांगून हसायला गंमत येईल. समजा भविष्य पुढे खरे ठरले तर? हसणे विसरलेले असेल. पण तो ज्योतिषीही मेलेला असेल किंवा दूरदेशी असेल.

उगीचच हे सारे आपण अंगावर घेत आहोत. लिहिणार आहोत का आपण ग्रंथ? गुरूने दिलेला बाभ्रव्याचा ग्रंथ खाकेत त्याला जड वाटू लागला. त्याने खाकेतला ग्रंथ पाहूनच हे सांगितले असेल. धूर्त! आपणही फसलो. आता कुणाकडून तरी आपण ग्रंथकार होणार नाही असे भविष्य ऐकायला हवे. ते ऐकले की अधिक उणे होऊन बाकी शून्य राहील. त्याने इकडे तिकडे पाहिले. देवळांना अवंतीत तोटा नाही. जरा आडवाट करून एखाद्या देवळात शिरू. कुठेतरी भेटेलच एखादा ज्योतिषी.

एका छोट्या रस्त्यात वळून एका देवळाच्या कमानीखालून तो आवारात शिरला. आत पारावर समोरच ज्योतिषी बसलेला होता. याने तर खूप आडवी गंधे लावली आहेत आणि कानात बिगबाळी आहे! दाक्षिणात्य दिसतो!.

पायऱ्या उतरून वात्स्यायन त्याच्याकडे निघाला. तेवढ्यात हात वर करून तो ज्योतिषी ओरडला,

'महर्षी! तुमचीच वाट पाहत होतो.'

'माझी?' वात्स्यायनाने म्हटले.

'तुमचीच. तुमच्या मनात काही विचारायचे आहे.'

'काय विचारणाराय मी?'

'ग्रंथाबद्दल.'

वात्स्यायनाने नकळत विचारले,

'मग आपले उत्तर काय?'

'माझे उत्तर–तुम्ही ग्रंथ लिहाल. पण तो स्वतंत्र नाही आणि टीकाही नाही असा असेल. ग्रंथ तुमची अतिशय कीर्ती ठेवील. तो लिहून होईपर्यंत खूप मनःस्ताप करील. ग्रंथ लिहून होताच तुम्ही शांत व्हाल.'

वात्स्यायन देवळातून बाहेर आला तो गोंधळातच. ज्याने आपल्या छातीवर हात ठेवून भविष्य सांगितले, त्यानेच याला सांगितले असेल. त्यांचे संबंध असतील. भविष्य सगळं खोटं. हे महेश्वराने सुरू केले. आणखी कुणालाही विचारले तरी हेच उत्तर येईल. आपण कसलाही ग्रंथ लिहिणार नाही. सासुरवाडी जाताच हा 'बाभ्रव्य' फळीवर ठेवून देऊ आणि विसरून जाऊ.

आणि सासुरवाडी म्हणताच वात्स्यायनाची पावले थबकली. 'पशूप्रमाणे माणूस ऋतुकाळ पाळता तर?' महेश्वरदत्ताचे वाक्य त्याला आठवले. तर आपण ही काही योजनांची वाटचाल केलीच नसती. पण आपण केली. यात ऋतुकालाचा संबंध नाही. यात पत्नी-बद्दलची चिंता आहे. चिंता तरी कसली? कुमारी अवस्थेत पत्नी माहेरी होती, तेव्हा तिचे अस्तित्वही ठाऊक नव्हते. तेव्हा ती पडली किंवा आजारी झाली किंवा मित्रांत खेळली, कशाचे काही होते का? एखाद्या बालमित्राशी विवाह व्हावा असेही तेव्हा तिला वाटले असेल. पण आपल्याशी झाला. पत्नी कधी कधी बालपणीचे प्रसंग सांगे ते वात्स्यायनाला आठवले. बाहुलीच्या खेळात किंवा पुष्पे खुडण्याच्या खेळात किंवा वृक्षांवरच्या खेळात त्यावेळी घडलेल्या गमती सांगताना ती जेव्हा वारंवार एखाद्या मुलाचाच उल्लेख करी तेव्हा आपल्या अंगावर मत्सराचे शहारे येत. पुष्कळदा ती 'कदम्ब' नावाच्या खेळगड्याबद्दल बोले आणि आपल्याशी विवाह होण्याआधी तिला कुणी प्रिय असावे, त्याच्याशी तिने खेळ खेळलेले, हसलेले, धावलेले असावे याचे वैषम्य वाटे. आता तो बालमित्र मोठा झाला असेल आणि कुठे असेल? अवंतीतच असेल. पत्नी माहेरी गेल्यावर त्यांची गाठ होऊन दोघे बालपणीच्या आठवणी सांगून हसत असतील.

एकदम त्याच्या मस्तकात मत्सराचा संताप उसळला. पत्नीकडे कसे जावयाचे–तिला पाठोपाठ आल्याबद्दल काय सांगायचे, याबद्दलचा सारा संकोच त्यात वितळून गेला. त्याची पावले श्वशुरगृहाकडे वेगाने पड लागली. महेश्वरदत्ता! ऋतुकाल असो नसो, माणसांतल्या नराला या कारणासाठी पत्नीच्या मागे यावे लागते बरे!

काही पावलेच त्याचे मस्तक भडकलेले राहिले. चार पावलांनंतर त्याने स्वतःलाच विचारले, 'मल्लनाग! या कसल्या विचित्र कल्पना करतो आहेस! अरे! बालपणी तुलाही काही कुमारिका आवडल्या होत्या. त्याही अवंतीत असतील. तुला तुझ्या दोषामुळेच त्यांच्याशी बोलता येणार नाही. पण बोलता आले असते तर ती काय अयोग्य गोष्ट झाली असती?'

आणि जोरात पडणारी वात्स्यायनाची पावले मंदावली. आपण असे पाठोपाठ अवचित आलेले पाहून पत्नी आपल्याकडे कशी पाहील हे डोळ्यांसमोर येऊन तो वरमून गेला. ◻

## स्त्रियांनी कामशास्त्र शिकावे का?

वाड्यात शिरताच पहिल्याच चौकात आपल्या पत्नीला–धारणीला–पुढे येताना पाहून वात्स्यायनाने ओळखले की, आपणास दुरूनच पाहून एखाद्या दासीने धावत जाऊन वार्ता दिली असावी. दासीने आपण आल्याचे सांगताच धारणीच्या मुखावर काय भाव आला असेल देव जाणे! आता तरी ती स्मित करते आहे आणि त्यात आनंद आहे. सातव्या महिन्यातील पोटाने ती काहीशी बेढब आणि काहीशी सुंदर दिसत होती. तिच्या मागून काही अंतरावर तिची आई आणि दोन दासी लगबगीने येताना दिसल्या. धारणी स्मित करीत म्हणाली,

'झाल्या का गाठीभेटी?

मग मागे मान वळवून ती आईला म्हणाली,

'आई! काल विसरले सांगायला. ते अवंतीत मित्रांकडे गेले आणि मी इकडे आले. ते म्हणाले, तू पुढे जा, मी येतो मित्रांना भेटून.' मग वात्स्यायनाकडे वळून ती म्हणाली,

'आश्रमात गुरुंनाही भेटायचे होते ना? अग! सारखे गुरूंना भेटायचे चालले होते दोन वर्षे.'

एखादे मोठे ओझे उतरावे तसा वात्स्यायनाने श्वास सोडला. धारणीच्या डोळ्यांशी डोळा न देता तो म्हणाला,

'हो! भेटलो गुरूंना.'

'भोजन व्हावयाचे आहे ना?'

'हो!'

धारणी दासीला म्हणाली,

'स्नानाला पाणी काढ जा.'

आणि मग स्नान उरकून, भोजन होऊन माडीवर त्याला दिलेल्या खोलीत पलंगावर पडेपर्यंत धारणीशी काही बोलणे झाले नाही. भोजन होत असता ती वारा घालीत होती, मधूनच काही गोड पदार्थ वाढायला उठत होती. एकादे वेळेसच रोखून पाहत होती, पण त्यावेळी ओठांवर हसू होते. पलंगावर येऊन पडल्यावर आपण उगीच आलो अशी भावना वात्स्यायनाला येऊ लागली आणि आल्याने लाभलेली मनःशांती जाऊ लागली. तो शांत डोळे मिटून पडला. अंग उष्ण होत होते. पत्नीची पावले ऐकूनही त्याने डोळे उघडले नाहीत. चार लोकांच्यासमोर ती बोलली नाही. आता बोलेल. आजपर्यंत आपल्या अशा वर्तनाला ती कधी बोलली नाही. पण केव्हा तरी तिचा संयम जाईल. जायलाच हवा. गेला तर आपण दोष देणार नाही. आपले येणे चुकलेच.

पत्नीची पावले हळूहळू जवळ येऊन पलंगाशी थाबली. आपणास निद्रा लागलेली पाहून ती परत जाईल. त्याला आशा वाटली आणि अगदी अनपेक्षितपणे तिची हळुवार बोटे त्याच्या केसावर फिरली आणि तिच्या ओठांचा स्पर्श ओठांवर झाला.

तरी त्याने डोळे उघडले नाहीत. ती पलंगाच्या पायथ्याशी बसलेली त्याला कळली. मग त्याने अगदी हळूच डोळे उघडले आणि तिच्याकडे पाहत तो ओठात हसला. ती राग आल्यासारखे करीत पलंगावरून उठत म्हणाली,–

'तुम्ही जागे होता वाटतं?'

ती त्या रागात पाऊल पुढे टाकणार तोच तिची बोटे धरून ओढीत, तिला पलंगावर बसवीत आणि आपण शेजारी उठून बसला राहत तो म्हणाला,

'धारणी! मला यावं लागलं– यावं लागलं.'

आता एकटे असताना तिने काही म्हणू नये म्हणून हे तो झटकन

म्हणाला. आपण आतापर्यंत असे अनेकवेळा म्हटले आहे आणि आपल्यापासून तिला क्लेश होतात हे कळल्यापासून अनेकदा क्षमा मागितली आहे. मन न आवरून आपण तसेच क्लेशकारक वर्तन केलेले आहे. आणि आपल्या लक्षात आले आहे की, क्षमा मागताच क्षमा होते. पण आपण क्लेश देतो हे कळायला लागल्यावर क्षमा मागण्याचे प्रसंगही कमी होत गेले. कदाचित क्षमा न मागताही चालले असते. पण क्षमायाचना केवळ तिच्यासाठी नव्हती. आपल्यासाठी होती. आपले मन आवरायला सोपे जावे यासाठी होती. केव्हातरी ती क्षमा करणार नाही हीही भीती. पण मागच्या वेळेप्रमाणे यावेळीही ती मधुर हसली. त्याचा हात दाबून तिने विचारले,–

'केव्हा निघालात ?'

'काल, प्रातःकाळी.'

'इतका वेळ महेश्वरदत्ताकडेच होता ?'

'हो.' म्हणून वात्स्यायनाने महेश्वरदत्ताकडील घडलेले सर्व सांगितले. ती अगदी लक्षपूर्वक ऐकताना पाहून वात्स्यायनाच्या मनात आले, 'आपण तिला घडलेले सर्व सांगू लागलो तेव्हापासून आपले मन मोकळे होऊ लागले. पहिल्या पहिल्यांदा ती शांतपणे श्रोत्याचे काम करावयाची. मग ती आपले विचारही सांगू लागली. महेश्वरदत्ताकडचे सर्व सांगून तो म्हणाला,

'धारणी ! एकदा आपण दोघे त्याच्याकडे जाऊ.'

इतक्यात खालून तिच्या आईची हाक आली. लगबगीने उठत असता तिने त्याची बोटे पुन्हा दाबली आणि तिचा हात दूर होत असता वात्स्यायनाने चिमटा घेतला.

आणि ती गेल्यावर तिने घेतलेल्या चुंबनाचा रेंगाळणारा स्पर्श ओठांवर आठवत त्याला कितीतरी वेळ नवल वाटत राहिले. अवंतीतील सर्व स्त्रियांप्रमाणे चुंबन हे तिला किती अप्रिय होते हे त्याला आठवले. अवंतीतील स्त्रियांप्रमाणेच तिची चुंबनाइतकीच दंतक्षते किंवा नखक्षतेही आवडत नसत. 'खरे आर्य या अनार्य प्रकारांचा तिटकारा करितात' ती म्हणे– आपण तिला अनेकदा सांगून पाहिले होते की अन्य देशांतील आचार आणि वेष अवंतीत मान्य होऊं लागले आहेत. त्यापैकी जे सुख वाढवणारे असतील ते घेण्यास प्रत्यवाय नसावा. पण तिने ते मानले नव्हते. इतर देशांतील आर्यांत चुंबन मान्य आहे हे सांगूनही ऐकले नव्हते.

आणि इतके दिवस आपल्याला जे हवेहवेसे वाटत होते ते तिने आज द्यावे ! तिने चुंबन घेताना केसांवरून हळुवार हात फिरविला होता. आपण अस्वस्थ आहोत हे ओळखून ती आपणास शांत करण्याचा यत्न करीत होती. आपण पाठोपाठ आलो त्यामुळे ती रागावली नाही हे किती छान झाले !

विवाहाच्या त्या पहिल्या अंधळ्या उन्मत्त वर्षात आपण काय काय विपरित केले. तिने ते कसे घेतले कुणास ठाऊक ? त्या आवेगात, चुंबनेच काय पण दंतक्षते आणि नखक्षतेही आपल्या हातून केली गेली असतील. त्यावेळी अनेकदा ती उतरियाने आपले ऊर झाकून घेई आणि ओठ मुडपून वावरे. आणि एकदोनदा नखक्षतांना तेल लावीत विव्हळत असताना आपण बेडचांत येताच भांडे टाकून ती भेदरलेली अशी कुडाशी उभी राहिली आणि आपण त्याच अवस्थेत तिच्यावर दिलेल्या बळाने कुडाची भिंत पडली. गाय हंबरू लागली, इतर जनावरे धडपड करू लागली. पिंजऱ्यातले पक्षी त्या आवाजाने ओरडू लागले. सेवक धावत आले. ती लाजेने मेल्यासारखी पांढरी पडली.

त्यानंतर अतिकामसेवनामुळे आपण निर्बल झालो. त्यावेळची आपली अगतिकता आणि पत्नीच्या कामबळाची जाणीव केवढी दुःखकारक झाली होती ! कामसेवन हे एकमार्गी नसते, आणि स्त्रीला स्वतःची स्वतंत्र कामेच्छा असते हे तेव्हा कळले. पण कळूनही आपण काही शिकलो नाही.

एकाएकी पत्नी माहेरी निघाल्यापासून पोटात झालेली पोकळी सगळे शरीर व्यापते आहे असे वाटले. पत्नी आता रागावती तर बरे होते. आता येथून एकट्याला परत जाताना त्रास होईल. बाळंतपणासाठी आपण तिला ठेवावे किंवा आपण इथे फार न राहता परत जावे हे सांगण्यासाठी ती प्रेमात आली आहे का ? प्रत्येक स्त्री आपल्या पतीच्या विषयांत धूर्त असते.

अस्वस्थ होऊन तो पलंगावरून उठला आणि फेऱ्या घालू लागला आपल्यापासून दूर जाताना तिलाही यातना होत नसतील कशावरून ? त्याच्या एकदम मनात आले. हे मनात आले बरे झाले. असे झटकन आपल्या मनात दुसरे येते हे नेहमी बरे होते. त्याला वाटले. यातना होतात म्हणून कित्येक दिवस हवे असलेले तिने आपणास दिले. आपल्याला त्याचा आनंद व्हावयास हवा.

खोलीतून तो बाहेर गच्चीत आला. महेश्वरदत्त म्हणाला ते खरे आहे. पिल्लांची वेळ आली असता, पशुपक्षादिक नरांना कामे असतात, तशी यावेळी आपणास असती तर ? पिलांसाठी आणि मादीसाठी घरटे बांधावयाचे, चारा साठवायचा.

कठड्यावर रेलून उभा असता वात्स्यायनाने आखडलेला पाय लांब केला. पायांना झालेल्या हिरव्या पानांचा गार स्पर्श जाणवून त्याने खाली पाहिले. रचून ठेवलेली कमलपत्रे त्याच्या पायाच्या धक्क्याने विस्कटली होती. वाकून त्यांतले त्याने एक वर उचलले. पानांकडे पाहता पाहता त्याची नजर त्यांवर नखाने काढलेल्या हंस युगुलाकडे गेली. आपली मीलनेच्छा कळवण्याची ती परंपरागत खूण पाहून त्याला गंमत वाटली. या घरात असा संदेश कुणी धाडला असेल ?

एक क्षण त्याच्या डोक्यात मत्सराची भयंकर सणक उसळली. त्या एका क्षणात उग्र येऊन त्याचे मन झाळीत गेली. आत पत्नीची ही खोली. बाहेर ही गच्ची !

कमलपत्र हातात घेऊन तो आत वळायला आणि पत्नी हसत परत खोलीकडे येण्यास एक गाठ पडली. तिच्या तोंडावरचे ते मोकळे हसू. पती आल्याची लगबग आणि आपल्या हातातले हे कमलपत्र ! गोंधळून तो पत्नीच्या मागे खोलीत शिरला. त्याच्या हातातील कमलपत्राकडे दृष्टी जाताच पत्नी काहीशी लाजत डोळे खाली करीत म्हणाली,

'तुम्हाला बरे मिळते असले काही !'

त्याने हातातले कमलपत्र प्रश्नार्थक पुन्हा हलवले.

पत्नी म्हणाली,

'आधी ठेवून द्या पाहू ते होते तिथे. अंगरिक्षाचे आहे ते.'

वात्स्यायनाने विचारले,

'कुठे आहेत आपले बंधुराज ?'

'आधी ते कमलपत्र जाग्यावर नेऊन ठेवा मग सांगते.'

कमलपत्र गच्चीत ठेवून वात्स्यायन परत आला. त्याची पत्नी पलंगाकडे बोट करून म्हणाली,

'बसा.'

मग हळू आवाजात तिने म्हटले,

'अंगरिक्षाचे मन हल्ली समोरच्या वासंतिकेवर गेले आहे.'

'वासंतिका ?'

'आपल्याकडे आली होती ती एकदा.'

वात्स्यायन म्हणाला,

'आठवले.'

पत्नी म्हणाली,

'हळू बोला. अंगरिक्ष आत्ता गच्चीत येईल. वेळ झालेय त्याची. लहानपणापासून दोघे एकत्र खेळली. पण आता वयात आल्यावर ती अंगरिक्षाकडे पाहायला तयार नाही.'

पत्नी बोलत असताच एक सावली झरकन गच्चीकडे गेली. पत्नीने ओठावर बोट ठेवून स्तब्ध राहण्याची खूण केली. मग गच्चीकडील भिंतीवरच्या लहान गवाक्षाकडे बोट करून खुणेने त्यातून बघायला सुचवले.

उठून वात्स्यायन गवाक्षाशी जाऊन बाहेर पाहू लागला. बाहेरचा प्रखर प्रकाश त्याच्या डोळ्यावर पडला. जरा वेळाने समोरच्या वाड्याची गच्ची दिसू लागली.

त्या गच्चीत लांब वेणी घातलेली एक बालिका पाठमोरी उभी होती. केसात कमळ लोंबत होते. कमळाचे देठ पाठीचा धनुष्याकार घेऊन पाठीवर बसले होते. बालपणी पाहिलेली वासंतिका केवढी बदलली होती! वात्स्यायनाने मान उंच करून आपल्या घराच्या गच्चीत पाहिले. एक कमलपत्र उचलून अंगरिक्ष वासंतिकेला जोरजोराने खूण करीत होता. तो खुणा करतोय हे पाठीकडूनही वासंतिकेला कळतंय, पण ती पाठ फिरवीत नाही. त्याच्या मनात आले. तिच्या पाठीवर संपूर्ण बेपर्वाई दिसते आहे. वात्स्यायन जरा वेळ दोघांकडे पाहत राहिला. तेवढ्यात एक नापसंतीचा झटका देऊन, झटक्याबरोबर झुललेला आपला शेपटा धरीत वासंतिका आत गेली.

वात्स्यायनाने अंगरिक्षाकडे पाहिले. त्याचा पुन्हा खूण करण्यास वर झालेला हात जागीच थबकला होता. मग हातातले कमळपत्रही हळूहळू खाली आले. ते त्याच्या पायांशी पडले. मग तो खाली मान घालून मागे वळला. त्याचे तोंड फिक्के पडले होते. शरीरही उतरल्यासारखे वाटत होते. हाच तो कामज्वर–वात्स्यायन स्वतःशी म्हणाला नि हसला.

खाली मान घालून अंगरिक्ष खोलीवरून आत गेला. गवाक्षाकडून येऊन वात्स्यायन खोलीबाहेर आला. गच्चीत जाऊन त्याने अंगरिक्षाने टाकलेले कमळपत्र उचलले. कमलपत्राला काही आकार करून छिद्रे पाडलेली होती.

पत्नीचा यात संबंध नाही. त्याचे मन एकदम मोकळे झाले होते. दुसरे काहीतरी आहे. दुसरे काही असो, आपण भिणार नाही. झटझट विचार मनात येतील. योग्यायोग्य ठरविण्याचा आनंद घेता येईल. तो आनंदच वेगळा! किंवा तोच एक खरा आनंद.

हातातील कमलपत्राकडे पाहत असता, वात्स्यायनाच्या मनात आले–असा आरंभ होतो. आपल्याला हा अनुभव नाही. कुमारिकांना आपण कधी जवळ येऊ दिले नाही. त्यांची विपरित चित्रे काढीत दूर राहिलो. हा असा आरंभ होतो–लहानपणी एकत्र खेळता खेळता एके दिवशी एका क्षणी खेळगड्याचे रूप बदलून कामरूप दिसू लागते. ही बालिका समोरच्या घरात राहत नसती किंवा अंगरिक्ष अरण्यात राहत असता तर? कोणता नायक-नायिका परस्परांवर अनुरक्त होतात. ज्यांची गाठभेट होण्याची शक्यता आहे ती. काही असो आपल्याला हा अनुभव नाही. आपला पिता विट नसता, तर कदाचित असल्या प्रेमाचा अनुभव आपण घेतला असता. पाहा! अंगरिक्षाच्या यातनासुद्धा हृद्य वाटताहेत. स्त्रीला भ्यावे असे अनुभव अंगरिक्षाला नाहीत हे किती चांगले आहे. प्रिया अनुरक्त होत नसल्याचे दुःखच तेवढे तो भोगीत आहे. त्याला सांगितले–दुसऱ्या पुष्कळ नायिका आहेत–तर ते त्याला पटावयाचे नाही.

तेवढ्यात धारिणी परत खोलीत आली. चौरंग पुढे ओढून बसत म्हणाली,

'काय पाहून आलात ?'

'दुसरे कमलपत्र घेऊन आलो. यावर ही खूण कसली असेल ?'

'खुणा त्यांच्या त्यांना समजतात. हल्ली अवंतीतल्या तरुणतरुणींत या खुणांचे वेडच पसरलंय.'

वात्स्यायनाने म्हटले,

'एवढीशी पोरं. कोण शिकवतं त्यांना ?'

'शिकवणारे आहेतच. पण तीही कुठून कुठून पाहून शिकतात. या खुणा माहीत नसणे म्हणजे तरुणतरुणीत कमीपणा धरला जातो. आमच्यावेळी हे नव्हतं. बघू द्या ते कमलपत्र. मला थोड्या खुणा ठाऊक झाल्या आहेत.'

वात्स्यायनाने कमलपत्र दाखवताच घाबरून उठत धारिणी म्हणाली,

'अहो! आता कसं व्हायचं. ती जीव देण्याची खूण आहे. हृदय फाडून टाकीन अशी. कुठे गेलाय बघा ना अंगरिक. अहो! जा ना.'

पत्नीचे तोंड इतके रडवे झाले की, वात्स्यायनाला गंमत वाटली. पण पाठोपाठ तिच्या डोळ्यांत अश्रू जमा झालेले पाहताच तो म्हणाला,

'वेडे! जीव कसला देतो तो. निदान आज देणार नाही. त्याच्या कमलपत्रावरची खूण तिने पाहिलीच नाही. त्यापूर्वीच ती आत निघून गेली.'

'म्हणून काय झाले ?'

वात्स्यायन म्हणाला, 'अग! शिवाय तिची सतत पाठ होती त्याच्याकडे. जीव दिला तर तिच्यासाठी दिला हे तिला आधी कळायला नको? तेव्हा तू तो जीव देईल अशी मुळीच चिंता करू नको.'

'काहीतरीच तुमचं!'

'आणखी सांगतो. आज ती विरोध दर्शवते. उद्या ती अनुकूल होईल.'

'तुमच्या तोंडात मधु पडो. आईला केवढा घोर लावलाय त्याने! धड जेवत नाही. धड बोलत नाही. तुमचे भविष्य खरे ठरो.'

'हे भविष्य नव्हे. मला सांग, अंगरिक्षाचा ती तिटकारा करीत असली तर, बाहेर येऊन त्याच्याकडे पाठ करून तरी तिने का उभे राहावे ?'

'असेल बाई ! मग एकदा वासंतिकेशी बोलून पाहता का ?'

'आधी अंगरिक्षाशी बोलतो.'

गुरूने दिलेला बाभ्रव्याचा ग्रंथ अजून त्याच्या खाकेतच धरलेला होता. त्याने तो उंच कोनाडयात ठेवीत म्हटले,

'राहू दे हा इथं. संधी पाहून मी अंगरिक्षाशी बोलेन.'

धारिणीने म्हटले,

'बोला. तुमच्याशी बोलेल तो. तुमचे नित्याचे जुळते. ग्रंथ कसला आहे ?'

'बाभ्रव्याची कामसूत्रे.'

मग वात्स्यायनाने गुरुगृही घडलेले सांगितले. गुरूने हा ग्रंथ देऊन 'कामसूत्रे' पुन्हा लिहिण्याची आज्ञा केली ते आणि तो कसा गोंधळला तेही.

पत्नी म्हणाली, 'मला गुरूगृह पाह्यचंय तुमचं.'

'कशाला ?'

'तुम्ही पठण करायला, संथा घ्यायला कुठे कुठे बसत होता, समिधा आणायला कोणत्या रानात जात होता, भोजन कुठे घेत होता. सगळं पाह्यचंय आणि तुमच्या गुरूचं दर्शनही घ्यायचंय.'

'का ?'

'ते थोर असले पाहिजेत.'

'कशावरून ?'

'तुम्हाला कामसूत्रे लिहा म्हणाले त्यावरून.'

वात्स्यायनाने एकदम विचारले,

'मग लिहावी का कामसूत्रे ?'

'लिहा. खरच लिहा.'

धारिणीच्या शब्दांतला जोर पाहून वात्स्यायनाला हसू आले.

तिने विचारले,

'हसता का ?'

'मला दत्तकाची कथा आठवली. पाटलिपुत्रातील गणिकांनी आग्रह करून त्याला कामसूत्रांमधील वेशाधिकरण लिहायला लावले. आता हा मल्लनाग वात्स्यायन पत्नीच्या आग्रहावरून कामसूत्र ग्रंथ लिहिणार.'

'माझे नाव घालू नका हं कुठे.' धारिणी म्हणाली,

'तुझे नाव घालून चालणारच नाही. ते शास्त्रसंमत होणार नाही. काही आचार्यांच्या मते स्त्रियांना शास्त्राध्ययनाचा अधिकारच नसल्याने आणि काम शास्त्रात स्त्रियांचा संबंध नसल्याने स्त्रियांना ते शिकवू नये, असे आहे.'

धारिणी म्हणाली,

'स्त्रीचा नाही, मग कुणाचा संबंध येणार कामसूत्रात ?'

'स्त्रियांना या शास्त्राची आवश्यकता नाही असे त्यांचे म्हणणे.'

धारिणी आवेशाने म्हणाली,–

'म्हणजे, काम हा पुरुषांनाच असतो– स्त्रियांना नाही ?'

"हो ! काही आचार्य असे म्हणतात. कामशास्त्र हे शास्त्रच नव्हे असेही त्यांचे म्हणणे आहे."

पत्नी काही बोलणार तोच तिला थांबवीत वात्स्यायन म्हणाला,

'थांब मीच खोडून काढतो त्यांचे म्हणणे. ते म्हणतात काम हे शास्त्रच नाही.' मी म्हणतो ते शास्त्र आहे. कसे ते पहा ! व्यवहारातील सर्व आचरणांना साक्षात नसले तरी, परंपरेने शास्त्र हेच कारण असते. व्याकरणाचे शास्त्र न जाणणारे याज्ञिकही व्याकरणाचे शास्त्र आहे या समजुतीवरच यज्ञामध्ये 'उह' करतात. तसेच ज्योतिषशास्त्र आहे म्हणूनच ते न जाणताही लोक पुण्यदिनी धर्मविधी करितात. घोडेस्वार व माहूत हे शास्त्राची कल्पना नसताही घोडे व हत्ती यांना शिक्षण देतात. तसेच राजा आहे या भावनेने दूर प्रांतातून राहणारे लोकही मर्यादा सोडून वर्तन करीत नाहीत. तसे प्रत्येक व्यवहाराचे शास्त्र हे असतेच. ते न जाणता शास्त्राला धरून व्यवहार होईलही, पण शास्त्र जाणून व्यवहार केल्यास सुख होते.'

'पटले. पण स्त्रियांबद्दल तुम्ही काय सांगणार ?'

'स्त्रियांनी तारुण्यापूर्वी कामशास्त्र शिकावे.'

'ठीक. म्हणजे स्त्रियांनी शिकावे ना ?'

'होय ! मी ग्रंथ लिहीला तर त्यात स्पष्ट म्हणेन की, कामशास्त्रातील प्रयोगांचे ज्ञान स्त्रियांना आवश्यक आहे. कारण या विषयात स्त्रीसुद्धा एक कर्ती आहे. आणि या विषयाचे प्रयोगज्ञान कामशास्त्राचा अभ्यास करूनच तिला होईल.'

'बरे ! स्त्रियांनी तारुण्यापूर्वी शिकावे असे तुम्ही म्हणता. मी तर तारुण्य ओलांडले आहे. माझ्यासारख्या स्त्रियांचे काय ?'

'स्त्री विवाहित असेल तर, पतीच्या संमतीने कामसूत्रांचे अध्ययन करावे.'

पत्नी म्हणाली,

'तुम्हीच अनुज्ञा दिलीय. आता तुम्ही लिहाल ते मी वाचीन आणि शिकेन.'

'हो.' वात्स्यायन म्हणाला, 'मी लिहीले तर. मात्र लिहीले तर तुला विचारावेच लागेल.'

पत्नी हसत म्हणाली,

'म्हणूनच तुम्ही मला व माझ्याबरोबर सगळ्या स्त्रियांना कामशास्त्र शिकण्याची अनुज्ञा दिलीत ? खरे ना ?'

ती हसू लागल्यावर वात्स्यायन म्हणाला,

'मुळीच नाही. पूर्वाचार्यांशी माझे पुष्कळ मतभेद होणार आहेत. अर्थात मी कामसूत्रे लिहीली तर.'

'मी सांगते तुम्ही लिहीणार.'

वात्स्यायनाने झटकन वाकून पत्नीचे चुंबन घेतले. त्याच्या डोळ्यांत पाहत त्याला दूर लोटीत ती म्हणाली,

'एवढ्यात लिहू नका अजून अवकाश आहे.' ◻

## नवयौवन

आपला मेहुणा अंगरिक्ष याच्याबद्दलचा वात्स्यायनाचा होरा बरोबर ठरला. दोन दिवस गेले, तीन गेले, अंगरिक्षाने जीव दिला नाही. मात्र त्याची अवस्था मूढासारखी झाली होती. घरात–कुठल्यातरी अंधाऱ्या भागात तो बसून असे किंवा घरच्या उद्यानातल्या अगदी

टोकाच्या कुंजात बसून राहिलेला असे. भोजनाचे वेळी सेविकेला पाठवून त्याला शोधून आणावा लागे. तीन दिवसांत तो आणखी पांढरा पडला होता. दृष्टीत शून्यता आली होती.

त्याला असा कुठेतरी दृष्टी लावून पडलेला पाहून वात्स्यायनाला करुणा आली होती आणि याच्यासाठी करता येईल ते करायचे असे आणखी त्याच्या मनाने घेतले होते. अंगरिक्षाच्या प्रेमाची निर्व्याज्य तऱ्हा आणि त्याची निर्मळ तगमग यांनी तो हलला होता. जे प्रेम त्याला कधी अनुभवायला मिळाले नव्हते आणि मिळणार नव्हते त्यांचे एक विलक्षण आकर्षण त्याला वाटू लागले होते. वासंतिका याला मिळायलाच हवी, तू मिळवून द्यायला हवीस.' तो स्वतःला वारंवार सांगत होता. हे प्रेम जुळवून दिलेस तरच तुला जे मिळाले नाही त्याचे असमाधान जाईल. जर का तुला हे साधले नाही, तर बाभ्रव्याचा ग्रंथ तू गुरूला परत करणेच बरे.

कोणती नायिका अनुकूल होते–कोणती नाही !–तो विचार करू लागला. असे आहे का की, अमुक एकच नायिका, अमक्या एकाच नायकाला अनुकूल होण्यास योग्य अशी असते. दोघे अमक्याच वयाची असावी, अमक्याच रूपाची असावी, अमक्याच परिस्थितीतील असावी, किंवा दोघांची नक्षत्रे अमुकच असावीत असे आहे का ? असे असण्याचे कारण नाही. विविध स्थळी, विविध कारणांनी स्त्री–पुरुषांचे मीलन होत असताना दिसते. त्या अर्थी कोणतीही नायिका योग्य तो प्रयत्न केल्यास प्राप्त होण्यास प्रत्यवाय नसावा.

दुपारची उन्हे टळल्यावर अंगरिक्षाचा शोध घेत, वात्स्यायन बागेतली लताकुंजे शोधून अंगरिक्षासमोर उभा राहिला. अंगरिक्ष खाली हिरवळीवर पडला होता. डोळे यातना होत असल्यासारखे मिटलेले होते. वात्स्यायनाने विचारले,

'काय रे ! असा का पडला आहेस ?'

'उगीच ' डोळे मिटलेले ठेवून अंगरिक्ष म्हणाला.

'उगीच ना ? ऊठ मग. अवंतीत काय काय नवीन झालंय मला दाखव.'

'आज नको.'

'बरं. उद्या ?'

'उद्याचे उद्या बघू '.

वात्स्यायनाने विचारले,

'असा किती दिवस पडून राहणार तू ?'

'ठाऊक नाही.' अंगरिक्ष जोरात म्हणाला. मग एकदम एका कोपरावर वर होत आवेशाने बोलला,–'मला झिजत झिजत मरायचंय. मला झिजत मृत्यू येत असता कुणाला आनंद वाटणार असेल तर तो मी देणाराय.'

वात्स्यायन गालात हसत म्हणाला,

'मला कशाला हे ऐकवतोस. जिथे ऐकायला यायला हवे तिथे तरी बोल.'

एकदम उठून बसत अंगरिक्ष म्हणाला,

'मरूभूमीवर टाकलेल्या पाण्याप्रमाणे माझे जीवन सुकून गेलंय. फुलांचा वास मला येत नाही. अन्नाला चव नाही, कोकिळेचा स्वर कर्णकटु वाटतोय.'

येणारे हसू वात्स्यायनाने आवरले. अंगरिक्षाची निर्व्याज्यता एकीकडे त्याला हसू आणीत होती–दुसरीकडे हृदयाला पीळ पाडीत होती. काय असे विशेष मागतोय हा ? चार मोहरा देऊन आपला पिता दुसऱ्याच्या उपभोगासाठी दासी विकत घेई तसे करीत नाही ना ? किंवा आपल्याला सुख होताय म्हणून मोहरा देऊन एखाद्या गणिकेकडून शरिरावर बळ पाहून घेत नाही ना ? सर्वस्व देऊन हा हृदय मागतोय. याची तगमग पाहवत नाही. दुःख हे खरेच असते. दात दुखतो तेव्हा खऱ्याच वेदना असतात. आपण काही न बोलता उभे राहिलो तर तो रडायला लागेल. काहीतरी साधं–सरळ धीराचं बोललेच पाहिजे. वात्स्यायन झटकन् म्हणाला,

'वासंतिका तुझी बालमैत्रिण ना ?'

अंगरिक्षाने 'होय' अशी मान हलवली. वात्स्यायन म्हणाला,

'मला वाटते तिला आणि तिच्या घरच्यांना अजून तू बालक वाटतो आहेस.'

अंगरिक्षाने एकदम मान वर करून पाहिले.

वात्स्यायन पुढे म्हणाला,

'लहानपणी तिची बाहुली तू हट्टाने घेतली असशील. आता तसेच आपले मन तू घेतो आहेस असं वाटत असावे तिला आणि बाहुलीची भांडणे वाटत तसेच हे तुमच्या दोघांतले भांडण मोठ्यांना वाटत असेल.'

'म्हणजे ?' अंगरिक्ष बसला होत म्हणाला.

'अरे बाबा ! स्त्रियांजवळून प्रत्येक वयातले मागणे वेगळ्या तऱ्हेने घ्यावे लागते. योग्य तऱ्हेने मागणं केलं तर कुठलीही नायिका नायकाला नकार देत नाही.

'मला कळले नाही !'

'कळेल,' वात्स्यायन त्याला हात देत म्हणाला, 'ऊठ ! आधी घरात जाऊन पोटभर जेऊन घे. उपाशी पोटी नायिका वश होत नाहीत. परवा उद्यान यात्रा आहे. उद्यानात जायला शक्ती ठेव.'

एकदम आवेगाने उठत अंतरीक्ष, वात्स्यायनाचे दोन्ही हात धरीत म्हणाला,–

'वासंतिकेसाठी मला हवे ते करायला सांगा. मी पृथ्वी उचलीन, समुद्र पिऊन टाकीन, अक्षौहिणी सैन्याशी एकटा लढेन.'

वात्स्यायन हसत म्हणाला,

'ते काहीच नाही बाबा ! याहूनही दिव्ये करावी लागतील.'

[ क्रमशः ]

पुस्तके

# संहिता

## अशोक प्रभाकर डांगे

मराठी कवींच्या घोळक्यात विंदा करंदीकरांचं स्थान महत्त्वपूर्ण आहे. कालच्या 'स्वेदगंगे'पासून अगदी अलीकडच्या 'विरूपिके'पर्यंतचा त्यांचा काव्यप्रवास अत्यंत लक्षणीय आहे. ह्या एका समृद्ध काव्यजीवनाचा एक उत्कृष्ट आलेख म्हणजेच काँटिनेंटलनं प्रकाशित केलेला त्यांचा समग्र काव्यसंग्रह 'संहिता' हा होय. त्यांच्या स्वेदगंगा, मृद्गंध, ध्रुपद आणि जातक या चार संग्रहांतून निवडलेल्या कवितांचा या संग्रहात समावेश केला आहे. मंगेश पाडगावकरांसारख्या त्यांच्या समकालीन कविमित्रानं संपादन केल्यानं 'संहिता' ह्या संग्रहाचं मोल अधिकच वाढलं आहे. पाडगावकरांची प्रदीर्घ प्रस्तावना आणि टीपा आपणास करंदीकरांच्या काव्याच्या अधिकच जवळ नेऊन सोडतात.

सदतीस सालानंतर चाळीस वर्षांचा कालखंड करंदीकरांच्या कवितेत प्रतीत होतो. एका संवेदनशील कवीमनाचा जाणता चिंतनप्रवास वेधक आहे. 'रक्तसमाधी'सारख्या देहाच्या कवितेपासून निघालेले करंदीकर थेट यथार्थसूक्तापर्यंत वाटचाल करतात. 'धोंड्या न्हावी', 'कीर्तन', 'कावेरी डोंगरे'यांसारख्या विषयात रमणारे करंदीकर सत्तरीच्या हातात सात कवठ्या आलेल्या बासप्टातल्या नेहरूंपर्यंत येऊन पोहोचतात. तसे ह्या कवितेतले विषयसुद्धा बहुढंगी आहेत. त्यात प्रेम आहे, वैराग्य आहे, अव्यक्ताची भीती आहे, प्रणय आहे, संसार आहे, प्रिया आहे, वेश्या आहे. आणि विषयांतली ही विविधताच करंदीकरांच्या काव्याला आणखी समृद्ध करते.

सामाजिक जाणीव हा करंदीकरांच्या काव्याचा स्थायीभाव आहे. आणि ह्या जाणीवेचं भान त्यांच्या प्रतिभेला सततच झपाटून टाकतं. सामाजिक अन्याय, दुःख, यांची प्रचिती करंदीकरांना अस्वस्थ करते. आपली दुर्बलता त्यांना बोचत राहते. म्हणूनच मग ते विचारतात,

गालावरचे खारे पाणी
पिऊन काय जगेल कोणी ?
काय तुझे हे निःश्वास
मरणाऱ्यांना देतील खास ?

दीन–दलितांना वाचवण्यात असाहाय्य ठरलेला कवी म्हणूनच म्हणत राहतो,

'माझ्या मना बन दगड !' सामाजिक अन्यायाने व्यथित झालेले हे कविमन पुढे आणखी प्रखर होताना दिसते. आपल्या 'आततायी अभंगा'त करंदीकर

नागड्यांनो उठा । उगवा रे सूड
देहाचीच चूड । पेटवोनी

यांसारख्या शब्दांनी सामाजिक जाणीणांना चेतना देताना दिसतात. अन्यायाविरोधी प्रतिक्रिया हेच करंदीकरांच्या काव्याचं स्वरूप आहे. त्यामुळे त्यांच्या काव्याची प्रकृतीच गंभीर बनून जाते. त्यांची प्रेमगीतं, निसर्गचित्रणे हलक्याफुलक्या शब्दांत व्यक्त होत नाहीत, तर ती त्याहूनही अर्थवाही असतात. आपल्या साऱ्या जीवनप्रवासात करंदीकर सत्याचाच शोध घेतात. अन्यायाच्या प्रतिक्रिया नोंदवत राहतात. त्यांचा कोकणातला 'धोंड्या न्हावी' असो, कारकुनी जीवनात कुजलेली कुमारिका कावेरी डोंगरे असो, खाज आली की, खराखरा खाजवणारी बकी नावाची वेश्या असो, त्या साऱ्यांचं चित्रण सामाजिकच असतं. करंदीकर सतत दुःखाचा शोध घेताना दिसतात आणि अशा दुःखांचंच प्रभावी चित्रण ते 'ती जनता अमर आहे !'. यासारख्या विलक्षण अर्थवाही कवितेनं साकार करतात.

पण सामाजिक दुःख संपलेलं नसतं, संपणारही नसतं. करंदीकरांसारखा चिंतनशील माणूस फक्त त्यामागच्या सत्याचा शोध घेत असतो. त्याला जाणवतं ते एवढंच की,

सत्य लखलखतं, वास्तवातला विस्तव होऊन. वास्तवाची धग अती प्रखर असते.

तरीही माणसं जगत असतात स्वप्नांचे ताबूत उभारून, त्यालाच ते सत्य मानतात. वास्तवाच्या धगीनं करपतात त्यांच्या स्वप्नांचे रंगीबेरंगी ताबूत. मागे उरतात सांगाड्याच्या काठ्या. करंदीकर म्हणतात, 'माणसं यांचं अवशेषांवर नवी स्वप्नं उभारतात. मानवी जीवनाचा प्रवासच असा असतो. स्वप्न आणि सत्यातला भेद करंदीकर उघडानागडा करून सोडतात.

करंदीकरांची सारीच कविता अत्यंत प्रभावी आहे. स्त्रीच्या मनाचं गहिरं चित्रणही ते त्यात करताना दिसतात. त्रिवेणीसारख्या सुंदर कवितेत ते आधी प्रेम, त्यानंतर जन्मणारी वासना आणि उपभोग व नंतर निर्माण होणारी वास्तव उद्ध्वस्तता या भावनांचं विलक्षण देखणं चित्रण ते करतात.

आपल्या सहचरणीबरोबरचे अनुभव अत्यंत वेचक शब्दांत ते 'संहिते'तून प्रकट करतात. या साऱ्याच भावनांना खोली आहे. त्यांच्या शब्दांना उंची आहे आणि आशयालाही शरीराचा अर्थ आहे.

करंदीकरांच्या कित्येक कवितांत अतींद्रिय अनुभव, साक्षात्कार यांची ओढ जाणवते. इंद्रियजन्य अनुभवाचं चित्रण करणारे करंदीकर आध्यात्माचाही वेध उत्कट होऊन घेताना दिसतात. त्यांच्या अनेक कविता भौतिकतेच्याही पलीकडे जाऊन पोहोचतात. पोलादी रूळ लववत जाणारी पोलादी गाडी. तिच्यावरचा ठोक्कर काळा अंधार आणि त्या अंधारानं तोललेलं आकाश. भयंकर वजनाचं आकाश. करंदीकरांना सर्वांत मोठं भय ह्या आकाशाचं वाटतं. म्हणजेच विश्वात्म्याचं वाटतं. आणि तीच जाणीव त्यांना भारून टाकताना दिसते.

संहिता हा करंदीकरांच्या अशाच निवडक चव्वेचाळीस कवितांचा संग्रह. त्यांच्या काव्यजीवनाचा बराचसा प्रतिनिधी. ही सारीच कविता समृद्ध आहे. चिंतनशील आहे. आपल्या विलक्षण वेड्या प्रतिभेचं वर्णन करंदीकर उत्कटपणे करतात,

'एका ढगाला कुशीत घेऊन ती झोपली, तेव्हा तिला गर्भ राहिला.'

करंदीकरांच्या समृद्ध काव्यजीवनाचा 'संहिता' हा एक उत्कृष्ट आलेख ठरेल. ◻

**संहिता**
विंदा करंदीकर
काँटिनेंटल प्रकाशन
रुपये साडेसात.

# Total Fitness in 30 minutes a week

जे. एन्. पोंडा

'टाईम' मासिकाच्या शेवटच्या पानावर 'बेस्ट–सेलर्स' म्हणून २० पुस्तकांची यादी असते. त्यांतील दहा कथा–कादंबऱ्या असून इतर दहा पुस्तके कोणत्याही विषयावर असतात. काही पुस्तके आरोग्यावर, काही मानसशास्त्रावर, तर काही इतिहासावर. विषय कोणताही असो, ही पुस्तके साधारणतः सर्वांना समजतील इतक्या सोप्या भाषेत लिहीलेली असतात. त्या विषयातील टेक्निकल भाग फारच कमी केलेला असतो किंवा पुष्कळच सुटसुटीत असतो.

अर्थात बेस्ट–सेलर्स लीस्टमधील सर्वच पुस्तके उत्कृष्ट असतात असे नाही. मी एकदा एक, टेलर कॉल्ड्वेलचे "Testimony of Two Men" नावाचे बेस्ट सेलर पुस्तक वाचले होते. त्याच्यापुढे आपल्या कोणत्याही हिंदी सिनेमाने हात टेकले असते, इतके ते पुस्तक अवास्तवतेने भरले होते. पण बेस्ट सेलर्समधील जवळजवळ ७०% पुस्तके उत्कृष्ट असतात. त्यामुळे बेस्ट–सेलर्स लीस्टमधील सर्व कथा, कादंबऱ्या व इतर सर्व विषयावरची पुस्तके मी माझ्या वाचनालयासाठी विकत घेतो.

"टोटल फिट्नेस्" हे पुस्तकही बेस्ट-सेलर्समधीलच एक पुस्तक आहे. पुस्तकाच्या नावाप्रमाणेच या पुस्तकात शरीराची कार्यक्षमता कशी वाढवावी (आणि तेही आठवड्यातून फक्त ३० मिनिटे व्यायाम करून) हे अगदी पारदर्शक लिखाणातून सांगितले आहे. धकाधकीच्या जीवनात रोज व्यायाम करणे बऱ्याच लोकांना जमत नाही. त्यातून स्कुटर व मोटारवाले यांना तर चालण्याचासुद्धा व्यायाम मिळत नाही. मला सायकलवालांयबद्दल आदर वाटतो. त्यांना व्यायाम मिळतो व ते हवेत प्रदुषणाचा धूर सोडीत ऐटीत मिरवत नाहीत किंवा कुणाचा जीवही घेत नाहीत. जगातील मोटारींच्या अपघातात दोन्ही महायुद्धात ठार झालेल्या लोकांपेक्षा जास्त लोक मरण पावले आहेत हे किती लोकांना माहीत असेल?

या पुस्तकातील एक लेखक मोरहाऊस ह्यांना जरी Ph.D. डिग्री असली तरी, शरीर सौष्ठवासंबंधी त्यांचे ज्ञान अफाटच आहे. अमेरिकेतील अॅस्ट्रॉनटस्ना त्याच्या हाताखाली ट्रेनिंग दिले जाते. यावरून त्याने या विषयावर किती खोल अभ्यास केला आहे ते उघड आहे. मार्स ग्रहावर उतरणाऱ्या अॅस्ट्रॉट्स्ना फिजिकल ट्रेनिंग कसे द्यावयाचे याविषयी त्याने "नासा" साठी (National Aeronautics and space Administration) एक योजना आखली आहे. हे सर्व लक्षात घेता त्यांनी सामान्य जनतेसाठी लिहीलेले हे पुस्तक लोकांना किती उपयुक्त ठरेल याची कल्पना येईल. याशिवाय त्यांचे शरीरसौष्ठावासंबंधीचे लेख एन्सायक्लोपिडीआ ब्रिटानिका व एन्सायक्लोपिडीआ अमेरिकाना वगैरे ख्यातनाम ग्रंथांत आहेत.

"टोटल फिट्नेस्" या पुस्तकाचे एक खास वैशिष्टच म्हणजे, शरीरसौष्ठवाबद्दलच्या आपल्या नेहमीच्या कल्पनाना दिलेले धक्के. मॉरहाऊसच्या म्हणण्याप्रमाणे कोणत्याही वेळी (जेवणानंतरसुद्धा) त्यांनी सुचविलेले व्यायाम करता येतात. ते स्वतः रात्री झोपण्यापूर्वी व्यायाम करतात! व्यायाम करताना पाणी पिण्यास काहीच हरकत नाही, पोहण्यापूर्वी खाण्यास काहीच हरकत नाही, जास्त प्रोटीन घेतल्यास जास्त शक्ती येते हे खरं नाही. व्यायाम केल्यानंतर स्वेटर घालण्यात काही अर्थ नाही. जेवढे स्नायू मोठे तेवढे बळकट असतात ही कल्पना चुकीची आहे असं ते म्हणतात.

सकाळी लवकर उठून नियमित व्यायाम करावा हेसुद्धा त्यांना योग्य वाटत नाही. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आधीच आधुनिक जीवनात आपल्या आयुष्यात बरीच मानसिक व शारीरिक नियंत्रणे आहेत त्यात आणखीन कडक शिस्त लावून काय साधणार? आपणास आधीच ठराविक वेळेला ठराविक ठिकाणी ठराविक पैसे क्रमविण्यास जायचे असते. यात आणखीन व्यायाम हा ठराविक वेळातच करावयास पाहिजे असा आपण बेत केला तर, आपल्या बंधनात आणखीनच भर पडेल.

आपले वजन आपल्या उंचीच्या प्रमाणात पाहिजे असे आपण मानतो. पण आपल्या पोटाच्या परीघाप्रमाणे आपले वजन किती असावे याचे कोष्टक या पुस्तकात दिले आहे. आपल्या आहारात आपण जितकी विविधता ठेवावी तितके आपल्या शरीरास पोषण मिळते असे हे लेखकद्वय लिहीतात. मला हे फळ आवडत नाही, ते अन्न रुचत नाही हा आग्रह आपण सोडावा. तुम्हास विविधता ठेवून मुक्त मनाने जे आवडेल ते खायला काहीच हरकत नाही.

डॉ. मॉरहाऊसनी शरीरसौष्ठत्र या विषयावर ४० वर्षे संशोधन केले आहे. परंतु आहार, वाचन आणि व्यायाम यांविषयी प्रत्येकाच्या ठराविक कल्पना असतात आणि त्या इतक्या ठाम असतात की, सहजासहजी त्या बदलता येत नाहीत असं मला वाटतं. आपण कोणास या विषयावर सूचना दिल्या तर "तुला त्यातलं काय कळतंय?" असे तोंडावर भाव आणून ते आपल्याकडे बघतात. पण काही खुल्लमखुल्ल्या (open-minded) लोकांची मने लवचिक असतात. ती त्यांनी बदलून या पुस्तकाचा आवश्य फायदा घ्यावा. ¤

**Total Fitness in 30 minutes a week**
By : Laurence, Morehouse and Leonard Gross, (Pocket Book)
Pages : 255, Rs. 18–35.

## SOME NEW SELECTED TITLES RECEIVED

| | | |
|---|---|---|
| 1. | Total Fitness – (Bestseller, Non-fiction) – Laurence Morehouse & Leonard Gross | Rs. 18·35 |
| 2. | Great Stories From The World of Sports – Edited by Peter Schwed and Herbert Warren Wind | Rs. 21·00 |
| 3. | Art of Autobiography – Dr. D. G. Naik | Rs. 15·00 |
| 4. | The Collapse of the Third Republic – William L. Shirer | Rs. 18·00 |
| 5. | Shogun – (Bestseller, A novel of Japan) – James Clavell | Rs. 26·00 |
| 6. | Moment In Peking – (Bestseller, Novel) – Lin Yutang | Rs. 20·00 |
| 7. | Ragtime – (The originator of psychoanalysis had fainting fits – but only in preence of Carl Jung) Bestseller – E. E. Doctorow | Rs. 18·35 |
| 8. | The Bottom Line – Knebel Fletcher – (Bestseller a novel about bugging and big business | Rs, 18·35 |
| 9. | A Prayer For The Dying – (thriller) Jack Higgins | Rs. 8·00 |
| 10. | The Eagle Has Landed – (Bestseller, Political thriller) – Jack Higgins | Rs. 16·00 |

# राष्ट्राला साहसाच्या भावनेचा पुनर्लाभ
# 1975-76

## युवकांसाठी नवीन व्यवस्था


❊ अत्यावश्यक वस्तू रास्त दराने 10,490 वसतिगृहांना पुरविण्यात येतात, 9,56,000 विद्यार्थ्यांना त्यांचा लाभ होतो.

❊ पांढरा मुद्रणाचा कागद सवलतीच्या दराने पुरविल्यामुळे पाठ्यपुस्तकांच्या आणि वह्यांच्या किंमती खाली आल्या. शाळा आणि महाविद्यालयात 88,600 पुस्तकपेढ्या उघडण्यात आल्यात.

❊ शिकाऊ उमेदवार योजनेत सध्या 103 व्यवसाय आणि 216 उद्योगांचा समावेश आहे.

❊ 18,8000 नवीन जागा निर्माण करण्यात आल्यामुळे शिकाऊ उमेदवार योजनांखालील जागांची संख्या 1,33,900 च्या वर गेली आहे. 1,28,900 जागा भरण्यात आल्या. यांपैकी 28,000 (20 टक्क्यांहून जास्त) जागा वर्गीकृत जाती, वर्गीकृत जमाती आणि इतर मागास वर्गीयांसाठी आहेत.

DAVP 76/91



# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

## पु. ल. इनामदार

## प्रकरण सतरा : सिमला येथील वरिष्ठ न्यायालयात ( ३ )

दिनांक २३ मे रोजी सकाळी ११ वाजून ३० मिनिटांचे सुमारास मी माझे तर्कनिवेदन संपविले होते. त्यानंतर श्री. देवेंद्रनाथ अवस्थींनी अपिलंट शंकर किस्तय्याच्या वतीने बचावाचे तर्कनिवेदन त्या दिवसभर करून नंतर दिनांक २४ मे रोजी तिसऱ्या प्रहरी ३ वाजायचे सुमारास ते संपविले. त्याच दिवशी श्री. दफ्तरी अभियोग-पक्षाचे वतीने आपले उत्तर द्यावयास उभे राहिले. दफ्तरींचे भाषण दि. २४ चा उरलेला वेळ व त्यानंतर दि. २५-२६ व २७ मेपर्यंत चालले होते. दफ्तरींनी गोपाळ गोडसेच्या संबंधात माझ्या तर्क-निवेदनाचे उत्तर दि. २६ ला दिले होते. दफ्तरींचा यासंबंधात केलेल्या तर्कनिवेदनाचा सारांश सांगायचा म्हटले तर, दफ्तरींनी ज्या सात मुद्द्यांवर विशेष भर दिला होता, ते सांगून करता येण्यासारखे आहे. पहिला पुरावा नथूरामने जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्याचे सुमारासच पुण्यामध्ये आपल्या एका विमा पॉलिसीचे गोपाळच्या पत्नीच्या नावे करून दिलेले नामांकन, दुसरा पुरावा गोपाळने पुणे येथे आपल्या कार्यालयीन वरिष्ठांना जानेवारीच्या तिसऱ्याच आठ-वड्यात दिलेला रजेचा अर्ज. ही सुट्टी गोपाळने १७ जानेवारी ते २३ जानेवारीपर्यंत अशी मागितली होती. तिसरा पुरावा साक्षीदार आमचेकर या मराठी निर्वासिताचा. या साक्षीदाराने गोपाळला दिल्ली येथे हॉटेलमध्ये करकरेकडे भेटायला आलेले पाहिले होते असे तो म्हणत होता. चवथा पुरावा त्याच हॉटेल रजिस्टरवर एका उताऱ्याने केलेली 'राजू गोपालन' नावाची सही. पाचवा पुरावा मरीना हॉटेलच्या दिनांक २० जानेवारीच्या दुपारी झालेल्या कट-वाल्यांच्या बैठकीच्या संबंधात मी गोपाळच्या वतीने विचारलेला व नंतर परत घेतलेला वादग्रस्त प्रश्न. सहावा पुरावा त्याच दिवशी संध्याकाळचे वेळी एका टॅक्सी ड्रायव्हरने बिर्लाभवनामध्ये जे चार 'पॅसेंजर' नेले होते त्यांपैकी एक म्हणून गोपाळला ओळखणे व सातवा पुरावा खाकी कापडाची पिशवी अभियोगप्रदर्श वस्तू क्रमांक ५४. या पुराव्याबद्दल दफ्तरींनी गोपाळच्याविरुद्ध अशी जी काही भाषा वापरली ती त्यांच्या अभियोगपक्षाच्या वतीने केलेल्या संयत शब्दांच्या वाक्चातुर्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून मला आवर्जून सांगायचे आहे. दफ्तरींच्या भाषणामध्ये गोपाळचे चित्र नथूराम-सारख्या प्रभावी व्यक्तित्वाने भारून गेलेल्या नथूरामच्या धाकट्या, लाडक्या भावाचे आज्ञाधारक वर्तन, अशा रीतीचे होते असेच मला जाणवले. खरोखरीच दफ्तरींचे त्या दिवशीचे फर्मास इंग्रजीमधले वक्तृत्व गोपाळबद्दल चीड दाखवणारे होते असे मुळीच म्हणता येणार नाही. त्यांचे पालूपद एकच की, हा पुरावा खोटा आहे असे सिद्ध होण्याजोगे बचावपक्षाने काही कूटपरीक्षण केले नाही की बचावाचा पुरावा दिला नाही. परंतु दफ्तरींच्या या श्रवणीय वक्तव्यातला बदसूर असा एकच मला वाटलेला आठवतो. तो म्हणजे दफ्तरींनी नथूरामला लक्ष्य करून म्हटलेली काही वाक्ये ! दफ्तरींनी ती वाक्ये वारंवार निरनिराळ्या शब्दांमध्ये म्हटली होती. माझ्या अभियोग-पक्षाच्या साक्षीदारांच्या साक्षीवर विश्वास ठेवण्यास मला रतीभरही दुविधा—'हेजिटेशन'—वाटत नाही. मी या साक्षीबद्दल जे काही बोलत आहे ते तसे मला खरेच प्रामाणिकपणे वाटते म्हणून बोलत आहे. मला मनात एक आणि बोलणे दुसरेच असे भाषण करताना वाटणारी अडचण अनुभवावी लागत नाही. मला लटकी भाषा येत नाही !

मी येथे निर्मळ मनाने लिहितो की, दफ्तरींचे असे नथूरामला टोचून बोलणे मला आवडले नव्हते. मला अजूनही दफ्तरींच्या या बोलण्याने नथूरामच्या चेहऱ्यावर तरळलेल्या वेदनांचे सावट आठवते.

दफ्तरींचे हे बोलणे नथूरामच्या भाषणातल्या आरंभीच्या मला इंग्रजी धड बोलता येत नाही, मी प्रशिक्षित वकील नाही, मला सत्य माहीत आहे, मला थोडे तर्कशास्त्र समजते, मला जे काही सांगायचे आहे, ते सांगायला वकीलीविद्येच्या अभावाची अडचण वाटत नाही. मला कशाच्याच अभावाची अडचण वाटत नाही, वगैरे बोलण्याला अनुलक्षून होते असे म्हटले तरी, नथूरामचे ते बोलणे एकाच शिक्षिताला, एकाच वकिलाला उद्देशून होते असे मुळीच नव्हते. तो नथूरामच्या स्वतःच्या 'ज्ञानलवविदग्ध' मनाचा निरागस हीनगंड होता असे मला वाटते. अगदी चुकीच्या विचारसरणीचा अवलंब करून जगद्वंद्य महात्म्याच्या हत्येला कारणीभूत होणारा, पण त्यासाठी शिक्षेचा गळफास निर्मळ मनाने, उघड्या डोळ्यांनी स्वीकारणारा नथूराम प्रतारणी नव्हता, लटके बोलणारा नव्हता. नथूरामची अखंड भारताच्या निर्घृण विभाजनाबाबतची वेदना ही नाटकी नव्हती. नथूरामचे आपल्या धाकट्या भावाबद्दलचे वात्सल्य त्याला मनात एक नि ओठांनी दुसरेच बोलावयास प्रवृत्त करील अशा हीणकसाचे नव्हते असे मला प्रामाणिकपणे वाटते. असो.

दफ्तरींनी ग्वाल्हेरचे डॉक्टर परचुरे यांच्या अपिलाबाबतचे भाषण दिनांक २७ ला सुरुवातीपासूनच आरंभ केले व ते जवळजवळ सगळा दिवसभर त्याच विषयावर बोलत होते. दफ्तरींचे त्या दिवशीचे भाषणही फार उत्कृष्ट झाले. वकिलाच्या तर्कनिवेदनविद्येचा आदर्श असे झाले! बोलावयाचे मुद्दे, विषयचातुर्याने, विवेकशील संयमाने निवडणे नि त्यावर कडाडून प्रहार करणे बघण्यासारखे होते. मला, डॉक्टर परचुरे यांच्या वकिलाला, तर ते सर्व कळत होते, जाणवत होते आणि म्हणून दफ्तरींनी ग्वाल्हेरच्या साक्षीदारांना 'ही सारी सडलेली गटारीघाण' समजून त्या साक्षीदारांना उचलून धरण्याचे टाळले. दफ्तरींनी पोलीसअधिकारी साक्षीदारांनी केलेली कबुलीवजा विधाने चातुर्याने उपेक्षिली. दफ्तरींचा सारा भर डॉक्टर परचुऱ्यांच्या व्यक्तिदर्शनावर आणि त्यांच्या कबुलीजबाबावर होता. हा सूर्य नि हा जयद्रथ अशा चालीवर हा सात सह्या केलेला कबुलीजबाब नि हे डॉक्टर परचुरे असे ध्रुपद दफ्तरींनी निरनिराळ्या सुरावटीत आळवले, अगदी दमदार, पल्लेदार तानबाजीने. आणि यातला मॅजिस्ट्रेट अटल यांचा वर्ज्य स्वर कुशलतेने टाळला. अगदी अवर्ज्य होऊन लावला तोदेखील भीमपलास रागातल्या शुद्ध गांधाराच्या कणानेच. पण हे सारे माझे लिहिणे आज सत्तावीस वर्षांनंतरचे. त्या दिवशी दफ्तरींचे भाषण ऐकताना माझी स्थिती वेगळीच होती. त्या दिवशी दफ्तरींनी डॉक्टर परचुऱ्यांच्या वडिलांपासूनच बोलायला सुरुवात केली नि डॉक्टर परचुरे यांचे वडील श्री. सदाशिवराव परचुरे हे ग्वाल्हेर महाराजांचे शिक्षक, राजदरबारातली बडी आसामी, 'मास्टरसाब' म्हणून आदरणीय व्यक्ती. अशा पित्याचे पुत्र डॉक्टर परचुरे, स्वतः एम. बी. बी. एस. डॉक्टर, स्वतःची सरकारी नोकरी सोडून देऊन डॉक्टरी व्यवसाय खाजगी रीतीने नि यशस्वी रीतीने करणारे नि दीन-दुबळ्यांचे कैवारी म्हणून, राजदरबारातून सुकृत गुणवत्तेबद्दल इनामी पोशाख मिळालेले, राजकारणामध्ये अग्रेसर, ग्वाल्हेर राज्य हिंदुसभेच्या अध्यक्षपदावर विराजमान झालेले, वगैरे वर्णन दफ्तरींनी केले नि 'अहो महाराज! माझेच साक्षीदार डॉक्टर परचुऱ्यांबद्दल कसा आदर दाखवतात?' असे म्हणून त्यांनी अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची डॉक्टर परचुऱ्यांच्या व्यक्तित्वनिर्देशक विधाने अगदी नाइलाजाने वाचल्यासारखी वाचून दाखवली! असे डॉक्टर परचुऱ्यांचे व्यक्तित्व उंच उचलून धरून त्यावर 'भीमटोला' म्हणून म्हणाले, 'ह्या माणसाचा विचार करा. पिता आदरणीय बडी आसामी, स्वतः एम. बी. बी. एस. डॉक्टर, सरकारी नोकरी आणि यशस्वी व्यवसायी, ग्वाल्हेर राज्य हिंदुसभेचे अग्रगण्य पुढारी, सामाजिक कार्यकर्ते! हा माणूस म्हणे, पोलिसांच्या तोंडी दमदाटीला बळी पडला!' पोलिसांनी जे काही डॉक्टरांना सांगितले असेल, ते दमदाटीचे होते असे कोठे सिद्ध झाले नाही, आणि हा माणूस अशा कथित दमदाटीला बळी पडून ग्वाल्हेरच्या फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटपुढे बसून सात पानांच्या कबुलीजबाबावर सात सह्या करून देतो, मुकाट्याने करून देतो. एक नाही, दोन नाही, सात सह्या करून देतो! याला काय म्हणायचे? पोलिसांच्या दमदाटीला बळी पडलेल्याचा कबुलीजबाब? आणि बरे हा कबुलीजबाब खोटा होता ना? पोलीसअधिकारी डॉक्टर परचुऱ्यांना कुणाला भेटू देत नव्हते ना? मग फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटला त्याबद्दल काही सांगितले कसे नाही? ह्या मॅजिस्ट्रेटविषयी संशय वाटावा असे काही पुराव्यात आले नाही, कूटपरीक्षणात विचारले नाही, मग हा मॅजिस्ट्रेट भरवशालायक का नाही? तो स्वतः कोर्टापुढे येऊन कबुलीजबाब रीतसर घेतला म्हणून सिद्ध करतो आहे! इतके झाल्यावरही २७ मेला लालकिल्ल्यामध्ये स्पेशल जज्जचे कोर्ट उघडले तेथे हे डॉक्टर परचुरे येतात, पण ते त्या जज्जला कबुलीजबाब दमदाटीने लिहून घेतला याबद्दल एक चकार शब्द सांगत नाहीत. २७ मे रोजी पहिल्या दिवशी सांगत नाहीत. पुरे सतरा दिवस जाऊ देतात नि मग वकिलाच्या सल्ल्याने अर्ज देतात की, कबुलीजबाब साक्षीमध्ये अग्राह्य आहे नि तो मला कबूल नाही! याला काय किंमत देणार आपण? असे उशीराने कबुलीजबाब नाकारणे याला न्यायकोर्टे कवडीची किंमत देत नाहीत!' असे म्हणून दफ्तरींनी एक गठ्ठाभर लट्ठ ए. आय. आर. व आय. एल. आर. क्रिमिनल लॉ जर्नलची पुस्तके आणली होती त्यांतले उशीराने दिलेले कबुलीजबाब नाकारीचे अर्ज कोर्टांनी अमान्य केल्याबद्दल व ते कबुलीजबाब वैध मानल्याबद्दल न्यायदृष्टान्त माननीय न्यायमूर्तींना वाचून दाखवले! आपल्या इंग्रजी वक्तव्याचा पाऊस पाडला. मी बघत होतो, तिघेही न्यायमूर्ती दफ्तरींच्या वक्तव्यापुढे माना डोलावत होते! पण त्यावेळी जे जाणवले नव्हते पण आता आठवते की, तिघाही न्यायमूर्तींनी दफ्तरींचे बोलणे अगदी बरोबर आहे अशा अर्थाचे कोणतेही उद्गार मुळीच काढले नव्हते. मी मात्र त्यावेळी, त्या २७ मेच्या कोर्टातल्या कधी न संपणाऱ्या तासांमधून पायांच्या तळव्यांनाही घाम फुटलेला, पाठीच्या कण्यामधूनही भीतीची हुडहुडी भरलेला, समोरच्या डोलणाऱ्या माना बघून निर्दय हेलकाव्यामध्ये भोवंडत खुर्चीवर बसलो होतो. मला माझ्या समोरचे 'डोलणे' बघवत नव्हते, बाजूचे 'बोलणे' ऐकवत नव्हते. मी ऐकत असलेले बोलणे किती किमतीचे आहे याची मला कल्पना होती, म्हणून समोर बघत असलेले 'डोलणे' ही काही कामाचे, काही अर्थाचे नव्हे असे वाटून घेण्याचा अयशस्वी प्रयत्न करीत होतो. माझ्या शेजारच्या सहयोगी बंधूंना हे डोलणे खरे असेल का, हे विचारण्याचे धैर्य होत

नव्हते! हताश, असाहाय्य झाल्यासारखा स्वतःच्या कर्तृत्वावर नि डॉ. परचुरे यांच्या दैवावर विसंबून होतो! आपले कर्तव्य अजूनही करायचे असा निवारा शोधीत होतो, दयाळू परमेश्वराची करुणा भाकून स्वतःचे सांत्वन करून घेत होतो!

त्या दिवशी संध्याकाळी नथूरामचा निरोप घेताना नथूरामने मला शांतपणे म्हटले की, दफ्तरींच्या तर्कनिवेदनाचे उत्तर द्यायला आपण स्वतःच आरंभ करावा असे त्याला वाटत आहे! मी त्याला चटकन 'हो' म्हटले. पण त्या प्राण्याच्या शांतपणाआड दिसलेला त्याचा अडिग आत्मविश्वास नि दुर्दम्य धीर बघून मी चकितच झालो होतो. फाशीचा दोर समोर हेलकावत असूनही त्या प्राण्याचा शांतपणा जरासुद्धा हिंदकळला नव्हता! कसल्याही लांछनाचे सावट नाही, कसल्याही भीतीचे झाकोळणे नाही! आणि मी एक क्षुद्र मर्त्य मानव, समोरचे नुसते डोलणे बघून त्यामध्येच प्रतिपक्षाचा विजय नि स्वतःचे अपयश आहे अशा भीतीने तोंड लपवीत होतो. दफ्तरींच्या भडिमार वक्तव्याच्या हल्ल्याचा पहिला मुकाबला चुकला तर बरा असे धोरण बघत होतो! किती विकलचित्त झालो होतो मी. की भित्राच?

दिनांक २८ नि २९ मे ची आम्हाला सुटी होती. त्या दोन्ही दिवशी नथूरामला आम्ही जेलमध्ये भेटलो होतो. तेथे जेलरनी आम्हाला—नथूरामला—नि त्याच्या वकिलांना पार्टीच दिली असे म्हणावयाचे. कॉफी, बिस्किटे, फळे इत्यादी खास पदार्थांचे तबक आम्हा सर्वांसमोर आले होते. नथूरामशी आम्ही अपील प्रकरणाबद्दल इतरही पुष्कळ विषयांवर बोललो. जवळजवळ दोन तास आम्ही तेथे होतो. त्या भेटीतच नथूरामने आम्हाला रामदास गांधींच्या पत्राबद्दल सांगितले व त्याला काय व कसे उत्तर द्यावयाचे याची आमच्याशी चर्चा केली. रामदास गांधी हे महात्मा गांधींचे सुपुत्र. त्यांनी नथूरामला लिहिले होते की, एक दिवस असा येईल की, नथूरामला आपली चूक कळून येईल. नथूरामला शिक्षेची सूट मिळावी असा प्रयत्न ते करीत असल्याबद्दलही त्यांनी लिहिले होते. नथूरामने त्या पत्राला कसे उत्तर देण्याची इच्छा आहे ते सांगून आमचा सल्ला विचारला होता. आम्ही त्याला एकच गोष्ट सुचविली, ती म्हणजे रामदास गांधी यांनी एकटे न येता त्यांनी आपल्याबरोबर एखाद्या श्रेष्ठ, निःपक्षवृत्तीच्या नेत्याला बरोबर घेऊन यावे. नथूरामचा आग्रह होता की, त्याची कारणे ऐकून रामदास गांधींना हे पटेल की, नथूरामने काही चूक केली नाही तर तसे रामदासजींनी जाहीरपणे कबूल करावे. नथूरामने, मला शिक्षेची सूट वगैरे काही नको, मला मिळालेली शिक्षा मी भोगायला नेहमी तयार आहे असे लिहून रामदास गांधींच्या पित्याला मारले याबद्दल वाईट वाटले पण नथूरामचे मातृभूमीबद्दलचे प्रेम अधिक होते आणि कारणांची सयुक्तिकता पटल्यामुळे आपण हे कृत्य केले, असे रामदास गांधीजींना कळवले. यदाकदाचित नथूरामला आपली चूक कळून आली तर त्याला तसे कबूल करण्यात काही आडकाठी वाटणार नाही असेही कळवले. पुढे आमची अपेक्षा होती तसेच झाले. शेवटपर्यंत रामदास गांधी नथूरामला भेटायला आले नाहीत.

दिनांक २७ ला दफ्तरींचे भाषण संपले होते. पण दिनांक ३० ला पेटीगारा यांचे जवळजवळ दोन तास भाषण झाले. त्यांनी चौकशी पोलिसांच्यावतीने जज्ज आत्मचरणजींच्या कांही टीकेबद्दल आक्षेप घेतला व जज्ज आत्मचरणजींच्या निर्णयाचा तेवढा भाग रद्द ठरविण्यात यावा असे प्रतिपादन केले. त्याला कोणीच विरोध केला नाही.

दिनांक ३० मे रोजी उरलेल्या वेळात श्री. बॅनर्जींनी आपले उत्तराचे तर्कनिवेदन सांगितले. दिनांक ३० मे रोजी पुन्हा सुटी होती. दिनांक १ जूनला नथूरामने आपले उत्तराचे निवेदन सुरू केले. या खेपेचे उत्तराचे भाषण विशेष परिणामकारी झाले नव्हते, पण मधून-मधून त्याच्या भावनोदात्त उद्गारांनी प्रेक्षक श्रोते भारावून गेलेच. माननीय न्यायमूर्तिगण शांतपणे पण लक्ष देऊन त्याचे भाषण ऐकत होते. नथूरामने भाषणाचे शेवटी पुन्हा त्याची शिक्षा लवकर अमलात आणावी व फाशीची वाट पाहत अंबाला जेलमधील मृत्युदंडाच्या दंडितासाठी नेमून दिलेल्या एकांतवासाच्या कोठडीत दिवस घालवायची शिक्षा त्याला भोगवू नये याबद्दल सरकारला कळविण्याची न्यायमूर्तींना विनवणी केली. नथूरामने आपले भाषण दिनांक २ मे रोजी सुमारे १२ वाजता संपविले. दिनांक २ च्या भाषणात दफ्तरींच्या आक्षेपांना आपल्या तर्कविवेदनाने उत्तर देण्याचा नथूरामने प्रयत्न केला होता आणि त्याचे ३० जानेवारीला केलेले कृत्य कसे त्याचे एकट्याचे होते व त्याचा इतर अभियुक्तांशी काही संबंध नव्हता, याबद्दल विशेष रीतीने पुन्हा मुद्दे सांगितले. तो धीरगंभीर आवाजाने बोलत होता. सावकाश धीम्या गतीने बोलत होता. आवाजाचा चढ-उतार फारसा नव्हता, पण परिणामी जणू भावनांचा समुद्र तळापासून घुसळून काढल्यासारखे वाटले. ते ऐकून प्रेक्षक श्रोत्यांचे-सगळ्यांचेच डोळे पाणावल्याखेरीज राहिले नाहीत.

नथूरामचे भाषण संपताच मी उत्तर देण्याला उभा राहिलो. मला उत्तर द्यावे लागणार आहे हे दिसतच होते व मी तयारीही करून ठेवली होती. भाषणाला सुरुवात करताना मला माननीय न्यायमूर्तींचे लक्ष वेधण्याला जरा अडचणच भासली. नथूरामच्या भाषणाच्या स्वरांचा निनाद रेडिओच्या दुसऱ्या स्वरलहरींचे बटन दाबल्यागत एकाएकी संपणे शक्य नव्हते. म्हणून मी दफ्तरींनी आपल्या भाषणात आक्षेपिलेल्या मुद्द्यांवर थोडक्यात सांगायला सुरुवात केली होती. असे विवरण सांगण्यात पाच एक मिनिटे घालवून 'मी आता लालकिल्ल्यातील न्यायालयात डॉ. परचुऱ्यांनी कबुलीजबाब नाकारण्याची आपत्ती उशीराने-सतरा दिवसांच्या उशीराने उचलली, त्याबाबतची वस्तुस्थिती मी आपणापुढे प्रथमच निवेदन करणार आहे,' असे म्हणताच तिघेही न्यायमूर्ती अस्तन्या सरसावून ऐकायला लागले! मी लालकिल्ल्यातील न्यायालयाच्या कागदपत्रांच्या फायलीमध्ये संदर्भाच्या कागदावर कपटाच्या पताका लावून ठेवल्या होत्याच. कारण हे सगळे कागद छापील पुस्तकात बिनमहत्त्वाचे म्हणून छापले नव्हते. मी न्यायमूर्तींना सांगितले की, अभियोगपक्षाने आरोपपत्राबरोबर कायद्याप्रमाणे दाखल करावयाच्या पुराव्याचा एकही कागद

**मला शिक्षेची सूट नको, मी शिक्षा भोगायला तयार आहे.**

दाखल केला नव्हता. नंतर पुढच्या तारखांवर गटागटाने पुराव्याचे कागद अभियोगपक्षाने दाखल केले व उरलेले कागद दाखल करण्यासाठी वेळ मागून घेतला होता. मी कबुलीजबाबाचे प्रथम निरीक्षण करूनच मग त्याबद्दल आपत्तिअर्ज देऊ शकलो असतो. म्हणून मी निरीक्षणाकरता न्यायालयात निवेदने दिली ती न्यायमूर्तींनी बघावी म्हणून पताकांचे संदर्भ सांगितले. न्यामूर्तींनी ते कागद बघितल्यावर जवळजवळ आठ जुलैपर्यंत कबुलीजबाबाचे कागद मला निरीक्षणासाठी मिळू शकले नव्हते हे स्पष्ट झाले. त्या दिवशी मला सूचना मिळताच मी निरीक्षणासाठी निवेदन दिले तेही आपण बघावे असे न्यायमूर्तींना मी सांगितले. ते निरीक्षण केल्यानंतर ग्वाल्हेरच्या किल्ल्यामध्ये कबुलीजबाब लिहून घेणाऱ्या मॅजिस्ट्रेटला किल्ल्यावर विचाराधिकार नव्हता हे दाखवणारे ग्वाल्हेर शासन गॅझेट ग्वाल्हेरहून आणण्याकरिता मी एक दिवसाचा वेळ मागून घेतला व ते मिळवून मी १२ जुलैला कबुलीजबाबाच्या आपत्तींचा अर्ज कोर्टामध्ये दिला हे सांगितले. जो उशीर झाला तो माझ्याकडून नव्हता. उलट पुराव्याचा हा कागद अभियोगपक्षाने स्वतःच कोर्टामध्ये दाखल करण्यास उशीर केला होता ही वस्तुस्थिती होती व ही वस्तुस्थिती अभियोगपक्षाला माहीत होती म्हणूनच अभियोगपक्षाने हा आक्षेप प्रारंभिक कोर्टात मुळीच घेतला नव्हता. कारण प्रारंभिक न्यायाधीशांच्या स्वतःच्या माहितीतल्या या गोष्टी होत्या. माननीय महाराज ! आपल्याला त्या कशा कळणार ? छापील पुस्तकामधून हे कागदपत्र छापण्याची आवश्यकता कुणालाच भासली नाही. न मला अपिलंटला, न उच्च न्यायालयाच्या छापखाना अधिकाऱ्यांना. कारण अभियोगपक्षाचे विद्वान अॅडव्होकेट जनरल हा बिनबुडाचा आक्षेप माननीय महाराज ! आपल्यापुढे न्यायदृष्टान्ताच्या आधारावर उचलतील, याचे कुणालाच अनुमान नव्हते. त्यांनी तो उचलला याचेच मला आश्चर्य वाटत आहे ! मी असे म्हणताच माननीय मुख्य न्यायाधीश मला म्हणाले, किंचित त्रासल्या स्वरात म्हणाले, ठीक आहे ! आपला पुढचा मुद्दा ! मीही दुसऱ्या मुद्द्याकडे वळलो. माझा पहिला बार योग्य ठिकाणी लागला होता ! मी पुढे बोलणार तोच विश्रांतिमध्यंतराची वेळ झाली व कोर्ट उठले.

मध्यंतरानंतर मी भाषणाला सुरुवात करून थोड्याच वेळात एक वाक्य म्हटले, माननीय महाराज ! या अभियोगात अभियोगपक्षाचे साक्षीदार विद्वान राजबहादुर अटल, ग्वाल्हेरचे सिव्हिल जज्ज व प्रथम श्रेणी स्पेशल मॅजिस्ट्रेट यांच्या साक्षीवर डोळे मिटून विश्वास ठेवणे मला कठीण झाले आहे ! मी हे म्हणताच तिघाही माननीय न्यायमूर्तींनी कान टवकारले. मी हे वाक्य बुद्ध्याच म्हटले होते, पण हे एका न्यायाधीश अधिकाऱ्याबद्दल अनादराचेच असल्याने न्यायपीठावरच्या माननीय न्यायमूर्तींना ते जाणवेल याची मला अपेक्षा होतीच. म्हणून मी संथपणे, आवाजामध्ये तीव्रता न आणता बोलत होतो. मी या साक्षीदार मॅजिस्ट्रेटचे कूटपरीक्षण वाचत होतो व मॅजिस्ट्रेट महोदयांनी मी विचारलेल्या एकेक मुद्द्यांना दिलेली उत्तरे कशी मासलेवाईक होती ती दाखवत आवश्यक ती टीका करीत होतो. या साक्षीदाराला ग्वाल्हेरचा किल्ला कोणच्या कोर्टाच्या अधिकारात आहे हे माहीत नाही. ज्या जातीय दंगाग्रस्त क्षेत्रापुरतेच या साक्षीदाराला मॅजिस्ट्रेटचे अधिकार ग्वाल्हेर शहरात आहेत त्या मॅजिस्ट्रेटला ग्वाल्हेरचा किल्ला दंगाग्रस्त क्षेत्र म्हणून घोषित झाले आहे की नाही हे माहीत नाही. न्यायालयाचे न्यायिक बंदीगृह कोठे आहे हे या साक्षीदाराला माहीत नाही...मी एकेक वाक्य वाचून टीका करीत होतो व न्यायापीठावरचे न्यायधीश–विशेषतः एका बाजूने जस्टिस अछरूरामजी व दुसऱ्या बाजूने जस्टिस खोसला मला प्रश्न विचारीत होते. अगदी अविश्वासाच्या संदेही स्वरात प्रश्न विचारणे चालले होते. मी उत्तरेही तयारीने देत होतो. ती त्यांच्या गळी उतरत आहेत हे मला दिसत होते. मधूनमधून आत्मचरणजींच्या 'जरूरी पुरते' लिहिण्याच्या लकबीवरही टीका करीत होतो. याच्या संदर्भात मी ग्वाल्हेर गॅझेट दिनांक २९–१२–१९१७ च्या संबंधात मॅजिस्ट्रेट साक्षीदाराने कसे उत्तर दिले होते व ते जज्ज आत्मचरणजींनी कशा न बोलणाऱ्या शब्दांत लिहून घेतले तेही सांगितले. पुढे साक्षीदाराने कबुलीजबाब कसा प्रथम आपल्या घरी ठेवला, नंतर काही दिवसांनी बँक लॉकरमध्ये ठेवला–कबुलीजबाब लिहिताना त्यावर कोर्टाचे शिक्के लावले नाहीत, ते दीड महिन्याने लावले, ग्वाल्हेर किल्ल्यावर साक्षीदार कोर्टाचा शिपाई बरोबर न घेता कसे पोलिसांच्या गाडीत किल्ल्यावर गेले, मॅजिस्ट्रेट साक्षीदाराने कबुलीजबाब लिहून घेण्यापूर्वी किंवा लिहून घेतल्यानंतर डॉ. परचुऱ्यांना न्यायिक बंदीगृहात ठेवण्याची आज्ञा कशी दिली नाही, तसेच अधिकाऱ्यांच्या कैदेत राहू दिले, वगैरे सांगितले. माझी सर्व विधाने साधार होती व माझी उत्तरे न्यायमूर्तींना पटत होती असे मला जाणवत होते. पण त्यांच्या चेहऱ्यावरची तलखी वाढतच होती. या वेळी मी शांतपणे अगदी विनयाच्या आविर्भावाने म्हटले, ' महाराज ! मला क्षमा करा. मी कसले कूटपरीक्षण करणार ? आणि अशा विद्वान, अनुभवी, प्रथम श्रेणी मॅजिस्ट्रेटच्या तोंडून डॉक्टर परचुऱ्यांना फायदेशीर किंवा त्यांच्या मॅजिस्ट्रेटच्या स्वतःच्या आदरणीय व्यक्तित्वाला हानिकारक अशा कबुली काय वदविणार ? मी कूटपरीक्षण केले. पण त्यामध्ये मी फारच मामुली स्वरूपाची, अभियोगपक्षाला विघातक किंवा मॅजिस्ट्रेट महोदयांची लायकी दाखवणारी माहिती काढू शकलो ती विशेष महत्त्वाची नाहीत, तिने कबुलीजबाबाविषयी संशय असा निर्माण होत नाही असेच आपणाला वाटेल. माझे कूटपरीक्षण संपविताना मी या मॅजिस्ट्रेट साक्षीदारांना प्रश्नोत्तराच्या कागदावर–सरकारी पिवळ्या कागदावर उरलेल्या जागेतच पुढली कबुलीजबाबाची वाक्ये लिहायला का आरंभ केला नाही ? याचे कारण कबुलीजबाब अगोदरच लिहिला होता का ? असा प्रश्न विचारला आहे हे आपण बघावे ? माझे गरिबाचे कूटपरीक्षण बाजूला ठेवा आपण, पण मग विद्वान अॅडव्होकेट जनरल महोदयांनी केलेल्या मुख्य परीक्षणाचे काय ? ते तर शपथेवर सांगितलेले अभियोगपक्षाचे प्रमाण ! मी कूटपरीक्षणाने खोडून काढले नसल्यास अकाटच प्रमाण ! तर मी तेच मुख्य परीक्षण आपणाला वाचून दाखवतो. आपण त्यावरच बारकाईने विचार करावा. ' असे म्हणून मी अटलमहोदयांच्या मुख्य परीक्षणातील तो भाग, जेथे साक्षीदाराने कबुलीजबाब लिहून घेण्याचे अगोदर कायद्यानेच घ्यावयाची काय काय काळजी घेतली म्हणून सांगितले होते तो भाग, वाचून दाखवायला आरंभ केला. मी एकेक वाक्य वाचत होतो नि त्या कामाला किती वेळ लागला असेल असे विचारीत स्वतःच जरूर तेथे सुचवीत होतो व ते उत्तर अगदी कमीत कमी वेळाचे आहे अशी

खात्री करून देत होतो. मी हा भाग वाचावयाला आरंभ करताच दोघा न्यायमूर्तींनी, अछरूरामजींनी व खोसलांनी आपल्या पेन्सिली सरसावल्या. टेबल, खुर्ची, पहारेकऱ्याची व्यवस्था—५ मिनिटे पुरेल पण तितकी हवीतच. पुढे कबुलीजबाब देणे म्हणजे काय, त्याचा काय परिणाम होतो ते समजाविणे याला साठ मिनिटे लागली असे मॅजिस्ट्रेट महोदय स्वतःच सांगतात; ती साठ मिनिटेच धरायला हवीत. त्यानंतर साक्षीदाराला डॉ. परचुऱ्यांनी मी काय कबुलीजबाब देणार आहे ते सर्व तोंडी सांगितले-ते ऐकायला ४५ मिनिटे लागली असे साक्षीदार स्वतःच सांगतो. ती ४५ मिनिटे धरू या–धरलीच पाहिजेत. आपल्याला अभियोगपक्षाचा साक्षीदार खोटे थोडेच सांगेल? पुढे मॅजिस्ट्रेट साक्षीदाराने डॉक्टरांना पुन्हा नीट विचार करा. तुमच्या कबुलीजबाबाने तुम्ही महात्मा गांधींच्या खुनासाठी खुनी माणसाला जाणूनबुजून मदत केली असे ठरेल बरे! नीट विचार करा म्हणून डॉक्टरांना नीट विचार करायला पुरी तीस मिनिटे दिली म्हणून साक्षीदार सांगतो. तीच खरी धरायला हवीत ती धरू या. पुढे कायद्याची प्रश्नोत्तरे लिहिली, ती लिहायला २० मिनिटे धरू या का? धरायलाच हवीत. पहिले दीड पान त्या प्रश्नोत्तरांनीच भरले आहे. तितका वेळ हवाच हे सारे लिहायला. तर २० मिनिटे झाली. पुढे कबुलीजबाब लिहून घेतला. सहा पूर्ण पाने लिहिली. सुवाच्य अक्षरात लिहायला किती वेळ लागला असेल? पण हे जिकिरीचे आहे. सध्या आपण ते राहू द्यावे. आपण पुढे पाहू! मग साक्षीदाराने पुढे काय काय केले? स्वतः सात पानांचा कबुलीजबाब वाचून दाखवला. त्याला दहा मिनिटांपेक्षा जास्ती वेळ लागेल. पण सध्या दहा मिनिटेच धरू या. पुढे डॉक्टरांना स्वतः वाचून पाहायला वेळ दिला त्यालाही दहा मिनिटे. मग डॉक्टरांनी सात पानांवर सात सह्या केल्या त्याला पाच मिनिटे, नंतर साक्षीदाराने कबुलीजबाबावर ते 'राजीखुशीने, अक्कलहुशारीने, विनाप्रभावी प्रलोभन, दिला असे प्रमाणपत्र लिहिले व स्वतः प्रत्येक पानावर सह्या केल्या त्याला दहा मिनिटे व सैनिक अधिकारी मेजर छत्रे यांना बोलावणे पाठवले व ते आल्यावर त्यांच्या हवाली कैद्याला दिले. त्यात दहा मिनिटे गेली असतील. मग हा खर्च झालेला वेळ किती झाला बरे? एकूण बेरीज दोनशे पाच मिनिटे. म्हणजे तीन तास पंचवीस मिनिटे! पण मग कबुलीजबाब लिहून घेण्याचे काय? हा सहा पाने भरून आहे. सुवाच्य अक्षरात, विना खाडाखोड, पुस्तक लिहिल्याप्रमाणे लिहिला आहे. चौदाशे शब्दांपेक्षा जास्त शब्दांचा आहे. मी स्वतः मोजले आहेत. प्रमाणित प्रतिलिपीत २००० शब्दांचा आकार मजपासून कोर्टाने घेतला आहे. येथे मी ती रत माननीय जस्टिस खोसला यांच्या हातात शिरस्तेदाराद्वारा देवविली व म्हटले, 'हे चौदाशेपेक्षा जास्त शब्द लिहून काढायला—दुसऱ्याने दिलेला जबाब म्हणून लिहून काढायला दोन तासांपेक्षा जास्त, किती तरी जास्त, जवळजवळ अडीच तास लागतात. मी व माझे सहयोगी डांगे यांनी तसे करून आमची खात्री करून घेतली आहे. आपणही हवी तर खात्री करून घ्यावी.' डांग्यांनी उभे राहून माझे समर्थन केले. बरोबर. ते दोन तास—सव्वा दोन तास धरू या. पण मग किल्ल्यावर साक्षीदार एकंदर किती वेळ होते. स्वतः साक्षीदार सांगतो जवळजवळ तीन तास. हा पाहा संदर्भ. पोलीस साक्षीदार देऊळकर सांगतात अडीच ते तीन तास, पोलीस साक्षीदार थोरात, पाटील सांगतात, डॉक्टर परचुरे यांना घेऊन साक्षीदार मॅजिस्ट्रेट साधारण अडीच तास बसले होते. हे दोन्ही संदर्भ पाहा. आपण तर पुरे तीन तास धरू या. मग तर काही बाधा नाही? मग या तीन तासांमध्ये तीन तास पंचवीस मिनिटे अगोदर खर्च झालीत! मग...आणि मी आता वेळपर्यंत बुद्धयाच धरून ठेवलेली खर्जाच्या स्वरातली व धीम्या विलंबितातली आलापी, द्रुतगतीने मध्यम सप्तकातल्या पंचमावर – वरच्या षड्जाच्या स्वरावर नेली! मी मोठ्याने, आणखी मोठ्याने, खूप मोठ्याने भराभरा प्रश्नांची झड लावली! जर विद्वान मॅजिस्ट्रेट प्रथम श्रेणी महोदयांनी कायद्याचे काटेकोर पालन व इतर गोष्टी करण्यात तीन तास पंचवीस मिनिटे एकंदर खर्च केलीत आणि ते खरे असलेच पाहिजे, तर मग १४०० हून जास्त शब्दांचा सहा पानांचा कबुलीजबाब मॅजिस्ट्रेट महोदयांनी केव्हा लिहिला? किल्ल्यावर तर त्यांनी तीन तासच जेमतेम घालवले. तर मग हा कबुलीजबाब तेथे कोठून लिहून आणला? हे आपणाला कोण सांगणार? साक्षीदार तर म्हणतो अगोदर कबुलीजबाब लिहिला नि मग प्रश्नोत्तरे लिहिली. असे मुळीच नाही झाले! माझ्या कूटपरीक्षणामध्ये दिलेले साक्षीदार मॅजिस्ट्रेटचे उत्तर बघावे? मग काय मॅजिस्ट्रेट श्री. अटलमहोदयांनी तो लिहिलेला कबुलीजबाब आपल्या कोटाच्या खिशातून काढला? मग हे दुसरे कोण सांगणार? डॉ. परचुरे! ते काय काय म्हणतात ते आपण पाहू या म्हणून मी डॉ. परचुऱ्यांच्या कोर्टातल्या लेखी निवेदनाच्या भागाचा पुन्हा हवाला दिला. मी पाहिले, न्यायपीठावरच्या तिन्ही न्यायमूर्तींमध्ये पुन्हा भारी खळबळ झाली होती. विशेषेकरून जस्टिस खोसला फारच उत्तेजित झालेले दिसले व ते मोठ्याने म्हणाले, 'मी सांगतो तुम्हाला, मिस्टर इनामदार! मी दफ्तरीचे सगळे भाषण फार काळजीपूर्वक ऐकले. पण त्या त्यांच्या भाषणाने माझे मुळीच समाधान झालेले नाही. मी अजूनही याच मताचा आहे की, डॉ. परचुऱ्यांनी दिलेला हा कबुलीजबाब राजीखुशीने, विनाप्रभाव-प्रलोभनाने दिलेला मुळीच नाही. हा जबाब डॉ. परचुऱ्यांभोवती जे भीतीचे–जबरदस्तीचे वातावरण निर्माण करण्यात आले होते त्याचाच परिणाम आहे. मी या कबुलीजबाबावर मुळीच भरोसा करणार नाही! दुसऱ्या बाजूने जस्टिस अछरूरामजी म्हणाले, 'हे सगळे सांगणाऱ्या मॅजिस्ट्रेटचा जरा विचार तर करा! ही सगळी भलतीच विसंगत, भरमसाट अतिशयोक्ती आहे. यावर कोण विश्वास ठेवील? मुख्य न्यायमूर्ती जस्टिस भंडारी म्हणाले, 'आम्ही या पुराव्यावर निश्चितच भरवसा करणार नाही!'' न्यायमूर्ती हे रागावूनच म्हणाल्यासारखे वाटले मला. पण लगेच त्यांच्या नेहमीच्या मृदुस्वराने मला म्हणाले, 'मिस्टर इनामदार! तुमचे कबुलीजबाबाला खोडून काढण्यासाठी जे दुसरे महत्त्वाचे मुद्दे आहेत ते तुम्ही आम्हाला सांगा!' मी अगदी भारावून गेलो नि 'मी फार अनुग्रहित आहे

## तर मग हा कबुलीजबाब तेथे कोठून लिहून आणला?

आपला महाराज !' असे नम्रतेने मान लववीत म्हणालो. आणि मग माझ्या तोफखान्यातली, कबुजीजबाबाला नेस्तनाबूत करणारी सारी लहान-मोठी अस्त्रे हारीने मांडायला सुरुवात केली ! माझ्या टिपणात आणखी १५-२० मुद्दे होते. मी सांगत होतो नि मुख्य न्यायमूर्ती व जस्टिस अछरूरामजी टिपणे करून घेत होते. जस्टिस खोसला छापील पुस्तकावर कुठे कुठे खुणा करीत होते. मी तोफखान्याचे शेवटचे अस्त्र मोठयापैकीच म्हणून पोलीस साक्षीदार देऊळकरांच्या कूटपरीक्षणामधला त्यांच्या मानसशास्त्रीय जमालगोटयाची गोळी, प्रश्नपरीक्षणाची ही पद्धत मी कायद्याने आणि अनुभवाने बनविली आहे, असे सांगणारी दाखवली नि मग अभियुक्तांनी - डॉक्टरांनी - आपल्या झाडून साऱ्या नातेवाइकांची नावनिशीची जंत्री सांगणारा कबुलीजबाबामधील भाग वाचून दाखवला व म्हटले, महाराज ! हा कबुलीजबाब नाही, हे प्रच्छन्न - प्रश्नपरीक्षण आहे. विद्वान प्रथमश्रेणी मॅजिस्ट्रेट श्री. राजबहादुर अटल यांनी आपल्या घरी नकलून लिहिलेले ! माझे व्यंग ऐकून तिघे न्यायमूर्ती माझ्याकडे स्मितमुखाने बघत होते.

मी मग पुन्हा गोपाळ गोडसे याच्या बचावाकडे वळलो नि निवेदन केले की, गोपाळच्या विरुद्ध अभियोगपक्षाचा पुरवा म्हणजे अभियोग साक्षीदार आमचेकर याच्या साक्षीमधला संदेहात्मक प्रक्षिप्त उल्लेख आणि पोलिसांनी सावकाश आपल्या सोयीने मुंबईला वरळीच्या पोलीस कार्यालयात नेऊन ओळखपरेडीची कारवाई केलेली काही साक्षीदार मंडळी - हॉटेलची कर्मचारी मंडळी व एक टॅक्सीचालक यांच्या ओळखसांगे पुराव्यावर आधारित आहे. गोपाळकडून कोणतीही अभियोजक वस्तू पोलिसांना मिळवता आली नाही. खाकी पिशवी प्रदर्श वस्तू क्रमांक ५४ ही गोपाळकडून मिळालेली वस्तू असे म्हणायला कायदेशीर पुरावा नाही. ही पिशवी गोपाळवर पोलीस साक्षीदार पिंटोने लादलेली वस्तू आहे. पोलिसांनी गोपाळच्या बाबतीत केलेल्या अनियमित कार्यवाहीचा उल्लेख केला, बचाव्याच्या पुराव्याच्या अभावाचे कारण सांगितले व मी 'विचारून परत घेतलेल्या' प्रश्नाचे महाभारतही सांगितले. कारण या प्रश्नाबद्दल दफ्तरींनी आपल्या भाषणात जोरदार उल्लेख 'सूचक कबुलीगर्भित प्रश्न' म्हणून केला होता. हा माझा प्रश्नच नव्हता व मी जज्ज आत्मचरणना असे पुन्हा पुन्हा सांगितले. पण त्यांनी आपल्या मासलेवाईक मोघम पद्धतीने मी अशा अर्थाने साक्षीदाराला सांगत नव्हतो असे माझ्या नावे लिहिले. या आत्मचरणजींच्या लिहिण्याने मी किंवा माझे पत्रकार दोषी ठरत नाहीत, असे मी परोपरीने सांगितले. शेवटी माझ्या दोन्ही पक्षकारांच्या बचावाचा वकिली भाषेत समारोप केला व माझ्या दोन्ही पक्षकारांना निर्दोष म्हणून सोडून द्यावे असे नम्रतेने विनविले ! दिनांक २ जून १९४९ शुक्रवारच्या तिसऱ्या प्रहरचे तीन वाजून गेले होते. मी ग्वाल्हेर येथे एप्रिल १९४८ मध्ये बुद्धयाच अंगावर घेतलेले डॉ. परचुऱ्यांचे किवलीदौत्य मी पूर्ण केले होते, यशस्वीरीतीने !

कोर्टकाम संपल्यावर एकमेकांचा निरोप घेताना नथूरामच्या चेहऱ्यावरचे समाधान बघून मला वाटले की, गोपाळसुद्धा सुटू शकेल या विचाराने तो सुखावला आहे. आणि मी गोपाळसाठी नथूरामच्या इच्छेला मान देऊन हे काम लालकिल्ल्यात मधेच एकाएकी अंगावर घेतले त्याचे सगळे परिश्रमिक मला मिळाले आहे असे वाटून मीही सुखावलो होतो ! मी या अभियोगपर्वात गोपाळमुळेच नथूरामच्या अतिनिकट सानिध्यात आलो नि नथूरामच्या व्यक्तिवाची ओळख मला झाली, ही केवढी माझी उपलब्धी ! त्या शापित जीवात्म्याला, त्याच्या लाडक्या गोपाळच्या सुटकेच्या आशेने त्याच्या अखेरच्या दिवसांत मी पालविले होते हा केवढा माझ्या वकिली व्यवसायातला दैवयोग !

२ जून १९४९ च्या माझ्या पंजाब उच्चन्यायालयातल्या दोन तासांच्या कामाने डॉ. परचुरे यांच्या बचावावर न्यायालयाचे शिक्कामोर्तब झाले असेच म्हणावयाचे ! त्याच संदर्भात गोपाळच्या सुटकेचीही आशा सर्वांना वाटत होती. दुपारच्या विश्रांतिमध्यंतरात आणि कोर्ट सुटल्यावरही माझ्यावर अभिनंदनाचा वर्षाव चोहोकडून होत होता. कितीकांनी, कुणीकुणी, मला प्रशंसिले म्हणून सांगू ? त्या सगळ्या स्तुतिगानवृंदातली एक व्यक्ती माझ्यासमोर अजून उभी - लक्षात आहे. पंजाबचे एकेकाळचे मंत्री डॉ. गोकुळचंद नारंग विशेष व्यक्तिकक्षात उभे होते. त्यांची माझी दृष्टादृष्ट होताच त्यांनी मला जवळ बोलावले नि प्रेमाने माझा हात दाबून म्हटले, 'तुम्ही आपल्या कामाचे संचालन फारच कुशलतेने केले आहे. ते बघून मला तुमचे भारी कौतुक वाटते. तुमच्यापुढे उज्ज्वल भविष्यकाळ उभा आहे ! तुमच्या यशाबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो !' इतर कोण कोण, मला काय काय म्हणत होते ते कसे सांगू ? सगळीकडून अभिनंदन ! हार्दिक अभिनंदन ! फार छान काम चालवलेत हो ! भारीच हुशारीचे काम ! काय दृश्य पाहायला मिळाले आहे आज ! नशिबाचा खेळ ! शेवटचे शब्द हिंदीतले-'क्या नजारा देखने को मिला है आज ! तकदीर का खेल !' हे होते. कोण म्हणत होते हे सारे, मला खरेच सांगता येत नाही ! मी दफ्तरींचा निरोप घ्यावा म्हणून शोधले तर ते निघून गेले होते, नेहमीप्रमाणे काही हसले-बोलले नाहीत नि तसेच मला भेटल्या-बोलल्याशिवाय निघून गेले होते ! मी घरी-हॉटेलमध्ये येऊन नेहमीप्रमाणे क्षमासागर परमेश्वराची कृपा नि क्षमाही मागितली.

मी दिनांक २ जूनला आपले भाषण संपविल्यावर डांगे यांनी

**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**
लेखक ब. मो. पुरंदरे
मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

करकरे यांच्यावतीने उत्तराचे भाषण करावयास प्रारंभ केला. ते दिनांक २ ला बाकी दिवसभर आणि ३ जूनला दिवसभर बोलले. दिनांक ४ व ५ जून हे सुटीचे दिवस होते. दिनांक ६ जूनला सकाळी श्री. देवेन्द्रनाथ अवस्थांनी शंकर किस्तय्याचे वतीने उत्तराचे भाषण केले. श्री. अवस्थींच्या भाषणाचे वेळी मी न्यायपीठाकडे न्याहाळून बघत होतो नि शंकर किस्तय्याही सुटणार अशी मला खात्री वाटू लागली होती. अवस्थींचे भाषण संपल्यावर मी त्यांना तसे बोलूनही दाखवले. त्यांना किती बरे वाटले ! विश्रांतिमध्यंतरानंतर नेहमीप्रमाणे अपीलाची सुनावणी आटोपण्याची – समारोपाची भाषणे– आभारप्रदर्शन झाले. न्यायमूर्तित्रयांनी अपीलाचा निर्णय राखून ठेवून सुनावणी स्थगित झाल्याचे आदेश दिले व कोर्ट उठले. आम्ही सर्वांनी व नथूरामने उठून तिघा न्यायमूर्तींना अभिवादन केले. आम्ही एकमेकांनीही निरोप घेतला. माझ्यावर चोहोबाजूंनी अभिनंदनाची बरसात होत होती. मी ती टाळीत नथूरामच्या पाठोपाठ पोलिसांच्या कक्षेमध्ये गेलो नि तेथे नथूरामचा निरोप घेतला. तेथे जाताना व तेथे गेल्यावरही माझ्या मनात 'ही माझी नथूरामची भेट शेवटचीच ठरणार की काय' अशा शंकेने घरे पाडायला सुरवात केली होती. माझ्या मनातली वेदना मला नथूरामशी मोकळेपणी बोलू देत नव्हती. माझे डोळेच अधिक बोलके झाले होते. मी नथूरामशी काही सांत्वनाचे, निरोपाचे बोलायच्याऐवजी तोच मला, माझ्या भावनाकुल मनाला धीर देत होता. सिमल्याचा स्वर्गीय देवलोक सोडून अंबाला बंदीगृहाच्या अंधाराकडे जाण्याची वेळ झाल्याची वास्तवता बोलून दाखवत त्याच्या 'आईच्या' – मातृभूमीच्या सेवेसाठी, त्याच्या सगळ्या 'तुम्हा बांधवां'च्या सेवेसाठी या भारतभूमीवर पुन्हा जन्म घेण्याच्या आनंदात असल्याचे सांगत होता. आणि मी त्याच्यापेक्षा दोन-तीन वर्षानेच, पण वडील म्हणून माझे आशीर्वाद मागत होता ! त्यावेळी भारतमातेच्या कोणत्या पुत्राने नथूरामला नाही म्हटले असते ?

डॉ. दत्तात्रेय सदाशिव परचुरे यांची अपिलामध्ये निर्दोष सुटका होऊनही भारत सरकारने व मध्य भारत राज्य सरकारने डॉक्टरांना सक्तीच्या सरकारी पाहुणचाराची हवाखोरी करायला लावून ग्वाल्हेरला काही महिने येऊ दिले नाही. पण त्यांच्या हवाखोरीचा मोसम संपल्यावर ते ग्वाल्हेरला परत आले, त्यावेळी त्यांची माझी भेट झाली ! तेव्हा माझे पक्षकार डॉ. परचुरे मला सांगत होते, 'अहो वकीलसाहेब ! तुम्हाला काय मजा सांगू ? तुमचे ते अपीलांचे काम संपलेना सिमल्याला ? त्याच्या दुसऱ्या दिवशी पहाटेच अंबाला सेंट्रल जेलचे जेलरसाहेब हातात दि. ७ जूनचा ताजा ट्रायब्यून–Tribune- घेऊन धावतच आमच्या कक्षागृहात आले नि म्हणाले, 'अजी डॉक्टरसाहब ! बधाई ! हजारबार बधाई ! आप तो सहीसलामत, साफ सुधारी हो गये ! सच मानो जी, देखो यह ट्रायब्यून क्या कहता है ?'

[ क्रमशः ]

---

## बँकांचे राष्ट्रीयीकरण खरोखर यशस्वी झाले का ? : पृष्ठ ८ वरून

बँकांची संख्या बरीच मोठी असल्यामुळे रिझर्व्ह बँकेचे नियंत्रणसुद्धा योग्य प्रकारे राहणार नाही व कार्यात एकवाक्यता आणणे जड जाईल. या शिवाय या दोन्ही प्रकारच्या बँकांमध्ये इतर अनेक दोष आहेत.

**बँकिंग कमिशनचा पर्याय :** आज या दोन्ही पद्धतींचा सुवर्ण मध्य शोधणे आवश्यक आहे. या दृष्टीने बँकिंग कमिशनने एक योजना १९७२ मध्ये सुचवली होती. या सूचना कमिशनने राष्ट्रीयीकरणाच्या दीड-दोन वर्षांच्या अनुभवानंतर आणि अभ्यासानंतर सुचवलेल्या होत्या. या योजनेनुसार देशाची विभागणी आर्थिकदृष्ट्या समतोल अशा काही भागांमध्ये करावी. हे भाग दोन बँकांमध्ये देण्यात यावेत. या बँकांना फक्त या भागातच शाखा उघडण्याचे स्वातंत्र्य असावे. लोकांच्या सोईसाठी बँकांना एखादा प्रदेश ठरवून दिल्यानंतर शेजारच्या भागातील जिल्ह्याच्या ठिकाणी शाखा उघडायची परवानगी दिली जाईल. जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या लोकांना दोन किंवा अधिक बँकांमध्ये शाखा उघडता येतील. या शिवाय सहकारी बँकांचे जाळे असेलच. राष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या तीन बँका असाव्यात असे कमिशनचे मत होते. पैकी एक बँक स्टेट बँक असेल व दुसऱ्या दोन राष्ट्रीयीकृत बँका असतील. या रचनेमुळे बँका–बँकांमधील आज दिसून येणारी अनावश्यक स्पर्धा कमी होईल. कार्यक्षेत्र मर्यादित असल्यामुळे या भागातच शाखा उघडाव्या लागतील. दळणवळणातील अडथळे कमी होतील. मर्यादित क्षेत्रात व्यवहार वाढल्यामुळे आकारमानाचे (Economies of Scale) फायदे मिळतील. अर्थात ही योजनासुद्धा फक्त दीड-दोन वर्षांच्या अभ्यासानंतर आखली आहे. आजचा सात वर्षांचा अनुभव लक्षात घेऊन या योजनेत योग्य ते बदल करणे आवश्यक आहे. ही योजना राबवण्यात विशेष अडचणी येणार नाहीत. आज भारतात स्टेट बँक व पंजाब नॅशनल बँक या दोन बँका सोडल्यास भारतातील अन्य राष्ट्रीयीकृत बँकांचे व्यवहार प्रामुख्याने एक दोन प्रांतांतच आहेत. आजच्या पद्धतीत सर्व बँका सर्वत्र शाखा उघडायचा प्रयत्न करतात पण शाखा नाममात्रच असतात. विकासासाठी जबाबदार नसतात. नव्या रचनेमुळे जबाबदारी वाढेल.

राष्ट्रीयीकरणानंतरच्या ७ वर्षांच्या इतिहासावरून बँका देशाच्या गरजा योग्य त्या प्रमाणात भागवू शकल्या नाहीत हेच स्पष्ट होते. या अनुभवावरून दोष लक्षात आले आहेत, ते सुधारणे आवश्यक आहे. बँकिंग कमिशनने सुचवलेली रचना अधिक व्यवहार्य व योग्य वाटते. अर्थात या बदलास काही काळ लागेल. एक गोष्ट नक्की की देशातील या अर्थवाहिन्या सुधारल्याशिवाय विकासास वेग येणार नाही. □

**टीप :** आकडेवारी–करन्सी अँड फायनान्स रि. बँ. इ. वरून.

रंगभूमी

# एका मनस्वी मनोरुग्णाची कहाणी :

# हसा फुलांनो हसा

शिरीष सहस्रबुद्धे

'हसा फुलांनो हसा' हे श्री. माधव कुलकर्णीलिखित आणि श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर दिग्दर्शित नवीन तीन अंकी घरेलू वगैरे नाटक 'नाट्यमंदार'नं नुकतंच रंगभूमीवर आणलं. शीर्षकाशी (हसा फुलांनो हसा) बराच काही आडवळणी बादरायण-संबंध असलेली ही कथा एका मनस्वी आणि विद्वान प्राध्यापकाची (प्रेम–)कहाणी आहे. लेखाच्या शीर्षकातला मनस्वी शब्द अशा-प्रकारे लेखकालाच–नाटककारालाच–अभिप्रेत आहे, तथापि मनोरुग्ण हा शब्द मात्र त्याच्या श्रेय-अपश्रेयासह माझा आहे. माझ्या तर्काप्रमाणे हा शब्द लेखक-दिग्दर्शकादींना फारसा रुचणार नाही, कारण त्यांचा नायक मनोरुग्ण असल्याची कल्पना नाटक बसवताना त्यांना फारशी appreciate झालेली नसावी. तथापि नाटकातील नायकाचं–प्रा. नानाचं–वागणं–बोलणं आणि अन्योन्य पात्रांचे त्याजविषयीचे उद्गार एकत्रितपणे विचारात घेतले तर, हा निष्कर्ष विनासायास निघू शकेल; किंबहुना त्याच्या संपूर्ण मानसिक आरोग्याची हमी देणंच अशक्य वाटू शकेल.

प्रा. नाना हे गणिताचे एक विद्वान तरुण प्राध्यापक. नाना मनस्वी आहे–म्हणजे हट्टी, एककल्ली, अहंमन्य, तुसडा, आत्मकेंद्रित, आणि भाबडा, संशयी, उतावीळसुद्धा आहे. नानाच्या विशेषणांची ही यादी या प्रकारे वरीच फुगवता येईल, पण त्यामुळं नानाच्या मनोरुग्णतेला दुजोरा मिळण्यापलीकडं फारसं काही साध्य होणार नाही. हसा फुलांनो हसा हे नाटक माझ्या दृष्टीनं नानाच्या बऱ्यावाईट instincts चा, त्याच्या sane आणि insane व्यक्तित्वप्रवाहातला जीवघेणा संघर्ष आहे. क्षणापूर्वी 'नॉर्मल' असलेला नाना कधी रुद्रावतार धारण करील ते सांगता येत नाही; व्यवहारातल्या भाषेत बोलायचं तर, नाना भलताच 'मूडी' आहे आणि त्याचे पाठोपाठचे दोन मूड्स् हे पूर्णतः परस्परविरोधीही असू शकतात. हा ऊनपावसाचा खेळ त्याच्या क्रियाप्रतिक्रियाचक्रातून लेखकानीही दाखविलेलाच आहे. एखाद्या विशिष्ट वस्तूच्या, व्यक्तीच्या किंवा घटनेच्या associations जागृत होऊन संपूर्ण व्यक्तिमत्त्वात, वागण्याबोलण्याचालण्यात, प्रतिक्रिया आणि प्रतिसादात आमूलाग्र फरक पडावा ही मनोरुग्णात सहजपणे आढळू शकणारी प्रवृत्तीही नानामध्ये दिसते. 'पेडगावचे शहाणे' चित्रपटातला काका शहाण्यांनी कात्री पाहताच भेदरून बेशुद्ध पडण्याचा प्रकार आणि 'हसा फुलांनो हसा' मधील श्रीधर सोहनीला पाहताच विनाकारण द्वेष-संतापाचा झटका येऊन त्या भरात आपल्याच पत्नीचं चारित्र्यहनन करणारा प्रा. नाना यांची जात काहीवेळा मला एकच वाटते ती यामुळेच. अर्थात त्यांच्यातला फरक केवळ degree चाच आहे असं म्हणणं चुकीचं होईल, कारण quality चा फरक इतका उघड नाकारता येणार नाही. काका शहाणे हा एक confirmed lunatic आहे तर नाना हा सभ्य–सुसंस्कृत समाजात वावरणारा बुद्धिमान प्राध्यापक आहे. मात्र दोघेही एरवी शांत–सौम्य भासले तरी, विशिष्ट असोसिएशन्स उत्तेजित झाल्यानंतर दोघांच्याही प्रतिक्रियांचा outbreak सारखाच असतो. त्यातून नाना हा इतर विद्वानांपेक्षा थोडा वेगळाही आहे; म्हणजे त्याच्या सगळ्या संवेदना फार प्रखर आहेत, त्याच्या संवेदनात्मक जाणीवा तीव्र आहेत, कुठलाही अनुभव तो मोठ्या उत्कटतेनं जगू इच्छितो. एकूणच विद्वानांमध्ये–आणि त्यातही गणिती पंडितांमध्ये–अभावानंच तळपणारी ही संवेदनाक्षमतेची तलवार त्याच्या हाती असल्यानंच की काय, तो ठशातल्या मराठी विद्वानांप्रमाणे नुसताच विक्षिप्त किंवा 'वल्ली' ठरत नाही. पहिल्या लग्नात पत्नीकडून झालेल्या फसवणुकीनं पुरा पोळलेला नाना एका विधवेशी / घटस्फोटितेशी पुनर्विवाह करतो, तथापि विवाहोत्तर पहिल्या रात्रीच श्रीधरपंत सोहनी नामक पत्नीचा कुणी परिचित घरात हजर होतो. (तो तिचा उद्धारकर्ता गॉडफादर असल्याचं नंतर कळतं), 'त्याचे आणि आपले संबंध क्लीणभावाचे नव्हते' या पत्नीच्या कबुलीमुळं नाना दुखावतो आणि त्याच्या मनात संशयाचं बीजारोपण होतं. पुढं दुर्दैवी योगायोगानं वसुधेला–नानाच्या पत्नीला–सातव्या महिन्यातच पूर्ण वाढीचं मूल होतं आणि नानाचा संशय बळावतो. पिसाटासारखा वागणारा नाना संख्याशास्त्रीय संशोधनाच्या शक्यता अजमावण्यासाठी रेस खेळतो, तीही निराशेनं सोडून देतो, अखेरीस वसुधेकडं पाठ फिरवून अनाथ–फसलेल्या पतित स्त्रियांसाठी एक आश्रम काढण्याची योजना आखतो आणि त्यासाठी जिवापाड श्रमतो.

याचवेळी आजारपणात पडलेल्या स्वप्नातून त्याला वसुधा निर्दोष–शुद्ध वगैरे असल्याचं जाणवतं आणि मग स्वीकार, पुनर्मीलन वगैरे. मुळात ही कथा आधी पुरेशी convincing नाही, त्यात कच्चे दुवे बरेच आहेत. उदाहरणार्थ नानाच्या बाबतीत काही विशेषणं वापरून त्याला काय हवं ते करायची मोकळीक लेखकानं बहाल केली आहे. त्यानं काय वाटेल ते केलं तरी, लहरी–हट्टी –एककल्ली–तुसडा–अहंमन्य–रागीट–संशयी संवेदनाक्षम–बुद्धिमान यांतल्या कुठल्या तरी एका विशेषणातून लेखक ते साजरं करून घेतो, हा प्रकार न पटणारा आहे. दुसरं असं की, याही परिस्थितीत ही कथा एक उत्तम, सखोल, तपशीलवार case history म्हणून character Psychoanalysis च्या मार्गानं मांडली गेली असती, तरीही ती श्रेष्ठ मनोविश्लेषणात्मक कलाकृती म्हणून मान्य करता आली असती. तथापि ती मधूनमधून domestic tragedy आणि social comedy ची जी वळणं घेते ती असह्य होतात. उदाहरणार्थ ही कथा किंवा हे नाटक जेव्हा भारतीय पतिव्रतेच्या त्यागाची आणि सोशीकपणाची डॉक्युमेंटरी होऊ लागते तेव्हा अजून मराठी–भारतीय स्त्रिया एकच प्याला छाप सिंधूच्या जमान्यातच असल्याची दाट शंका येऊ लागते. वसुधेची ही कणा नसलेली

व्यक्तिरेखा निर्माण करून माधव कुलकर्णी फसले आहेत, ती व्यक्तिरेखा कृत्रिम झाली आहे आणि शोकरसपूर्ण प्रसंगात तिला जो मेलोड्रॅमॅटिक टच्, अभिनेत्री सुषमा पौडवाल या देतात, त्यामुळेही तिच्या कृत्रिमतेत भर पडते. अर्थात एरवी मात्र पौडवाल यांनी आपली भूमिका मनापासून समरसून जिवंत उभी केली आहे. तीच गोष्ट प्रा. नानाची भूमिका करणारे मोहन गोखले यांची. श्री. गोखले यांचं 'हसा फुलांनो हसा' हे दुसरंच व्यावसायिक नाटक. कस्तुरीमृगपासून हसा फुलांनो हसापर्यंतचा त्यांचा अभिनय-प्रवास कौतुकास्पद आणि अपेक्षा वाढवणारा आहे. या नाटकात विशेषत्वानं नानाचे बदलते मूड्स्, फिरत्या लहरी आणि त्याच्या एखाददुसऱ्या लकबी या व्यक्त करण्यात त्यांनी मोठंच यश संपादन केलं आहे; किंबहुना त्यांच्या चतुरस्र अभिनयावरच लेखनात कच्चं असलेलं हे नाटक फार मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे असं मला वाटलं. प्रामुख्यानं पहिल्या अंकात त्यांच्या अभिनयाला बरंच आव्हान आणि वावही मिळाला आहे आणि त्यांनी त्या उभयतांचा योग्य तो वापर करून घेतला आहे. पुढील अंकांमध्य मात्र त्यांचा प्रभाव पूर्वीइतका भासत नाही. लेखन-दृष्ट्याही नाटक दर अंकाबरोबर चढत जाण्याऐवजी उतरत जात आणि स्वप्नांच्या तकलादू, अविश्वसनीय क्लायमॅक्सपाशी त्याचं तारू पुरतं आपटून फुटतं. दीर्घकाळ पत्नीचा द्वेष करणारा नाना स्वप्नातल्या काही क्षणात तिचा स्वीकार करून चूक सुधारतो हा प्रकार वस्तुतः फक्त हिंदी चित्रपटातच शोभणारा आहे.

नाटकातील अन्य भूमिकांपैकी नानांचा विद्यार्थी अमिताभ हा सर्वाधिक यशस्वी दुय्यम व्यक्तिरेखा असं म्हणायला हरकत नाही. ती रंगवली गेलीही छान. याउलट कॅप्टनची भूमिका मुद्दाम 'पाडल्यासारखी' आणि नाटकावर दाबून चिकटवल्यासारखी होती. भडक आणि उथळ होती. श्रीधर सोहनीची भूमिका लिहिताना कुलकर्णी आणि कर[illegible] संबंधित अभिनेता हे दोघेही चांगलेच अन-घडलेल्या स्थितीत सांपडल्याचं जाणवल. नानाचा भाऊ (स्नेहल दत्त) आणि विद्यार्थिनी मीनल (कुंदा कान्हेरे) यथायोग्य वाटली. दिग्दर्शक पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या दिग्दर्शनात व्यावसायिक सफाईदारपणा आहे, नवीन नवलविशेष काही नाही. संगीताविषयीही तेच. देखण्या नेपथ्यरचनेचा मात्र आवर्जून उल्लेख करायला हवा. एकूणच नाट्यमंदारानं हे नाटक तोलामोलात सादर केलं यात शंका नाही. मात्र त्यात जीव पुरेसा नव्हता ही लेखकाची चूक आणि कलाकारांचं दुर्दैव दुसरं काय? □

---

हिंदी चित्रपट

## एक

# कोई जीता, कोई हारा

### सेन्सॉरच्या कात्रीत चिमटलेले चित्र

हिंदी चित्रपटसृष्टीवर नव्यानंच लागू झालेले सेन्सॉरशिपविषयक निबंध ही बाब तशी आता सर्वज्ञात आणि सर्वमान्य झालेली आहे. या नव्या निबंधांची यादीही आता बहुसंख्य चित्ररसिकांच्या जिभेवर आहे. सात्त्विक आणि सोज्वळ चित्रपटांच्या चाहत्यांना यामुळे आपलाच विजय झाल्यासारखा आनंदी-आनंद होऊन राहिला आहे, तर सेक्स आणि व्हायोलन्सचे पुरस्कर्ते खिन्न मनाने 'हिंदी चित्रपटसृष्टी दुबळी बनवू नका' असा टाहो फोडून राहिले आहेत. या सगळ्या गदारोळाच्या पार्श्वभूमीवर या संबंधातल्या इतरही अनेक वावड्या आणि बातम्या उठताहेत–विरताहेत. 'दस नंबरी', 'नहले पे दहला' आणि 'कालिचरण' इत्यादी चित्रपट सेन्सॉरनं पूर्वी मंजूर केलेले असतानाही बदलत्या परिस्थितीनुसार पुनर्निरीक्षणार्थ मागवले आणि त्यांची यथायोग्य 'धुलाई' केली, ही तर अधिकृत गोटातून आलेलीच बातमी. याशिवाय 'चरस' आणि 'फकीरा' सारखी चित्रे सेन्सॉरनं प्रदर्शित होण्यापूर्वीच कल्हईसफाई करून सोडली अशी एक वार्ता ऐकली. तयार असलेले सुमारे तीस : तब्बल तीस : चित्रपट सेन्सॉरच्या या नव्या धारदार कात्रीच्या धाकामुळे धास्तावून निर्मात्यांनी परीक्षणार्थ सादर केलेलेच नाहीत असंही ऐकिवात आहे.

बीभत्सता आणि क्रौर्य यांच्या रुपेरी प्रदर्शनावर अशा प्रकारे सेन्सॉरची करडी नजर असतानाच 'कोई जीता कोई हारा' हा लक्ष्मी मूव्हीज्‌चा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित झाला आहे. सेन्सॉरच्या कात्रीत पुरा चिमटलेला हा बापडा चित्रपट पाहून चक्क दया येते आणि अर्थातच (निर्मात्याचा) रागही. सेन्सॉरनं सुचविलेले 'कट्स्' निर्माते-दिग्दर्शकांनी जसेच्या तसेच स्वीकारले हे एक मानलं तरी, असा जागोजाग कापलेला विस्कळीत चित्रपट त्यांनी कसा प्रदर्शित केला? या कट्स्‌च्या जागी काही नवे सांधे जुळवता आले नसते का? आधीच लक्ष्मी मूव्हीज्‌च्या स्टोरी डिपार्टमेंटनं 'लिवलेली' या चित्रपटाची कथा इतर अनेकांप्रमाणेच 'न-कथा' या सदरात जमा होणारी आणि त्यात भर म्हणून ही नवी काटछाट. मुख्यतः नायकनायिकांचे प्रणयप्रसंग आणि चित्रपटाच्या शेवटची ती पेटंट फेमस धुमश्चक्री यांतले शॉट्स् एकेक असे नामी कापलेत की, प्रेक्षकांना–विशेषतः सगळं कसं स्पष्ट आणि तपशीलवार बघायची आदत जडलेल्या बालबुद्धीच्या दर्शकमंडळींना–आपली कल्पनाशक्ती अगदी तुटेस्तोवर ताणावी लागते.

'कोई जीता कोई हारा' ही एक स्मगलरी चाकोरीतली प्रेमकहाणी आहे. शशीकपूर या ए-ग्रेड स्मगलरमहाशयांचं सायराबानूसारख्या, अमीर बापाच्या इकलौत्या लडकीवर प्रेम बसणं, लग्नद्वेष्ट्या सायरानं आर्मी कॅप्टन रोमेश शर्माजींना डावलून एका रात्रीत तडकाफडकी स्मगलरजींसमवेत शादी करून मोकळं होणं, दुसऱ्याच दिवशी शशीकपूर गोळीबारात 'उडाल्याची' वार्ता आल्यानं निराधार झालेल्या आपल्या नायिकेचा रोमेश शर्मानं केवळ त्यागबुद्धीनं स्वीकार करणं आणि वस्तूचा मूळ मालक जिंदा असल्याचं जाहीर होताच खाणाखुणा पटवून घेऊन त्यानं ती शशीच्या हवाली करणं असे अनेक मजेदार प्रसंग या केविलवाण्या चित्रपटात भरलेले आहेत. दिग्दर्शक समीर गांगुली यांनी हे फुटकळ प्रसंग एकापुढे एक ठेवण्याव्यतिरिक्त अन्य कोणतीच चमक दिग्दर्शनात दाखविलेली नाही; आणि जिथे ती दाखवायची धडपड केली आहे, तिथे ती केविलवाणी ठरली आहे. उदाहरणार्थ, शशीकपूरचं झटपट हृदयपरिवर्तन करण्याच्या प्रयत्नात त्यांनी पडद्यावर 'जागृती' ही अक्षरंच वारंवार दाखवण्याचा जो अजीबोगरीब प्रयोग केला आहे-तो तुफान विनोदी आहे. गंमत म्हणजे इतका श्रेष्ठ हास्यास्पद विनोद उरलेल्या चित्रातसुद्धा कुठे नाही.

शशीकपूरनं आपली भूमिका दिखाऊ झोकानं आणि व्यावसायिक सफाईनं मारून नेली आहे. रोमेश शर्माबद्दल कधीच काही आशा नव्हती. ती निर्माण करायच्याही खटपटीत तो पडलेला नाही. अत्यंत प्रभावहीन हालचाली आणि भावहीन चेहरा ही त्याची बहुशः नित्याचीच वैशिष्ट्ये. सायरानं क्वचित काही जागा [illegible]वऱ्या दिल्या आहेत, एरवी तिचा भर 'नहले पे दहला' प्रमाणेच भावदर्शनापेक्षा अंगप्रदर्शनावर अधिक आहे. लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांनी चित्रपटाच्या प्रकृतीला मानवेल असंच कामचलावू संगीत 'ठोकून देतो ऐसाजे'च्या वृत्तीनंच दिलं आहे. □

दोन

# दस नंबरी

## सुपरमॅनच्या अफाट लीला

दस नंबरी हा निव्वळ करमणुकीसाठी काढलेला एक अस्सल हिंदी चित्रपट आहे.

दस नंबरी हा एक गोंडस गुन्हेगारपट आहे. अनेक अर्थांनी.

पहिलं असं की, करमणूकप्रधान हिंदी चित्रपटाला शंभर गुन्हे माफ असतात हे लक्षात ठेवूनच हा गुन्हेगारी चित्रपट काढलेला आहे. गुन्हे शंभरांपेक्षा कमी भरणार नाहीत, ही दक्षताही घेतलेली आहे. दुसरं असं की, गुन्ह्यांचं आणि गुन्हेगारांचं शक्य तेवढं आणि अशक्य तेवढंसुद्धा उदात्तीकरण यात कटाक्षानं केलेलं आहे. अशा glorified क्राइम मूव्हीज्‌ची एक लाटच वेस्टर्न चालीवर आपल्याकडेही येऊ पाहत होती. नहले पे दहला आणि दस नंबरी हे दोन्ही त्या लाटेवरचेच बुडबुडे. पण सेन्सॉरच्या नव्या निबंधांमुळे आणि सेक्स-व्हायोलन्सविरुद्धच्या कडक धोरणामुळे ही लाट चांगलीच थोपविली जाईल असं दिसतं. त्या दृष्टीनं हे दोनही मान्यताप्राप्त चित्रपट, पुनर्परीक्षणार्थं सेन्सॉरनं मागविले आहेत, ही घटना लक्षणीय आहे. वाटेनं जाणाऱ्या ‘चरस’, ‘फकीरा’, ‘कोई जीता कोई हारा’ इत्यादी चित्रपटांना सेन्सॉरच्या नव्या कातरकामाचा जबर फटका बसला आणि ‘फकीरा’चं प्रदर्शन तर पुढं ढकलावं लागलं. दस नंबरी मात्र सध्या तरी, या अवकृपेतून बचावून, भरपूर हाणामाऱ्यांसकट देशातील बहुतेक भागात प्रदर्शित झाला आहे. इतका भडक शारीरिक संघर्ष यापुढील काळात रुपेरी पडद्यावर दिसण्याची फारशी शक्यता नाही.

सेव्हन आर्ट्स पिक्चर्स आणि निर्माते मदन मोहला यांच्या दस नंबरी पूर्वीचे त्यांचे ‘शराफत’ आणि ‘राजा जानी’ हे दोन्ही चित्रपट हिट्‌ ठरले होते. दस नंबरीसुद्धा त्याच मार्गावर असल्याच्या वार्ता आहेत आणि तीनही चित्रपटांची नायिका हेमामालिनी हीच आहे, ही गोष्ट बरंच काही सुचवून जाते. हे हेमाच्या वाढत्या गुणवत्तेचं प्रतीक, की वाढत्या लोकप्रियतेचं? की वाढत्या ग्लॅमर आणि box office appeal चं? की नायिकाप्रधान चित्रांचं युग पुन्हा एकवार येऊ घातल्याचं? मला वाटतं, उत्तराचं चित्र पुरेसं स्पष्टपणे नजरेसमोर उभं राहण्याजोगं आहे. अर्थात दस नंबरीच्या मानानं पहिले दोन चित्रपट पुष्कळच मानवी पातळीवर होते. विशेषतः त्यातले नायक हे मनुष्यमात्रांपैकीच असल्याचा दावा करायला बरीच जागा होती. दस नंबरीचे नायक श्री. दस नंबरी उर्फ चिरंजीव मनोजकुमार हे परमेश्वराखालोखाल सर्वशक्तिमान, सर्वज्ञ आणि सर्वसंचारी असून राक्षसाखालोखाल अफाट लीला रचणारे साक्षात सुपरमॅन आहेत. एखाद्या स्टंटपटाच्या नायकाला लाजवतील अशी साहसं आणि एखाद्या पौराणिक चित्र–नाटकालासुद्धा अजीर्ण होईल असे चमत्कार दस नंबरीमध्ये खच्चून भरले आहेत. दस नंबरी म्हणजे दहा वेळा तुरुंगाची हवा खाऊन आलेला आणि पोलिसात रोज एकदा हजेरी द्यावी लागणारा अट्टल गुन्हेगार. मनोजकुमार हा दहाचा आकडा मोठ्या अभिमानानं अंगाखांद्यावर बाळगतात–मिरवतात. अर्थात या दहाच्या आकड्याची मग्रूरी किरकोळ चोरांचिलटांसमोर भली चालत असली तरी, प्रेमनाथसारख्या हुन्नरी गारुड्यासमोर शेपूट घालतेच.

अर्थात आर्ट पिक्चरची किंवा वास्तववादी नवचित्रपटांची स्टॅंडर्ड्‌स्‌ लावून ‘दस नंबरी’ला हिणकस ठरवण्यात फारसा अर्थ नाही, कारण हा चित्रपट खास पब्लिकसाठीच काढलेला आहे. एका दृष्टीने हे असे उघड उघड करमणूकप्रधान धंदेवाईक चित्रपट मला स्वागतार्ह वाटतात, ते आणि त्यांचे निर्माते निदान एका ठराविक–किंवा खास आपल्या–प्रेक्षकवर्गाशी प्रामाणिक असतात, त्यांच्या आवडीनावडी आणि अभिरुचींशी इमान ठेवून असतात. उद्देशप्रधान चित्राचा वरकरणी आव आणायचा आणि मग ‘दुरितांचे तिमिर जावो’ म्हणतम्हणतच दुरित म्हणून जे जे, ते सगळं दाखवून टाकायचं अशा खास छुप्या मनोजकुमारटाइप गनिमी काव्यापेक्षा (पहा : ‘पूरब और पश्चिम’) ही नंगी इमानदारी परवडली. निदान अपेक्षाभंगाचं आणि भ्रमनिरासाचं दुःख पदरी पडत नाही.

‘दस नंबरी’चं कथानक हे महान ‘मूव्ही कॉकटेल’ आहे. त्यात कुठकुठल्या चित्रपटातून काय काय उचलेगिरी केली आहे त्याची यादी केली तर त्यापेक्षा कमी वेळात सिनेमा पाहून होतो असं लक्षात येईल. दस नंबरी मनोजकुमार हे अर्थातच परिस्थितीमुळे अट्टल गुन्हेगार बनलेले असतात. ते बऱ्याच मोठ्या इलाख्यावर दादागिरी करतात, खंडण्या वसूल करतात आणि ‘मेरे तालाब की मछली मेरी इजाज़त के बगैर पानी भी नहीं पी सकती’, असे कडक टाळीचे डायलॉग कायम एकसुरी खालच्या पट्टीत ठोकतात. ते चित्राचे नायक, तेव्हा एकाचवेळी वेड्यांच्या इस्पितळात सडत पडलेल्या आपल्या माँ वर आणि रस्त्यावर पत्त्यांच्या जुगारात फसवाफसवी करणाऱ्या रोझी ऊर्फ हेमामालिनीवरही त्यांनी जिवापाड प्रेम करावं हे ओघानंच आलं. यानंतर अर्थातच कुठल्याही हिंदी चित्रपटात असते तशी आणि फक्त हिंदी चित्रपटातच शोभेल अशी भयंकर गुंतागुंत आणि बेफाम हाणामारी होऊन दुर्जनांचा विनाश आणि सज्जनांचे (?) परित्राण पूर्ण होते.

हे ‘दस नंबरी’ प्रकरण प्रेक्षणीय वाटतं ते मुख्यतः दोन–तीन गोष्टींसाठी एक : त्यातला bad guys museum, त्यातलं दुष्ट–दुर्जनांचं मनोरंजक संग्रहालय, दोन : लग्नपत्रिका छापाव्यात तितक्या सहजतेनं नोटा छापण्याची त्यातली जीवघेणी, गळेकापू स्पर्धा, तीही अर्थात हास्यस्पदच, आणि तीन : हेमामालिनी. एखाद्या मत्स्यालयात जगातल्या सर्व तऱ्हांच्या माशांच्या जातीचे नमुने आणून मांडावेत तसे दस नंबरीमध्ये दुष्टांचे खजाने आहेत. दस्तुरखुद्द नायकनायिकेशिवाय, नायिकेचा दारूडा बाप, नोटा छापणारी दिलरुबा दिल्लीवाली (बिंदू), पैसे खाणारा हवालदार (प्राण), नोटा छापण्यातला दिल्लीवालीचा स्पर्धक शेठजी (ओम शिवपुरी) आणि आतून त्याला सामील असलेला पोलीस कमिशनर, तोही पुन्हा तोतया, (प्रेमनाथ), अशी मोठी झक्क जत्रा इथं जमा केली आहे. अर्थात यातले बिंदू आणि प्राण मूळचे सी. आय. डी. इन्स्पेक्टर्स असतात, ही भानगड पुन्हा वेगळीच. ज्या बनावट नोटांचा छडा लावण्यासाठी ते वेश पालटतात, तो नोटा छपाईचा कारखाना तर पोट दुखेपर्यंत हसवणारा आहे. साधी जॉबवर्कची ट्रेडल छपाई-यंत्रे आणि सरळसाधे ठसे (ब्लॉक्स) एवढ्या सामग्रीनिशी खऱ्या नोटांपेक्षा जास्त असली वाटणाऱ्या नोटा तयार करणारे यातले नंबरी महाभाग धन्य असोत.

अलीकडच्या दोन–तीन चित्रपटांपेक्षा हेमामालिनी यात सुरेख दिसलीय्‌. तिच्या अदाकारीतही खूप जान आहे. विशेषतः ‘प्रेम का रोग बड़ा बुरा’ या गाण्यावरून त्याचा अधिक प्रत्यय यावा. मनोजकुमार, इतर कोणीही कलाकार आणि संगीत यावर काही लिहून कागद–शाई वाया घालविण्याऐवजी फाईट कंपोजर आणि फोटोग्राफरची नावंच पुन्हा पुन्हा लिहीत राहिलो तरी जास्त पुण्य गाठीला लागेल. □

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

१७।७।७६ ते २३।७।७६

**मेष : उपासनेची गरज**

अंतरिक्षातील रवी, शनी, बुध, शुक्र असे ग्रह सुखस्थानी आहेत. सुरुवातच व्ययस्थानी चंद्र असताना होत आहे. तुमच्या इष्टदेवतेची उपासना करा व मानसिक शक्ती मिळवा. त्यामुळे तुमचा फायदा होईल. शनिवारी देवघेवीचे व्यवहार टाळा. रविवारी महत्त्वाच्या व्यक्ती भेटतील. सोमवारी नोकरीत कामाचा ताण पडेल. मंगळवारी धंद्यात प्रगतीची योजना आखाल. बुधवारी आर्थिक बाजू उत्तम राहील. गुरुवारी चैनीचा मोह अनावर होईल. शुक्रवारी नोकरीत एखादे महत्त्वाचे काम स्त्रीच्या मदतीने पार पडेल. शुभ दिनांक १८–१९–२०.

**महिलांना :** मंगळवार–बुधवार बरेच अनुकूल जाणार आहेत. आशाआकांक्षा पुऱ्या होतील.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यास व शाळा चुकवून भलते छंद करण्याचा मोह होईल तो टाळा.

**वृषभ : अनुकूल परिस्थिती**

गुरू राशीत प्रविष्ट झाला आहे, तर बुध, शुक्र, शनी पराक्रमात कार्यतत्पर आहेत. यावेळेचे ग्रह तुमच्या भाग्याला गती देणारे आहेत. अनेक क्षेत्रांत प्रगतीची नवी दिशा दिसेल. प्रत्यक्ष लाभ दृष्टिपथात येतील. उत्साहाला भरती येईल. यश व प्रगतीचे नगारे वाजू लागतील. शनिवारी चांगली अर्थप्राप्ती होईल. रविवारी धंद्याची सुरुवात होईल. सोमवारी नोकरीत मागण्या मान्य होतील. मंगळवारी वरिष्ठ अगर मालक खूष राहतील. बुधवारी अचानक प्रवासाचे ठरेल. गुरुवारी मित्र अगर उच्चपदस्थ व्यक्तीकडून मोलाचे सहकार्य मिळेल. शुभ दिनांक १९–२०.

**महिलांना :** शनिवार व शुक्रवार बचतीच्या दृष्टीने शुभदायक आहेत. महत्त्वाच्या घटना घडतील.

**विद्यार्थ्यांना :** तांत्रिक अभ्यासक्रमावर भर द्यावा लागेल. 'शिका व कमवा' असे उत्तम वातावरण राहील.

**मिथुन : आशादायक घटना**

आठवड्याची सुरुवात मीन राशीच्या चंद्राने होत आहे. शिवाय शुक्र, रवी, बुध व शनी दुसरे आहेत. साडेसातीची तीव्रता जाणवण्याची शक्यता आहे. तरीही एकूण वातावरण मात्र तसे नाही. मंगळ तिसरा आहे तो अनेक चमत्कार घडवू शकेल. शनिवारी अनेक दिवस रेंगाळत असलेल्या एखाद्या कामाचा निर्णय तुमच्या बाजूने लागेल. रविवारी धांदल–धावपळ होणार आहे. सोमवारी तब्येतीत लक्षणीय सुधारणा होईल. मंगळवारी पैशाची अडचण बरीच कमी होईल. बुधवारी नोकरीतील वातावरण उत्साहाचे राहील. गुरुवारी पाहुण्यांसाठी खर्च होईल. शुक्रवारी घरातील वातावरण मंगल व उत्साहाचे राहील. शुभ दिनांक १९–२०.

**महिलांना :** लॉटरीचा प्रयत्न करा, यश येईल. मंगळवार व गुरुवार महत्त्वाचे दिवस आहेत.

**विद्यार्थ्यांना :** सर्वसामान्य अनुकूलता आहे. अपेक्षित बदल होऊ शकतील. पैशाची अडचण नाही.

**कर्क : सामर्थ्याचा प्रत्यय**

भाग्यस्थानी चंद्र असताना या आठवड्याची सुरुवात होत आहे. ही एक साहसपूर्ण अशीच घटना आहे. अनेक बाबतीत अनुकूल व आश्चर्यकारक घटना घडणार आहेत त्याचा कौशल्याने लाभ उठवा. कारण हा आठवडा तुमच्यावर सामर्थ्याची चवरी ढाळणार आहे. शनिवारी घर व जागा अगर स्थावर शेतीचा प्रश्न सुटेल. आशाआकांक्षा पुऱ्या होतील. रविवारी खर्चाला आळा घालणे आवश्यक आहे. सोमवारी नोकरीत बढती वा प्रमोशनची अनुकूलता राहील. मंगळवारी लेखन वा वाङ्मयाचा प्रत्यय येईल. बुधवारी व्यापारी क्षेत्रात अनेक लाखांच्या उलाढाली घडवू शकतील. शुक्रवारी नोकरीत यश व अनुकूलता राहील. शुक्रवारी कलेचा आविष्कार घडेल. शुभ दिनांक १९–२०.

**महिलांना :** कलावंत महिलांना प्रसिद्धी व कीर्ती मिळेल. पैसा व प्रसिद्धी मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** मुलाखतीला हा आठवडा फारच अनुकूल असा आहे. अनेक प्रकारे नवी संधी मिळेल.

**सिंह : यश मिळेल**

आठवा चंद्र आहे. या चंद्रावर आठवड्याची सुरुवात होत आहे ही चांगली बाजू आहे. प्रामुख्याने प्रतिष्ठा उंचावणे, प्रवासाचे बेत पुरे होणे, आर्थिक बाजू भक्कम होणे व स्थावराच्या कामाला चालना मिळणे असे यावेळी होऊ शकेल. पहिला मंगळ आहे. तसेच दहावा गुरू आहे. पण बुध, शुक्र, रवी बारावे आहेत. हळूहळू पावले उचला. शनिवारी घरासंबंधीचा प्रश्न उद्भवेल. रविवारी महत्त्वाचे काम होईल. सोमवारी अपेक्षित व्यक्ती भेटेल. मंगळवारी नोकरीतील मागणी पुरी होईल. बुधवारी कौटुंबिक वातावरण अनुकूल राहील. गुरुवारी सार्वजनिक सन्मान होईल तर शुक्रवारी धंदा सुधारेल. शुभ दिनांक २०–२१

**महिलांना :** हातातील पैसा जपून काटकसरीने खर्च करा. नोकरीत बुधवार व शुक्रवार कामाचा ताण पडेल.

**विद्यार्थ्यांना :** व्यसनापासून त्रास होईल याची नोंद घ्या. व्ययस्थानी बरेच ग्रह आहेत.

**कन्या : पुष्कळच अनुकूल**

आठवड्याच्या सुरुवातीलाच कौटुंबिक प्रसन्नता आणणारी घटना घडून त्याचे पडसाद आठवड्याच्या कार्यावर घडणार आहेत. बारावा मंगळ दुर्लक्षून चालणार नाही. अकस्मात खर्चाची नवी प्रकरणे उभी राहतील तर, मानसिक व शारीरिक स्वास्थ्य काहीसे अप्रसन्नता निर्माण करण्याचा प्रयत्न करील. तरीपण गुरू, शनी, रवी, बुध, शुक्र असे अनेक ग्रह कृपेची पाखर घालून उभे आहेत. त्यामुळे हा आठवडा अनुकूल आहे. शनिवारी उच्चपदस्थ व्यक्ती भेटतील. शनिवारी आर्थिक बाजू सुधारेल, सोमवारी कामाचा ताण पडणार आहे. मंगळवारी नोकरीतील सहकारी अनुकूल राहतील. बुधवारी धंद्यात बस्तान बसेल. गुरुवारी नोकरीत ताण पडला तरी फायदा होईल. शुक्रवार लाभदायक आहे. शुभ दिनांक १७–१९

**महिलांना :** तब्येतीची काळजी घ्या. धावपळ कमी करा. शुक्रवारी उत्तम प्राप्ती होईल.

**विद्यार्थ्यांना :** केवळ पुस्तकी विद्येवर अव-

लंबून न राहता ऐतिहासिक स्थळे पहा. त्याचा फायदा होईल.

**तूळ : भाग्योदय**

तूळ राशीच्या लोकांना इतका छान काळ बऱ्याच दिवसांनंतर येत आहे. मोकळ्या मनाने जर येणाऱ्या संधी पकडून त्यात रमून गेलात तर तुमच्या भाग्याला पारावार उरणार नाही. अंतरिक्षातील गुरू, शनी, रवी, मंगळ इत्यादी अनेक सामर्थ्यवान ग्रह तुमच्यापुढे हात जोडून उभे आहेत. त्यामुळे त्याचे प्रत्येक क्षेत्रात अनुकूल अनुभव येणार आहेत. शनिवारी नोकरीत महत्त्वाची घटना घडेल. रविवारी पैसा भरपूर मिळेल. सोमवारी वरिष्ठांची मर्जी बसून पुढे फरक घडेल. मंगळवारी कलाक्षेत्रातील उद्योगाला चालना मिळेल. बुधवारी कापडधंदा नफा मिळवून देईल. गुरुवारी लेखकांना आशादायक तर शुक्रवारी सोने–चांदीचा व्यवहार फलदायी होईल.

**महिलांना** : नाट्य–सिने–संगीत क्षेत्रातील महिलांना भरभराटीत आणणारा काळ आहे. नोकरीत उखळ पांढरे होईल.

**विद्यार्थ्यांना** : आर्थिक बाजू चांगली राहील. कलाक्षेत्रात व व्यापारी क्षेत्रात पदार्पण करा.

**वृश्चिक : नोकरीत प्रमोशन**

तुम्हाला काही ग्रह प्रतिकूल आहेत. पण ते तुमचे काही वाईट करू शकणार नाहीत. उलट यावेळी राशीस्वामी मंगळ दहावा आहे व तोच तुमचे मनोरथ पूर्ण करणार आहे. महत्त्वाकांक्षा उजळून टाकणार आहे. अनेक क्षेत्रांत कर्तृत्वाची क्षितिजे दृष्टिपथात आणणार आहे. अनेक दिवसांच्या आशा-आकांक्षा पुऱ्या होणार आहेत. शनिवारी कोर्ट–कचेरीत रेंगाळलेले काम निकाली निघेल. रविवारी नव्या धंद्याची सुरुवात करा. सोमवारी नोकरीत वरिष्ठांच्या कलाने वागून प्रमोशन मिळवू शकाल. मंगळवारी कोणत्याही धंद्यात मोठे यश मिळेल. बुधवारी महत्त्वाची पत्रे येतील. गुरुवारी उपासनेचे फळ मिळेल. शुक्रवारी वाहन खरेदीचा योग येईल. शुभ दिनांक २१–२२

**महिलांना** : स्वतःचा धंदा सुरू करा. अनुकूल वातावरण आहे. पैसा व कर्जरूपाने तर साह्य मिळेल. मंगळवारी कौटुंबिक आनंद लाभेल.

**विद्यार्थ्यांना** : उत्साहाला भरते येईल. अनेक क्षेत्रांत नवी दालने बुद्धीला खुली होतील.

**धनू : उत्साह वाढेल**

राशीस्वामी गुरु साहवा आला आहे तो नवे काही तरी हातून घडवणार आहे. शिक्षण, साहित्य, पत्रसृष्टी या क्षेत्रांत तुमचे कर्तृत्व नवे रूप धारण करील. आठवड्याची सुरवात चंद्राने होत आहे. थोडे मानसिक अस्वास्थ्य जाणवले तरी काळजीचे कारण नाही. नंतरचे दिवस अनुकूल अनुभव देणार आहेत. मंगळ तुम्हाला बरेच काही देणार आहे. शनिवारी मजेत दिवस जाईल. रविवारी प्रवासात अनेक प्रकारे उत्साह द्विगुणित होईल. सोमवारी बौद्धिक यश पदरात पडेल, मंगळवारी शारिरिक स्वास्थ्य उत्तम राहील. सुधारणा होईल. बुधवारी नोकरीत सहकार्य मिळेल. गुरुवारी धार्मिक व मंगल कार्य पार पडेल. शुक्रवारी प्रतिष्ठा उंचावेल. शुभ दिनांक २१–२३

**महिलांना** : मंगळवारी व्रतवैकल्ये करा. नोकरीत भाग्योदय होईल. नव्या धंद्याची सुरुवात करू शकाल.

**विद्यार्थ्यांना** : अडचणी नाहीत. इंजिनिअरिंग क्षेत्रांत प्रत्यक्ष अनुभव मिळेल. साहित्याचा अभ्यास होईल.

**मकर : प्रगतीची झेप**

मीनेचा तिसरा चंद्र असताना या आठवड्याची सुरुवात होत आहे. ही शुभसूचक आहे. पांचवा गुरु लाभदायक आहे. आठवा मंगळ थोडीफार निराशा तीही वैयक्तिक आणू शकेल. सातवा शनी–रवी बुध वगैरे ग्रह कौटुंबिक धावपळ पण कार्यप्रवण करणारे आहेत. सामान्यतः हा आठवडा प्रगतीची झेप निर्माण करणारा आहे. शनिवारी मित्राकडून महत्त्वाचे काम होईल. रविवारी मानसिक स्वास्थ्य कमी मिळेल. सोमवारी नोकरीत प्रभाव पडेल. मंगळवारी आर्थिक बाजू भक्कम होईल. बुधवारी नोकरी विषयक कामात कार्यक्षमता दिसेल. गुरुवारी राजकारणात माघार घ्यावी लागेल. शुक्रवारी मानसिक समाधान मिळेल. शुभ दिनांक १९–२२

**महिलांना** : मंगळवारचा उपवास करा. महत्त्वाचे काम यशस्वी होईल. कापड व घरगुती वस्तु खरेदीच्या अडचणी निवारण होतील.

**विद्यार्थ्यांना** : वैयक्तिक महत्त्वाकांक्षा वाढीला लागतील. पैसे जपून खर्च करा.

**कुंभ : स्थावराची कामे होतील**

हा आठवडा अनुकूल फले देणारा आहे. दुसरा चंद्र, चौथा गुरु, सातवा मंगळ व साहाव्यास्थानी बरेच उच्चीचे ग्रह विराजमान झाले आहेत. राजकारण व सार्वजनिक कार्य करणाऱ्यांना बरीच शुभ परिस्थिती आहे. अनेक दिवसांच्या महत्त्वाकांक्षा पुऱ्या होतील. नव्या नव्या योजनांना अनुकूल साथ लाभेल. व्यापार व शेती प्रसन्नता निर्माण करतील. शनिवारी नोकरीतील गाठीभेटी फलदायी होतील. शनिवारी थोडे दमाने घ्यावे लागेल. सोमवारी कर्जाचा व्यवहार टाळा. मंगळवारी लॉटरीचे तिकीट घ्या. बुधवारी व्यापार सुरळीत होईल. गुरुवारी शेतीमध्ये सुरक्षितपणा लाभेल. शुक्रवारी सोने व चांदी खरेदी करू शकाल. शुभ दिनांक २१–२३

**महिलांना** : माहेरवास घडून मानसिक स्वास्थ्य लाभेल. नोकरीच्या दृष्टीने उपकारक घटना घडतील. शुक्रवारी उपवास करा.

**विद्यार्थ्यांना** : हितकारक असे बरेच घडणार आहे. विज्ञान संशोधनासाठी मदत मिळेल.

**मीन : नोकरीत प्रमोशन**

आठवड्याच्या सुरुवातीलाच चंद्र पहिला आहे. पंचमस्थानी बरेच समर्थ व अनुकूल असे ग्रह बसले आहेत, मंगळ सहावा आहे तो विरोधक व शत्रूंना जरब बसवील. हा आठवडा प्रामुख्याने नोकरीत बरेच घडवणार आहे. प्रमोशन बढती असे घडेल. बेकारांना मदत मिळेल. नोकरीची उलथापालथ होईल. प्रकाशकांना नवे क्षेत्र उपलब्ध होईल. लेखकांना सरकारी पुरस्कार मिळेल. कलावंतांना अनुदान मिळेल. शनिवारी नोकरीत खबरदारी घ्यावी लागेल. रविवारी खर्चाला बंधन पडेल. सोमवारी प्रवास होईल. मंगळवारी साधुसंताचे दर्शन घडेल. बुधवारी लेखकांची स्तुती मिळेल. गुरुवारी परदेशी पत्रव्यवहार होईल. शुक्रवारी प्रतिष्ठा उंचावेल.

**महिलांना** : सभासंमेलनात भाग घेता येईल. प्रवासात वेळ घालवाल. नोकरीधंदा सुधारेल. गुरुवारी नव्या उद्योगाची सुरुवात होईल.

**विद्यार्थ्यांना** : यश व प्रगतीला उपकारक असा हा आठवडा आहे. संशोधन व विज्ञान यात जास्त लक्ष घाला. □